CMYK

सोलापूर तरुण भारत

SOLAPUR TARUN BHARAT

न मे कर्मफले स्पृहा

सोलापूर, धाराशिव, लातूर, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना, बीड, अहिल्यानगर व सातारा येथून वितरित

लातूर | मंगळवार, २४ मार्च २०२६ | वर्ष ४ थे अंक १६ | पाने १२ | किंमत रु. ६/- ■ RNI No. MAHMAR/2023/86477 ■ Postal Regd No. SLP/32/2024-2026.

dainiktarunbharat.com | epaper.dainiktarunbharat.com

## विचारपुष्प



आता आपल्या हिंदुत्वाच्या विचाराची वेळ आली आहे. आता आपण सर्वांनी अथक परिश्रम करून, योजनाबद्ध रीतीने मन, अंत:करण, हृदय निर्मळ ठेवून या विशाल परिवाराचे अंग आहोत, त्याची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी परस्परपूरक बनून, परस्पर विश्वासाने, अत्यंत प्रेमभावाने, नि:स्वार्थ बुद्धीने, तन-मन-धनाने कार्य करण्यास एकजूट झालो तर यश निश्चित आहे.

**- कृ. सूर्यनारायण राव**
रा. स्व. संघाचे पूर्व अ. भा. सेवा प्रमुख

# अमेरिका-इराणची दमछाक

## दोन्ही देश युद्ध संपविण्यासाठी शोधताहेत मार्ग

## इराण तडजोड करण्यास उतावीळ : डोनाल्ड ट्रम्प

### चर्चा सुरू असल्याचा दावा

◆ **वॉशिंग्टन, २३ मार्च**

इराण तडजोड करण्यास उतावीळ असून, दोन्ही देशांमध्ये सकारात्मक चर्चा झाली. त्यामुळे इराणी ऊर्जा प्रकल्प आणि ऊर्जा सुविधांवर पुढील पाच दिवस हल्ले टाळण्याचा आदेश सैन्याला दिला, असा दावा अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी केला. दोन्ही देशांमध्ये मध्यपूर्वेत सुरू असलेले युद्ध पूर्णतः संपुष्टात आणण्यासाठी गांभीर्याने चर्चा सुरू असल्याचे त्यांनी सांगितले.

मागील दोन दिवसांत इराणसोबत अत्यंत सकारात्मक आणि उत्पादक चर्चा झाली, असे डोनाल्ड ट्रम्प यांनी ट्रूथ या समाज माध्यमावरील पोस्टमध्ये म्हटले. मध्यपूर्वेतील संघर्ष संपुष्टात आणण्याचा



उद्देश यामागे आहे. चर्चेची फेरी हा आठवडा सुरू राहील. दोन्ही देशांमधील तपशीलवार आणि गांभीर्याने होणारी चर्चा पाहता. इराणचे ऊर्जा प्रकल्प आणि ऊर्जा सुविधांवर पुढील पाच दिवस हल्ले टाळावे, असा निर्देश अमेरिका संरक्षण विभागाला दिल्याची माहिती ट्रम्प यांनी दिली.

ब्रिटनचे पंतप्रधान किएर स्टार्मर यांनी रविवारी रात्री ट्रम्प यांच्यासोबत चर्चा केल्याचे निवेदन ब्रिटनमधील पंतप्रधान कार्यालयाने जारी केले. दोन्ही नेत्यांमध्ये होर्मुझ सामुद्रधुनी खुली करण्याच्या मुद्यावर चर्चा झाली. ◂(वृत्तसंस्था)



## आमच्या इशाऱ्यानंतर मागे हटला अमेरिका : इराण

### कोणतीही चर्चा झाली नाही

◆ **तेहरान, २३ मार्च**

आम्ही दिलेल्या कठोर इशाऱ्यानंतर अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी माघार घेतली, असा दावा इराणच्या सरकारी वृत्तवाहिनीने केला. इराण आणि अमेरिकेत कोणतीही चर्चा झालेली नाही. ट्रम्प यांनी केलेले वक्तव्य वाढलेल्या तेल आणि वायूच्या किमती कमी करण्यासाठी आणि सैन्य योजनांना वेळ मिळावा यासाठी करण्यात आले, असे इराणच्या वृत्तसंस्थेने परराष्ट्र मंत्रालयाचा हवाला देत म्हटले आहे.

हल्ल्यांमुळे झालेले नुकसान भरून द्या, अशी मागणी इराणने केली असल्याचे वृत्त अमेरिकी संकेतस्थळ एक्सिओसने दिले आहे. भविष्यात





युद्ध होणार नाही, अशा कठोर अटी इराणने घातल्या आहेत. अमेरिकेला सहा मुद्यांवर इराणकडून हमी हवी आहे. त्यात प्रादेशिक सुरक्षा आणि स्थैर्य हा मुद्दा सर्वांत महत्त्वाचा आहे. शांतता बहाल होण्यापूर्वी या अटी इराणने मान्य कराव्यात, असे अमेरिकेचे म्हणणे आहे.

पहिल्या तीन अटी क्षेपणास्त्र आणि अण्वस्त्र कार्यक्रमांशी संबंधित आहेत. पुढील पाच वर्षे इराण कोणताही क्षेपणास्त्र कार्यक्रम हाती घेणार नाही, ही एक अट आहे. युरेनियमच्या शुद्धीकरणावरही बंदी घालण्याचा यात समावेश आहे. इराणने नतांज, इस्फहान आणि फोर्डो अणुकेंद्रांवरील काम त्वरित थांबवावे, असे अमेरिकेचे म्हणणे आहे. ◂(वृत्तसंस्था)



## भारताची अर्थव्यवस्था मजबूत : पंतप्रधान

### युद्धाचा कमीत कमी परिणाम व्हावा, यासाठी प्रयत्न

◆ **नवी दिल्ली, २३ मार्च**

मध्य पूर्वेतील युध्दाचा आपल्या देशाच्या अर्थव्यवस्थेवर कमीत कमी परिणाम व्हावा, या व्यूहरचनेतून सरकार काम करत आहे, याकडे लक्ष वेधत भारताची अर्थव्यवस्था मजबूत असल्याचा निर्वाळा पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी दिला.



मध्यपूर्वत सुरु असलेल्या युध्दाबाबत लोकसभेत निवेदन करतांना मोदी म्हणाले की, व्यापारी जहाजांवर हल्ला केला जाऊ नये, तसेच होर्मुजच्या समुद्रधुनीतून जहाजाच्या वाहतुकीवर कोणत्याही प्रकारचा अडथळा आणला जाऊ नये, ही आमची भूमिका आहे. या भागातून भारतीय जहाजांची वाहतूक सुरळीत व्हावी, यासाठी सरकार सातत्याने प्रयत्नशील आहे, त्यामुळेच काही भारतीय जहाजे सुखरुप आपल्या देशातही पोहोचली आहेत.

पश्चिम आशियातील परिस्थितीवर सरकारची बारिक नजर असून सरकार सतर्क आहे, असे स्पष्ट करत मोदी म्हणाले की, पश्चिम आशियातील परिस्थिती चिंताजनक आहे. देशाची गरज असलेले कच्चे तेल तसेच गॅसचा मोठा हिस्सा याच भागातून आपल्या देशात येत असतो. मात्र युध्दामुळे होर्मुज समद्रधुनीतून जहाजांची वाहतूक करणे अतिशय आव्हानात्मक झाले आहे. मात्र तरीसुध्दा याचा देशातील पेट्रोल, डिझेल आणि गॅसच्या पुरवठ्यावर परिणाम होऊ नये, देशातील लोकांवर याचा कमीतकमी परिणाम व्हावा, असा सरकारचा प्रयत्न आहे, त्यादृष्टीनेच आमचे प्रयत्नही सुरू आहेत. ◂(तभा वृत्तसेवा)

### ४१ देशांकडून ऊर्जेची आयात

**ऊर्जा पुरवठा हा कोणत्याही देशाच्या अर्थव्यवस्थेचा कणा असतो, याकडे लक्ष वेधत मोदी म्हणाले की, देशातील ऊर्जा पुरवठ्याची साखळी सुरळीत राहावी म्हणून वेगवेगळ्या पर्यायावरही आपण काम करत आहे. आतापर्यंत आपण २७ देशातून उर्जेची आयात करत होते, आता ४१ देशातून आयात केली जात आहे, त्यामुळेच आपल्या देशात ऊर्जेचा पुरवठा विनाअडथळा सुरळीत आहे, आपल्या देशातील तेलशुध्दीकरण प्रकल्पही पूर्ण क्षमतेने काम करत आहे.**

## महत्त्वाचे

### ॲग्रीगेटर कंपन्यांना आता मराठी अनिवार्य

**मुंबई** : राज्यातील ओला, उबेर यांसारख्या प्रवासी वाहतूक सेवांसह सर्व डिलिव्हरी आणि ई-कॉमर्स कंपन्यांना आता मराठी भाषेचा वापर करणे बंधनकारक होणार आहे. सर्व ॲग्रीगेटर कंपन्यांनी राज्यात स्थानिक भाषेत (मराठी) ग्राहक तक्रार निवारण केंद्र सुरू करणे अनिवार्य असेल, असे स्पष्ट निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले आहेत. राज्यात ॲग्रीगेटर धोरण अंतिम करण्यासाठी आयोजित बैठकीत ते बोलत होते. या निर्णयामुळे आता राज्यातील ग्राहकांना आपल्या तक्रारी मातृभाषेत मांडता येतील आणि कंपन्यांनाही २४७ हेल्पलाईन सुविधेद्वारे मराठीत प्रतिसाद द्यावा लागेल. राज्यात ॲग्रीगेटर धोरण अंतिम करण्याच्या दृष्टीने परिवहन मंत्री सरनाईक यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेण्यात आली. या बैठकीला परिवहन आयुक्त राजेश नार्वेकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकर तसेच परिवहन विभागातील वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते.

### तामिळनाडूत रालोआचे जागावाटप निश्चित

**चेन्नई** : २३ एप्रिल रोजी होणाऱ्या विधानभा निवडणुकांसाठी युतीतील प्रमुख पक्षांमधील जागावाटपाचा अंतिम निर्णय तामिळनाडूत अण्णाद्रमुकच्या नेतृत्वाखालील रालोआने सोमवारी घेतला. यानुसार भाजपाला २७, पीएमकेला १८ आणि एएमएमकेला ११ जागा देण्यात आल्या. इतर मित्रपक्षांसोबत चर्चा सुरू असून, ती लवकरच पूर्ण होईल, असे येथील पक्षाच्या मुख्यालयात आयोजित पत्रपरिषदेला संबोधित करताना अण्णाद्रमुकचे सचचिटणीस ए. पलानीस्वामी यांनी सांगितले. मित्रपक्षांकडून लढवल्या जाणाऱ्या मतदारसंघाची नावे लवकरच निश्चित केली जातील, असे त्यांनी नमूद केले. जागा वाटपाबाबतची चर्चा अत्यंत सौहार्दपूर्ण वातावरणात पार पडल्याचे त्यांनी सांगितले. तामिळनाडूत २३४ विधानसभा जागांसाठी २३ एप्रिल रोजी निवडणूक होणार आहे. रालोआत तमिळ मनिला काँग्रेस (मुपनार) आणि आयजेकेचा समावेश आहे.

### होर्मुझवर इराणचा टोलनाका

**तेहरान** : मध्यपूर्वेतील युद्धामुळे जगभरात इंधन टंचाई सुरू असतानाच इराणने आता होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या काही जहाजांकडून २० लाख डॉलर्स (अंदाजे १८८ कोटी रुपये) आकारण्याचा निर्णय घेतला आहे. इराणने या महत्त्वपूर्ण जागतिक सागरी मार्गावरील आपले नियंत्रण दर्शवण्याच्या उद्देशाने हे पाऊल उचलले आहे. या निर्णयाबाबत इराणच्या संसदेच्या राष्ट्रीय सुरक्षा समितीचे सदस्य अलाएद्दीन बोरुजेर्दी म्हणाले, होर्मुझच्या सामुद्रधुनीतून जाणाऱ्या काही जहाजांवर आकारण्यात आलेला २० लाख डॉलर्सचा नवीन टोल आधीच लागू करण्यात आला आहे. हे पाऊल अनेक दशकांनंतर या सामुद्रधुनीवरील इराणचा अधिकार दर्शवते. काही जहाजांकडून २० लाख डॉलर्सचा टोल घेणे हे इराणची ताकद दाखवते. आता युद्धाचा खर्च वाढला असल्यामुळे आम्हाला हे करणे आवश्यक वाटते. होर्मुझमधून जाणाऱ्या जहाजांकडून वाहतूक शुल्क आकारणे हे इस्लामिक प्रजासत्ताकाची ताकद आणि अधिकार दर्शवते, असेही ते म्हणाले. अमेरिका आणि इस्रायलने संयुक्तपणे इराणविरुद्ध सुरू केलेल्या युद्धाचा सोमवारी २४ वा दिवस होता.

# १४ लाख कोटी बुडाले

## परदेशी गुंतवणूकदारांचा काढता पाय

◆ **पुणे, २३ मार्च**

शुक्रवारच्या सुधारणेनंतर सोमवारी भारतीय शेअर बाजारात पुन्हा एकदा मोठी घसरण झाली. जागतिक अनिश्चिततेच्या सावटाखाली गुंतवणूकदारांनी चौफेर विक्री केल्याने निफ्टीने २२,५०० चा स्तर ओलांडला. ९ एप्रिल २०२५ नंतरची ही निफ्टीची नीचांकी पातळी ठरली आहे.

जागतिक बाजारपेठेतील नकारात्मक संकेतांमुळे भारतीय बाजाराची सुरुवातच मोठ्या घसरणीने झाली. दिवसभर विक्रीचा दबाव कायम राहिल्याने निफ्टी २२,४७१.२५ या नीचांकी स्तरावर पोहोचला. रुपयाचे ऐतिहासिक मूल्य घसरणे, परदेशी गुंतवणूकदारांनी काढलेला पाय आणि बाँड यिल्डमधील वाढ या कारणांमुळे गुंतवणूकदारांचा उत्साह मावळला. सोमवारी बाजार बंद होताना सेन्सेक्स १,८३६.५७ अंकांनी (२.४६ टक्के) घसरून ७२,६९६.३९ वर स्थिरावला, तर निफ्टी ६०१.८५ अंकांनी (२.६० टक्के) घसरून २२,५१२.६५ वर बंद झाला.



या घसरणीचा सर्वाधिक फटका मिड कॅप आणि स्मॉल कॅप निर्देशांकांना बसला, जे प्रत्येकी ४ टक्क्यांनी घसरले. या पडझडीमुळे बीएसई सूचीबद्ध कंपन्यांचे बाजार भांडवल सुमारे १४ लाख कोटी रुपयांनी घटून ४१४.७५ लाख कोटी रुपयांवर आले आहे. दुसरीकडे, भारतीय रुपयानेही नीचांकी पातळी गाठली असून तो प्रति डॉलर ९३.९७ या स्तरावर बंद झाला.

बाजारातील सर्वच क्षेत्रीय निर्देशांक लाल चिन्हात बंद झाले. रिअल्टी, कॅपिटल गुड्स, कन्झ्युमर ड्युरेबल, मेटल आणि सार्वजनिक क्षेत्रातील बँकांचे समभाग ४ ते ५ टक्क्यांनी घसरले. ऑटो, ऊर्जा, मीडिया आणि खाजगी बँकांच्या समभागांत ३ टक्क्यांची घसरण नोंदवली गेली. निफ्टीमध्ये श्रीराम फायनान्स, ट्रेंट, टायटन आणि जिओ फायनान्स हे प्रमुख घसरणीचे समभाग ठरले. ◂(तभा वृत्तसेवा)

### ५२ आठवड्यांचा नीचांकी स्तर

**सोमवारच्या पडझडीत आयडीबीआय बँक, पेट्रोनेट एलएनजी, आदित्य बिर्ला फॅशन, रिलॅक्सो फुटवेअर, इंडिगो आणि आरईसी यांसारख्या १,००० पेक्षा जास्त कंपन्यांच्या समभागांनी ५२ आठवड्यांचा नीचांकी स्तर गाठला. दरम्यान, इनोव्हिजन या कंपनीची शेअर बाजारात अत्यंत निराशाजनक नोंदणी झाली. ५१९ रुपयांच्या अप्पर प्राईस बॅण्डच्या तुलनेत हा शेअर ३७२.८० रुपयांवर बंद झाला, म्हणजेच यात सुमारे २८ टक्क्यांची घसरण पाहायला मिळाली.**




सोलापूर : ग्रामदैवत शिवयोगी श्रीसिध्दरामेश्वर मंदिरात योगसमाधी सोहळ्या निमित्त सोमवारी दीपोत्सव साजरा करण्यात आला. (छायाः केवल तिवारी)

# राजकीय व प्रशासकीय संगनमत

## खरातप्रकरणी विरोधकांचा आरोप

◆ **मुंबई २३ मार्च**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणावरून राज्याच्या राजकारणात पुन्हा एकदा खळबळ उडाली आहे. या प्रकरणात केवळ संबंधित बाबाच नव्हे, तर त्याला कथितरित्या संरक्षण देणाऱ्या मंत्री व अधिकाऱ्यांवरही कारवाई करण्याची जोरदार मागणी विधानसभेत करण्यात आली. अशोक खरात प्रकरणी सरकारने गंभीर दखल घेतली आहे. महिलांची दिशाभूल करून त्यांच्याशी गैरवर्तवणूक केली गेली. त्यामुळे या प्रकरणी सखोल चौकशी सुरु आहे. सदर प्रकरणाची कारवाई आधीपासूनच सुरु असून याबाबत उद्या सखोल निवेदन सभागृहात केले जाईल, अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिली.

काँग्रेसचे विधिमंडळ नेते विजय वडेट्टीवार यांनी स्थगन प्रस्तावाच्या माध्यमातून सरकारला घेरत, या प्रकरणाची व्याप्ती मोठी असल्याचा आरोप केला. त्यांनी सांगितले की, अशोक खरातने स्वतःला दैवी शक्ती असल्याचे भासवून अनेकांची फसवणूक केली असून महिलांचे शोषण केल्याचे गंभीर आरोप समोर आले आहेत. या प्रकरणात १०० हून अधिक आक्षेपार्ह व्हिडिओ समोर आल्याची माहिती देत वडेट्टीवार यांनी प्रशासनाच्या भूमिकेवरही प्रश्नचिन्ह उपस्थित केले. काही वरिष्ठ अधिकारी एका हॉटेलमध्ये बैठक घेऊन कारवाई टाळण्याचा प्रयत्न करत असल्याचा आरोप त्यांनी केला. ◂(तभा वृत्तसेवा)

### मंत्र्यांनी राजीनामा द्यावा

**महसूल व पोलिस यंत्रणांतील काही अधिकारीही अटकेस विलंब व्हावा यासाठी प्रयत्नशील असल्याचा दावा करत, या संपूर्ण प्रकरणात उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचे संगनमत असल्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली. या पार्श्वभूमीवर, संबंधित मंत्र्यांचा तत्काळ राजीनामा घ्यावा, दोषी अधिकाऱ्यांना निलंबित करावे आणि सर्व संशयितांचे कॉल डिटेल रेकॉर्ड तपासावे, अशी मागणी करण्यात आली. केवळ विशेष तपास पथक नेमून प्रकरणाची चौकशी करण्याची मागणी केली.**

# महाज्योतीच्या प्रकल्प व्यवस्थापकाला बडतर्फ करा

### ओबीसी महामोर्चाचे मुख्यमंत्र्यांना पत्र

◆ **पुणे, २३ मार्च**

महात्मा जोतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती) येथील कौशल्य विकास विभागातील कथित गैरव्यवहार प्रकरणात प्रकल्प व्यवस्थापक कुणाल सिरसाठे यांना तत्काळ बडतर्फ करून तत्कालीन व्यवस्थापकीय संचालक राजेश खवले यांच्या भूमिकेची उच्चस्तरीय चौकशी करण्याची मागणी सकल ओबीसी महामोर्चाने केली आहे. या संदर्भात मुख्यमंत्री, मुख्य सचिव तसेच संबंधित विभागांकडे निवेदन देण्यात आले आहे.

महामोर्चाच्या निवेदनानुसार, सिरसाठे यांनी शासकीय सेवेत असताना स्वतःच्या खाजगी कंपन्या स्थापन करून पदाचा गैरवापर केला. कॉर्पोरेट व्यवहार मंत्रालय आणि जीएसटी नोंदींनुसार, २४ ऑगस्ट २०२३ रोजी 'महास्किल टेक इनोव्हेटिव्ह फाऊंडेशन' ही कंपनी स्थापन करण्यात आली. या कंपनीत ते फेब्रुवारी २०२५ पर्यंत संचालक होते. त्यानंतर त्यांच्या पत्नी तेजल कांबळे यांची संचालक म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचे नमूद करण्यात आले आहे.

तसेच, ५ मे २०२५ रोजी 'इझी रूट एक्सिम' नावाची आणखी एक कंपनी स्थापन करण्यात आल्याचा दावा करण्यात आला आहे. पत्रकार परिषदेनंतर उघडकीस येण्याच्या भीतीने या कंपनीची जीएसटी नोंदणी रद्द करण्यात आली आणि संकेतस्थळही बंद करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. सिरसाठे यांनी तत्कालीन व्यवस्थापकीय संचालकांच्या संगनमताने स्वतःच्या 'महास्किल' कंपनीमार्फत आणि इतर संस्थांच्या माध्यमातून कौशल्य विकास विभागातील कोट्यवधी रुपयांची कामे मिळवली. ◂(तभा वृत्तसेवा)

# भेसळखोरांवर 'मकोका' लावणार : झिरवळ

◆ **मुंबई, २३ मार्च**

अन्नपदार्थांतील भेसळ रोखण्यासाठी राज्यात व्यापक तपासणी मोहीम राबवून दोषींवर मकोका अंतर्गत कठोर कारवाई केली जाणार असल्याची घोषणा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी विधान परिषदेत केली.

राज्यातील नागरिकांच्या आरोग्याशी संबंधित अन्नसुरक्षा अधिक मजबूत करण्यासाठी शासनाने कडक भूमिका घेतली आहे. अन्नपदार्थांमध्ये भेसळ करणाऱ्यांविरुद्ध थेट मकोका अंतर्गत गुन्हे दाखल करण्याचा इशारा अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ यांनी दिला. विधान परिषदेत प्रश्नोत्तराच्या तासात सदस्य डॉ. मनिषा कायंदे यांनी हा मुद्दा उपस्थित केला होता. यावर चर्चा करताना सदस्य भाई जगताप, ॲड. अनिल परब, अमोल मिटकरी आणि कृपाल तुमाने यांनीही उपप्रश्न विचारत सहभाग नोंदवला. मंत्री झिरवाळ यांनी सांगितले की, वसई आणि अंधेरी परिसरात अन्न व औषध प्रशासनाने अलीकडेच टाकलेल्या छाप्यांमध्ये दुधातील भेसळ प्रकरण उघडकीस आले असून १४ जणांविरुद्ध गुन्हे दाखल करण्यात आले. ◂(वृत्तसंस्था)

# महाराष्ट्रात १३ वर्षांत भोंदूगिरीचे दोन हजार गुन्हे

## ● महिलांचे होते सर्वाधिक शोषण ● गुन्हे उघडकीस येण्याच्या प्रमाणात वाढ

◆ **मुंबई, २३ मार्च**

महाराष्ट्रात अंधश्रद्धा आणि भोंदूगिरीविरुद्ध जादूटोणाविरोधी कायदा लागू होऊन १३ वर्षे झाली आहेत. या काळात राज्याने सुमारे दोन हजारांहून अधिक भोंदूबाबा आणि मांत्रिकांवर गुन्हे दाखल झाले आहेत. मागील दशकात दरवर्षी सरासरी ७० ते १०० महिलांनी भोंदूबाबांकडून होणाऱ्या शारीरिक आणि मानसिक शोषणाविरुद्ध तक्रारी नोंदवल्या आहेत.

अंधश्रद्धा निर्मूलन समिती आणि महाराष्ट्र पोलिसांच्या आकडेवारीनुसार, मुंबईसह ठाणे, पालघर, पुणे, नाशिक, नागपूर आणि छत्रपती संभाजीनगर या जिल्ह्यांमध्ये जादूटोणाविरोधी कायद्यांतर्गत गुन्हे नोंदवले आहेत. आजार बरे करणे, गुप्तधनाचा मोह, अपत्यप्राप्ती किंवा कौटुंबिक कलह दूर करण्याच्या नावाखाली महिलांना जाळ्यात ओढून दैवी शक्ती किंवा कोपाची भीती दाखवली जाते.



यासर्वांमध्ये महिलांचे सर्वाधिक शोषण होते. नॅशनल क्राइम रेकॉर्ड ब्युरो आणि महाराष्ट्र पोलिसांच्या आकडेवारीनुसार, सुरुवातीला गुन्हे दाखल करण्याचे प्रमाण कमी होते, परंतु जनजागृतीमुळे तक्रार करणाऱ्यांचे प्रमाण वाढले. महाराष्ट्रात जादूटोणाविरोधी कायद्यामुळे पीडितांना तक्रार करण्याचे बळ मिळाले आहे. मात्र, पुराव्यांचा अभाव आणि साक्षीदार फितूर होण्यामुळे शिक्षेचे प्रमाण अजूनही आव्हानात्मक आहे. कायद्यात सहा महिने ते सात वर्षांपर्यंतच्या कारावासाची तरतूद असली तरी सामाजिक भीतीपोटी अनेक महिला तक्रार करण्यास पुढे येत नाहीत. प्रत्यक्षात घडणाऱ्या घटनांची संख्या ही नोंदवलेल्या गुन्ह्यांपेक्षा तीन ते चार पटीने जास्त असण्याची भीती तज्ज्ञांनी व्यक्त केली आहे. अंधश्रद्धा निर्मूलन समितीच्या कार्यकर्त्यांकडे दररोज तक्रारी येतात. पण लोक तक्रार दाखल करायला तयार नसतात. ◂(वृत्तसंस्था)

### कायद्याचे रुपांतर नियमात होणे आवश्यक

**महाराष्ट्रात जादूटोणा कायदा २०१३ रोजी तयार झाल्यानंतर अनेक प्रकरणे बाहेर आली आहेत. यामध्ये महिलांच्या शोषणाच्या गुन्ह्यांचे प्रमाण मोठे आहे. या कायद्यात पोलिसांनी गुन्हा दाखल करण्याची तरतूद आहे. पण काही वेळा पोलिसदेखील तक्रारदार व्हायला तयार नसतात. कायदा झाला असला तरी कायद्याचे नियम झालेले नाही.**

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा,
छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली,
जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर
(कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्वाचे...



### सांगोला महाविद्यालयात शहीद दिन साजरा

**सांगोला, दि. २३ मार्च -**

सांगोला महाविद्यालयात येथील आय.क्यु.ए.सी विभागाच्या वतीने शहिद दिन साजरा करण्यात आला. याप्रसंगी शहिद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून त्यांना आदरांजली वाहण्यात आली. भारतीय स्वातंत्र्य लढ्याच्या इतिहासात शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचे योगदान महत्त्वाचे आहे. आजच्या तरूण पिढीत देशभक्तीची भावना विचार रूजावेत या हेतूने हा दिवस देशभर सर्वत्र साजरा केला जातो. सर्वांनी त्यांच्या कार्याचा आदर्श घ्यावा असे मत प्र.प्राचार्य डॉ.सुरेश भोसले यांनी यावेळी व्यक्त केले. सदर कार्यक्रमाचे नियोजन डॉ.सदाशिव देवकर, बाबासो इंगोले यांनी केले.

### विजापूर रोडवरील आर मिनीप्लेक्स येथे बेकायदेशीर पार्किंग शुल्क

**नगरसेवक वाघमोडे यांची महापालिका आयुक्तांकडे तक्रार**

**सोलापूर, दि.२३ मार्च-**

शहरातील विजापूर रोडवरील विशाल नगर परिसरातील आर मिनीप्लेक्स चित्रपटगृह परिसरात पार्किंगसाठी बेकायदेशीर शुल्क आकारले जात असल्याचा प्रकार समोर आला आहे. याबाबत नगरसेवक सत्यजित वाघमोडे यांनी महापालिका आयुक्तांकडे तक्रार दाखल केली आहे. संबंधित ठिकाणी वाहन पार्क केल्यानंतर नागरिकांकडून दुचाकीसाठी १० रुपये आणि चारचाकीसाठी २० रुपये इतके शुल्क आकारले जात आहे. याबाबत दिलेली पावती (बिल नंबर २१५१) देखील तक्रारीसोबत जोडण्यात आली आहे.या पार्किंग शुल्कासाठी संबंधित संस्थेकडे महानगरपालिकेची अधिकृत परवानगी आहे की नाही, याबाबत प्रश्नचिन्ह उपस्थित झाले असून, नागरिकांची आर्थिक लूट होत असल्याचा आरोप केला आहे. महापालिका अंदाजपत्रक बैठकीदरम्यान पार्किंग चार्जेस वर चर्चा सुरु असताना भूमी व मालमत्ता विभागास याबाबत विचारणा केली असता त्यांना या शुल्क आकराणीची माहिती नसल्याचे अधिकाऱ्यांनी स्पष्ट केले आहे. या प्रकरणामुळे शहरातील पार्किंग व्यवस्थेवर प्रश्नचिन्ह निर्माण झाले आहे. या प्रकरणाची सखोल चौकशी करून, जर शुल्क आकारणी बेकायदेशीर आढळली तर संबंधितांवर कठोर कारवाई करावी. नागरिकांची होत असलेली आर्थिक लूट तात्काळ थांबवावी, अशी मागणी नगरसेवक वाघमोडे यांनी केली आहे.

### तृतीयपंथीयांच्या सक्षमीकरणासाठी बीज भांडवल योजना लागू

**सोलापूर, दि. २३ मार्च-**

सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या शासन निर्णयानुसार राज्यातील तृतीयपंथीय घटकाच्या सर्वांगीण विकासासाठी स्वयंरोजगार व व्यवसाय संधी उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने बीज भांडवल योजना राबविण्यास मान्यता देण्यात आलेली आहे. या योजने अंतर्गत तृतीयपंथीय व्यक्तींना लघु व्यवसाय सुरू करण्यासाठी आर्थिक सहाय्य देण्यात येणार असून, बँक कर्ज वा शासन अनुदानाच्या माध्यमातून व्यवसाय उभारणीस प्रोत्साहन दिले जाणार आहे. या योजनेतून तृतीयपंथीय व्यक्तींना स्वयंरोजगारासाठी आर्थिक मदत मिळणार आहे. तर यासाठी लाभार्थ्याचा ५% हिस्सा, ४५% शासन अनुदान व ५०% बँक कर्ज असे स्वरूप राहणार आहे. विविध लघु व्यवसाय जसे भाजी स्टॉल, जनरल स्टोअर्स, बेकरी, ब्युटी पार्लर, मोबाईल दुरुस्ती इ. साठी सहाय्य देण्यात येईल. यासाठी लाभार्थी महाराष्ट्र राज्यात किमान १० वर्षे वास्तव्यास असावा, त्याचे वय १८ ते ५० वर्षे असावे, सक्षम प्राधिकाऱ्याचे तृतीयपंथीय ओळखपत्र आवश्यक, अर्जदाराकडे व्यवसाय करण्याची क्षमता असावी. तरी इच्छुक तृतीयपंथीय लाभार्थ्यांनी शासनाने निर्धारित नमुन्यात अर्ज करून आवश्यक कागदपत्रांसह सहायक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर कार्यालयात सादर करावेत, असे आवाहन सुलोचना सोनवणे सहायक आयुक्त, समाज कल्याण, सोलापूर यांच्याकडून करण्यात येत आले आहे.



### श्री शिवाजी महाविद्यालयात भगतसिंग, सुखदेव व राजगुरु यांना अभिवादन

**बार्शी, दि. २३ मार्च-**

भारत हा युवकांचा देश आहे. विकसित भारताचे स्वप्न युवक घडवू शकतात, असा आशावाद शहीद दिनानिमित्त मांडण्यात आला. येथील श्री शिवाजी महाविद्यालयात युवकांसाठी मार्गदर्शनपर व्याख्यानात डॉ. राहुल पालके हे बोलत होते. या कार्यक्रमास अध्यक्ष म्हणून प्राचार्य डॉ. ए. बी. शेख व सार्वजनिक उत्सव समितीचे चेअरमन डॉ. एस. बी. शिंदे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. डॉ. राहुल पालके यांनी आपल्या व्याख्यानपर मार्गदर्शनात भगतसिंग, सुखदेव थापर आणि शिवराम राजगु या क्रांतिकारकांच्या देशभक्तीच्या कार्याचा सविस्तर आढावा घेतला. त्यांनी हिंदुस्थान सोशॅलिस्ट रिपब्लिकन असोसिएशन या संघटनेची भूमिका स्पष्ट केली. केंद्रीय कायदे मंडळातील बॉम्बस्फोट प्रकरण, सेफ्टी बिल, ट्रेड डेस्पूट बिल आणि लाहोर षडयंत्र या ऐतिहासिक घटनांची माहिती दिली. या त्रयींचे कार्य आजच्या युवकांसाठी आदर्श कसे आहे आणि त्याची समकालीन उपयुक्तता काय आहे यावरही त्यांनी सखोल मार्गदर्शन केले. अध्यक्षीय भाषणात प्राचार्य डॉ. ए. बी. शेख यांनी त्याग, संघर्ष आणि राष्ट्रभक्ती याचे महत्त्व अधोरेखित केले. त्यांनी शहदींच्या कार्याचे स्मरण करून समकालीन सामाजिक व राष्ट्रीय घडामोडींचा संदर्भ देत युवकांना जबाबदार नागरिक बनण्याचे आवाहन केले. कार्यक्रमास महाविद्यालयातील प्राध्यापक, कर्मचारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाच्या शेवटी उपस्थितांनी शहीदांच्या स्मृतींना अभिवादन करुन त्यांच्या आदर्शांचा अंगीकार करण्याचा संकल्प व्यक्त केला.

# मनपा अंदाजपत्रक : विभागनिहाय आढावा बैठक

## पहिल्या दिवशी कर आकारणी, कर संकलन अन् भूमी व मालमत्ता विभागांवर चर्चा

### प्रत्येक विभागाने जबाबदारीने, पारदर्शकतेने काम करण्याची गरज : महापौर विनायक कोंड्याल

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च -**

सोलापूर महापालिकेच्या वार्षिक अंदाजपत्रकासंदर्भातील विभागनिहाय आढावा बैठक छत्रपती राजर्षी शाहू महाराज जिमखाना येथे दि. २३ ते २९ मार्च २०२६ या कालावधीत दररोज सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजेपर्यंत आयोजित करण्यात आली आहे. दरम्यान, आज सोमवारी पहिल्या दिवशी कर आकारणी, कर संकलन आणि भूमी व मालमत्ता विभाग या दोन विभागांचा आढावा घेण्यात आला.

या बैठकीस महापौर विनायक कोंड्याल, उपमहापौर ज्ञानेश्वरी देवकर, सभागृह नेते नरेंद्र काळे, स्थायी समिती सभापती रंजिता चाकोते, महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, शहर अध्यक्ष तथा नगरसेविका रोहिणी तडवळकर , उपायुक्त आशिष लोकरे यांची प्रमुख उपस्थिती होती. यावेळी नगरसेवक, नगरसेविका व संबंधित विभागांचे अधिकारी यांच्या माध्यमातून अंदाजपत्रकाचा विभागनिहाय आढावा घेण्यात येत आहे. बैठकीदरम्यान विविध विभागांच्या कामकाजाचा आढावा घेऊन प्रलंबित कामे तातडीने पूर्ण करण्याचे निर्देश महापौर विनायक कोंड्याल यांनी दिले आहेत.

विविध विभागांसाठी निश्चित करण्यात आलेले वेळापत्रक असे सोमवार दि. २३ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते १२ वाजता कर आकारणी व कर संकलन विभाग तसेच भूमी व मालमत्ता विभाग - दुपारी २ ते ६ वाजता चर्चा करण्यात आली आहे. त्यानंतर दि. २४ मार्च २०२६ रोजी सकाळी १० ते १ वाजता मंडई व कोंडवाडा विभाग तसेच आरोग्य व घनकचरा व्यवस्थापन विभाग दुपारी २ ते ६) यांचा आढावा घेतला जाणार आहे. दि. २५ मार्च २०२६ रोजी नगर अभियंता तथा संचालक नगर रचना (बांधकाम परवाना विभाग) तसेच विद्युत विभाग - सकाळी १० ते १२, सामान्य प्रशासन विभाग - दुपारी २ ते ४ वाजता , उद्यान विभाग - दुपारी ४ ते ६ वाजता यांच्यावर चर्चा होणार आहे. दि. २६ मार्च २०२६ रोजी सार्वजनिक आरोग्य अभियंता विभाग - सकाळी १० ते २ तसेच झोन क्र. १ ते ८ - दुपारी २ ते ६ वाजेपर्यंत यावर चर्चा करण्यात येणार आहे. दि. २७ मार्च २०२६ रोजी परिवहन विभाग - सकाळी १० ते २ वाजता तसेच मनपा प्राथमिक शिक्षण मंडळ - दुपारी २ ते ६ वाजता यांचा आढावा घेतला जाणार आहे. दि. २८ मार्च २०२६ रोजी महिला व बाल कल्याण, मुख्यलेखापरीक्षक, नगरसचिव, पशुवैद्यकीय व दिव्यांग कल्याण विभाग - सकाळी १० ते सायंकाळी ६ वाजता यांच्यावर चर्चा होणार आहे.



#### शहर विकासासाठी अंदाजपत्रक अत्यंत महत्त्वाचे : महापौर कोंड्याल

यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांनी मार्गदर्शन केले. ते म्हणाले, सोलापूर शहराच्या विकासासाठी हे अंदाजपत्रक अत्यंत महत्त्वाचे असून प्रत्येक विभागाने जबाबदारीने व पारदर्शकतेने काम करणे गरजेचे आहे. नागरिकांना अधिक चांगल्या सुविधा देण्यासाठी नियोजनबद्ध पद्धतीने निधीचा वापर करून विकासकामांना गती देण्यात येईल.नागरिकाभिमुख धोरणे राबवून शहराच्या सर्वांगीण विकासासाठी समन्वयाने काम करण्याचा विश्वास महापौर विनायक कोंड्याल यांनी व्यक्त केला आहे.

#### महापालिकेची सोमवारी अंदाजपत्रकीय सभा

सोलापूर महापालिकेची अंदाजपत्रकीय सभा सोमवार दि. ३० मार्च रोजी सकाळी ११.३० वाजता कौन्सिल हॉल सभागृहात आयोजित करण्यात आली आहे. या सभेत स्थायी समिती सभापती रंजीता चाकोते या अंदाजपत्रक सादर करणार आहेत.

## जिल्हास्तरीय कृषी व धान्य महोत्सवाचे उद्घाटन

### प्रथम सत्रामध्ये ५५ हजाराची झाली विक्री

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

येथील हुतात्मा स्मृती मंदिरात महाराष्ट्र शासनाच्या कृषि विभागामार्फत आयोजित कृषि व धान्य महोत्सवाचे उद्घाटन बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपरे यांच्या हस्ते करण्यात आले. आयोजित कृषि व धान्य महोत्सवामध्ये सेंद्रीय गुळ, काकवी, मंगळवेढा ज्वारी, सोलापूरी हुरडा व जांभुळ कुल्फी, ज्वारी बिस्कीटे, केळी व शेवगा पावडर, मध, वाळवण पदार्थ, ड्रायर भाजीपाला, मल्टीमिलेट आटा, कडक भाकरी यावर आधारित खादय पदार्थांची एकूण ४६ स्टॉल उभारण्यात आले. तसेच कृषि विभागामार्फत उत्कृष्ठ फळे व फुलांचे नमुन्यांचा स्टॉल लावण्यात आला होता. उभारण्यात आलेल्या स्टॉलच्या माध्यमातून प्रथम सत्रामध्ये ५५ हजार रुपयाची विक्री झाली.

सदर महोत्सवामध्ये कृषि विभागाच्या विविध योजनांमध्ये उत्कृष्ठ कार्य करणारे अधिकारी/कर्मचारी त्याचबरोबर रब्बी पिक स्पर्धा २०२४ विजेते महिला शेतकरी, शेतकरी ते ग्राहक थेट विक्री करणारे हुरडा उत्पादक शेतकरी, विक्रमी उत्पादन घेणारे उस उत्पादक शेतकरी यांना मान्यवरांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. उद्धघाटन प्रसंगी बीजमाता पद्मश्री राहीबाई पोपरे यांनी उपस्थितांना देशी बियाणे, पारंपारिक वाण संवर्धन व दुर्मिळ होत चाललेल्या स्थानिक प्रजातींचे संवर्धन याबाबत सविस्तर मार्गदर्शन केले. सदर महोत्सवास सोलापूर शहरातील नागरिकांचा चांगला प्रतिसाद देत आहेत.

त्यानंतर तांत्रिक सत्रामध्ये पौष्टीक तृणधान्य व भरडधान्य यांचे लागवड तंत्रज्ञान, प्रक्रिया उदयोग,



विपणन व विक्री व्यवस्थापन याबाबत मार्गदर्शन करण्यात आहे. सदर कार्यक्रमास दत्तात्रय गावसाने, विभागीय कृषि सहसंचालक, पुणे विभाग, पुणे, राजीव मराठे, संचालक, डाळींब संशोधन केंद्र, लालासाहेब तांबडे, प्रमुख शास्त्रज्ञ, कृषि विज्ञान केंद्र, बसवराज रायगोंडा, प्रमुख शास्त्रज्ञ, ज्वारी संशोधन केंद्र, सोलापूर, शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सोलापूर, अभिजीत धेडे, कृषि उपसंचालक, सोलापूर, सर्व उपविभागीय कृषि अधिकारी, तालुका कृषि अधिकारी, मंडळ कृषि अधिकारी, उप कृषि अधिकारी व सह. कृषि अधिकारी व इतर कर्मचारी वृंद उपस्थित होते. कृषि व धान्य महोत्सवाचे आयोजन हे दि.२३ मार्च २०२६ ते २५ मार्च २०२६ पर्यंत करण्यात आलेले असून महोत्सवाची वेळ सकाळी. १०.०० ते रात्री ९.०० अशी आहे. सोलापूरमधील नागरिकांनी महोत्सवाचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा. असे आवाहन शुक्राचार्य भोसले, जिल्हा अधिक्षक कृषि अधिकारी, सोलापूर यांनी केले आहे.



## डॉ.आंबेडकर जयंतीनिमित्त सोयी-सुविधा उपलब्ध करा

### बोधिसत्व डॉ. आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळातर्फे महापौर कोंड्याल यांना निवेदन

### पुतळा, संविधान भवन परिसर सुशोभीकरणासह १४ मागण्याचा समावेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

सोलापूर : विश्वरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त आवश्यक सोयी-सुविधा उपलब्ध करून देण्यात याव्यात यासह विविध १४ मागण्याचे निवेदन बोधिसत्व डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंती उत्सव मध्यवर्ती महामंडळाच्या वतीने महापौर विनायक कोंड्याल यांना देण्यात आले.

दरवर्षीप्रमाणे जयंतीनिमित्त सोलापूर जिल्हा व तालुक्यातील भीमसैनिक, विविध राजकीय पक्षांचे पदाधिकारी-कार्यकर्ते, सर्व जातीधर्मातील नागरिक, तसेच खासदार, आमदार, अधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित राहून डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पूर्णाकृती पुतळ्यास अभिवादन करतात. या पार्श्वभूमीवर पुतळा परिसर व मागील संविधान भवन (नार्थकोट मैदान) शाळेच्या जागेचा सर्वांगीण विकसित करावे अशी मागणी करण्यात आली.

महामंडळाचे विश्वस्त समिती अध्यक्ष आनंद चंदनशिवे, विश्वस्त बाळासाहेब वाघमारे व इतर पदाधिकाऱ्यांनी दिलेल्या निवेदनात पुतळा परिसर व सम्राट अशोक स्तंभ परिसराचे सुशोभीकरण, मंडप व लाईट व्यवस्था, पुतळ्याचे रंगकाम, नामफलक दुरुस्ती, पिण्याच्या पाण्याच्या आरओ मशिनची दुरुस्ती किंवा नवीन बसविणे, ग्रील गेट व पायऱ्यांवरील ग्रील दुरुस्ती, फोकस लाईट सुरू करणे आदी मागण्या मांडल्या आहेत.

पुतळ्याच्या पाठीमागील नियोजित संविधान भवन (नार्थकोट मैदान) शाळेच्या सुमारे १ एकर जागेवर स्वच्छता मोहीम राबविणे, वॉल कंपाऊंडला रंगरंगोटी, स्लोगन दुरुस्ती, काटेरी झुडपे हटविणे, नवीन इलेक्ट्रिक बोअर मारणे, रोड रोलर फिरविणे, कट्टा उभारणे आदी कामे करण्याची मागणीही केली आहे. यावेळी महापौर विनायक कोंड्याल यांचा शाल व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी विश्वस्त अध्यक्ष आनंद चंदनशिवे, बाळासाहेब वाघमारे, मिलिंद प्रक्षाळे, शांतीकुमार नागटिळक, विकी शेंडगे, दयानंद बनसोडे, आशुतोष नाटकर, दीपक गवळी, बाळासाहेब बनसोडे, दिना मेंबर, चाचा सोनवणे, दत्ता शिंदे, अनिल कोणे, प्रदीप गवळी तसेच इतर कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## उद्यापासून दोन दिवस झेडपीत मॅरेथॉन बैठका

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च -**

जिल्हा परिषद अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी सर्व विभागांकडून गेल्या चार वर्षांतील कामांचा सविस्तर अहवाल मागवल्यानंतर मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांनी तातडीने हालचाली सुरू केल्या आहेत. यासाठी बुधवार दि.२५ व गुरूवार दि.२६ मार्च रोजी दोन दिवस मॅरेथॉन आढावा बैठका आयोजित करण्यात आल्या असून, सर्व विभागप्रमुखांना अद्ययावत माहिती व पॉवरपॉईंट सादरीकरणासह उपस्थित राहण्याचे आदेश देण्यात आले आहेत. विशेष म्हणजे या बैठका अध्यक्ष व उपाध्यक्षांच्या उपस्थितीत होणार आहेत.

बुधवार दि.२५ मार्च रोजी सामान्य प्रशासन, महिला व बालविकास, बांधकाम-१, बांधकाम-२, लघुपाटबंधारे, समाजकल्याण, पशुसंवर्धन व कृषी विभागांचा टप्प्याटप्प्याने आढावा घेतला जाणार आहे तर गुरुवार, २६ मार्च रोजी ग्रामपंचायत, पाणी व स्वच्छता, अर्थ, शिक्षण (प्राथमिक व माध्यमिक), आरोग्य तसेच ग्रामीण पाणी पुरवठा विभागांची बैठक होणार आहे.

२६ मार्च रोजी रामनवमीची सार्वजनिक सुट्टी असतानाही ही बैठक घेण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. कोणत्याही परिस्थितीत २६ तारखेपर्यंत सर्व माहिती संकलित करण्याच्या सूचना सीईओ जंगम यांनी दिल्या असून, याबाबतचे अधिकृत पत्र सर्व विभाग प्रमुखांना पाठवण्यात आले आहे. नवीन नेतृत्वाने कामकाजात पारदर्शकता व गती आणण्यावर भर दिल्यामुळे प्रशासन सतर्क झाले असून, या बैठकीतून अनेक प्रलंबित बाबींचा उलगडा होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.

## पाण्यावरून भाऊबंदकी पेटली!

### कोयत्याने जीवघेणा हल्ला; तिघांविरुद्ध गुन्हा

**तभा वृत्तसेवा,**
**टेंभुर्णी, दि.२३ मार्च -**

''पाणी अडवा, वाद वाढवा'' म्हणत माढा तालुक्यातील वेणेगाव येथे सख्ख्या भावांमध्ये पाण्याच्या वादातून थेट जीवघेण्या हल्ल्यापर्यंत प्रकरण पोहोचल्याने परिसरात खळबळ उडाली आहे. या घटनेत कोयत्याने वार करून भावाला गंभीर जखमी करण्यात आले असून तिघांविरुद्ध टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी सुनिल लक्ष्मण जठार (वय ३६, व्यवसाय शेती, रा. जठार वस्ती, वेणेगाव, ता. माढा) यांच्या शेतातील सामाईक पाण्याच्या पाईपलाईनवरून हा वाद पेटला. दि. २२ मार्च २०२६ रोजी दुपारी सुमारे १२.३० वाजण्याच्या सुमारास पाण्याचा कॉक बंद करण्याच्या कारणावरून दोन्ही भावांमध्ये जोरदार बाचाबाची झाली.

''रक्ताच्या नात्यालाच पाणी पाजणारा'' असा हा वाद चिघळत गेला आणि संतापाच्या भरात लहान भाऊ महादेव लक्ष्मण जठार (वय ३४) याने हातातील कोयत्याने सुनिल जठार यांच्या मानेवर व डाव्या हातावर सपासप वार केले. या हल्ल्यात सुनिल जठार गंभीर जखमी झाले.

इतकेच नव्हे, तर आरोपीची पत्नी धनश्री महादेव जठार (वय ३०) व मुलगा आर्यन महादेव जठार (वय १६) यांनीही शिवीगाळ, दमदाटी करत हाताने मारहाण केली. या मारहाणीत फिर्यादी व त्यांच्या पत्नीला दुखापत झाली असून, ''जिवे मारण्याचा प्रयत्न'' केल्याचा गंभीर आरोप करण्यात आला आहे.

जखमी अवस्थेत सुनिल जठार यांना तत्काळ रुग्णालयात दाखल करण्यात आले. उपचार सुरू असल्याने तक्रार देण्यास विलंब झाला. अखेर दि. २३ मार्च रोजी पहाटे ३.४५ वाजता टेंभुर्णी पोलीस ठाण्यात गुन्हा क्रमांक १६९/२०२६ नोंदविण्यात आला.

या प्रकरणी बीएनएस कलम १०९, ९५, ११५(२), ३५२, ३५१(३), ३(५) तसेच शस्त्र अधिनियम कलम ४ व २५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला असून, हल्ल्यासाठी वापरलेले हत्यार कोयता असल्याचे पोलिसांनी स्पष्ट केले आहे.

''थेंबाथेंबातून सागर भरतो, पण त्याच पाण्यावरून वाद पेटल्यास नातेसंबंधांची राख होते,'' अशी चर्चा गावात रंगली असून या घटनेमुळे वेणेगाव परिसरात तणावाचे वातावरण निर्माण झाले आहे.

या घटनेचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक स्वाती सुरवसे करीत असून, अंमलदार पोसई/मदने यांनी गुन्हा दाखल केला आहे.

## कामे वेळेत पूर्ण करा; १०० टक्के निधी खर्च करा

### जि.प. बांधकाम समिती बैठकीत अध्यक्ष दीपक वैद्य यांचे निर्देश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च**

जिल्हा परिषद सोलापूरच्या बांधकाम समितीची मासिक सर्वसाधारण सभा सोमवारी २३ मार्चला शिवरत्न सभागृहात जि.प. अध्यक्ष दिपक वैद्य यांच्या अध्यक्षतेखाली झाली. यावेळी उपाध्यक्ष इंद्रजित पवार, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी संदीप कोहिनकर, बांधकाम विभागाचे कार्यकारी अभियंते कुलकर्णी, खराडे आदी उपस्थित होते.



याबैठकीत बांधकाम विभागामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांची सविस्तर माहिती सादर करण्यात आली. योजनांच्या अंमलबजावणीची कार्यपद्धती, प्रगती व अडचणी यावर सखोल चर्चा करण्यात आली. विशेषतः सन २०२४-२५ या आर्थिक वर्षातील योजनानिहाय मंजूर कामांचा लेखाशीर्षनिहाय आढावा घेण्यात आला.

अध्यक्ष व उपाध्यक्षांनी सर्व संबंधित अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना देत मंजूर कामे विहित कालावधीत पूर्ण करण्यावर भर दिला. तसेच उपलब्ध निधीचा पूर्ण क्षमतेने वापर करून १०० टक्के खर्च साध्य करण्याचे निर्देश देण्यात आले.

ग्रामीण भागातील शाळा, प्राथमिक आरोग्य केंद्रे आणि अंगणवाड्यांमधील स्वच्छतागृहांची स्थिती सुधारण्यावरही बैठकीत विशेष लक्ष केंद्रित करण्यात आले. या ठिकाणच्या स्वच्छतागृहांची गुणवत्ता चांगली ठेवण्यासाठी आवश्यक ती उपाययोजना तातडीने राबवाव्यात, अशा सूचना देण्यात आल्या. शिक्षण क्षेत्राच्या दृष्टीने अधिकाधिक विद्यार्थ्यांना सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी नवीन शाळा मंजुरीचे प्रस्ताव मोठ्या प्रमाणावर सादर करण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच ज्या ठिकाणी शाळा इमारती व वर्गखोल्या मंजूर असून त्या जीर्ण अवस्थेत आहेत, अशा प्रकरणांमध्ये शासन निर्णयानुसार तात्काळ निर्लेखनाची कार्यवाही करण्याचे आदेश देण्यात आले.

यासोबतच मंजूर शाळा खोल्यांचे बांधकाम तातडीने पूर्ण करून विद्यार्थ्यांना सुरक्षित व दर्जेदार सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात आला. या बैठकीत जिल्ह्यातील बांधकाम कामांना गती देणे, गुणवत्ता सुधारणा आणि निधीचा प्रभावी वापर यावर प्रशासनाने ठोस भूमिका घेतल्याचे स्पष्ट झाले.

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले.
विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# तर आम्ही राजीनामे देऊ

## शिवसेना मंत्र्यांची भूमिका ● सातारा जिल्हा परिषद प्रकरण विधिमंडळात गाजले

◆ **मुंबई, २३ मार्च**

सातारा जिल्हा परिषद अध्यक्ष निवडणुकीदरम्यान झालेल्या राड्याचे तीव्र पडसाद आज विधिमंडळात उमटले. या पृष्ठभूमीवर शिवसेना मंत्री आणि आमदारांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या दालनात बैठक घेऊन आक्रमक भूमिका घेतली. दुय्यम वागणूक दिली जात असेल तर आम्ही राजीनामे देऊ, असा इशारा शिवसेना नेत्यांनी दिला.

शिवसेनेचे मंत्री शंभूराज देसाई यांनी साताऱ्यातील घटनेवर गंभीर आरोप करत, १०० पोलिसांनी हल्ला केला; मंत्र्याला आरोपीसारखी वागणूक देण्यात आली, असा दावा दोन्ही सभागृहात मांडला. या घटनेमुळे शिवसेना आमदार आणि मंत्र्यांमध्ये तीव्र नाराजी पसरली असून, सत्ताधाऱ्यांनाच अपमानास्पद वागणूक मिळत असल्याची तक्रार करण्यात आली. बैठकीत अनेक आमदारांनी सातत्याने गळचेपी होत आहे, हे सहन केले जाणार नाही, असे स्पष्ट करत संताप व्यक्त केला. उपमुख्यमंत्री शिंदे यांनीही या प्रकाराबाबत नाराजी व्यक्त केल्याचे समजते.

याचदरम्यान, विधान परिषदेत आरोप-प्रत्यारोपांची जोरदार फैरी झडल्या. त्यामुळे कामकाज काही काळ स्थगित करण्यात आले. त्यानंतर भाजप नेते मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या दालनात, तर शिवसेना नेते शिंदे यांच्या दालनात बैठकीसाठी दाखल झाले. सातारा जिल्हा परिषद निवडणुकीत संख्याबळ नसतानाही भाजपने अध्यक्षपद मिळवल्याचा आरोप शिवसेनेकडून करण्यात आला असून, या प्रकरणात कोणतीही तडजोड होणार नाही, असा ठाम पवित्रा भाजपने घेतला आहे. त्यामुळे या मुद्यावरून राज्यातील राजकारण अधिक तापण्याची चिन्हे दिसत आहेत.

### संपूर्ण प्रकरणाची चौकशी करून कारवाई करण्यात येईल : मुख्यमंत्री



शिवसेना आमदार अर्जुन खोतकर यांनी विधानसभेत सातारा प्रकरण उपस्थित केलं. त्यावर शंभूराज देसाई यांनी मला मारहाण झाली, रक्त लागल्याचे सांगितले. त्यानंतर स्वतः उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी देखील पोलिस अधीक्षक तुषार दोशी, महासंचालक सदानंद दाते यांच्यासोबत बोललो त्यांनी असं काही होणार नाही, कोणालाही मतदानापासून वंचित रहावे लागणार नाही, अशी हमी दिली. पण त्यांनी अत्यंत दुर्दैवी प्रकार केला. याचा मी साक्षिदार असल्याचे सांगितले. तेव्हा या संपूर्ण प्रकरणाची सखोल चौकशी केली जाईल आणि चौकशी अंती जे समोर येईल त्यानुसार कारवाई केली जाईल, असे आश्वासन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सभागृहात दिले. ■




### सातारा पोलिस अधीक्षक तुषार दोशींच्या निलंबनाचे निर्देश

या प्रकरणाची गंभीर दखल घेत विधान परिषदेच्या उपसभापती नीलम गोऱ्हे यांनी सातारा पोलिस अधीक्षक तुषार दोशी यांच्या निलंबनाचे निर्देश दिले. तसेच संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याचे आदेश देत चौकशीसाठी विभागीय आयुक्तांना निर्देश त्यांनी दिले. दरम्यान, भाजपाकडूनही या प्रकरणावर जोरदार प्रतिवाद करण्यात आला. मंत्री जयकुमार गोरे यांनी निलंबनाच्या निर्णयावर आक्षेप घेत, कोण बरोबर आणि कोण चूक हे न्यायालय ठरवेल. पूर्ण माहिती घेतल्याशिवाय कारवाई करणे योग्य नाही, असे मत व्यक्त केले. ◂(तभा वृत्तसेवा)



# राज्यात पुन्हा कोसळणार पाऊस

## मराठवाडा, दक्षिण-मध्य महाराष्ट्राला इशारा



◆ **मुंबई, २३ मार्च**

महाराष्ट्रात मागील काही दिवसांपासून हवामानात सतत बदल होत आहे. मार्च महिना संपत असतानाही पाऊस पडतोच आहे. या अवकाळी पावसामुळे पिकांचे मोठे नुकसान होते आहे. यामध्येच आता पुन्हा एकदा भारतीय हवामान विभागाने पावसाचा इशारा दिला आहे.

राज्यात अवकाळी पावसाचे सावट कायम आहे. मराठवाडा, दक्षिण मध्य महाराष्ट्र या भागात अवकाळी पाऊस पडण्याची शक्यता आहे. यासोबतच राज्यातील इतर भागात उन्हाचा चटका अधिक तीव्र होणार आहे. भारतीय हवामान विभागाने सांगली, सातारा, धाराशिव, लातूर, सोलापूर या भागात पावसाचा इशारा दिला आहे. कोकणात उष्ण आणि दमट हवामानाचा इशारा असला तरीही राज्यातील इतर भागात ढगाळ वातावरणासह पाऊस येण्याची शक्यता आहे. राज्यासह देशातील अनेक भागात पाऊस पडणार आहे. या अवकाळी पावसाने हातात तोंडाशी आलेला घास हिरावून घेतला आहे. शेतकरी हतबल झाला असून नुकसान भरपाईची मागणी शेतकऱ्यांनी केली आहे. ◂(वृत्तसंस्था)

### कांदा, गहू, द्राक्ष शेतीचे नुकसान

**» निफाड तालुक्यात १८ मार्च रोजी झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपीटने सहा गावातील ३९६ शेतकऱ्यांचे १६५ हेक्टरवरील कांदा, गहू, द्राक्ष शेतीचे नुकसान झाले तर दुसऱ्या दिवशी १९ मार्च रोजी १६ गावातील १३६४ शेतकऱ्यांचे ६२२ हेक्टर क्षेत्रावरील द्राक्ष, कांदा, गहू, मिर्ची पिकांचे नुकसान झाले.** ■

## महत्त्वाचे

### सोनाक्षी सिन्हाची न्यायालयात धाव

**मुंबई** : बॉलीवूड अभिनेत्री सोनाक्षी सिन्हा सध्या तिच्या आगामी वेब सीरीज 'सिस्टम'मुळे चर्चेत आहे. नुकताच या मालिकेचा टीझर प्रदर्शित करण्यात झाला आहे. एका प्रकरणी तिला दिल्ली उच्च न्यायालयात धाव घ्यावी लागली आहे. काही एआय बॉट्स तिच्या चेहऱ्याचा, आवाजाचा आणि इतर वैशिष्ट्यांचा गैरवापर करत आहेत. यामुळे तिच्या व्यक्तिमत्व हक्कांचे उल्लंघन होते आहे, असे तिच्या वकिलांनी सांगितले. या प्रकरणी दिल्ली उच्च न्यायालयाने शुक्रवारी सोनाक्षीच्या बाजूने निर्णय दिला आणि तिच्या व्यक्तिमत्व हक्कांना अंतरिम संरक्षण देण्याचे आदेश दिले. न्यायमूर्ती ज्योती सिंह यांनी या प्रकरणाची सुनावणी केली आणि उल्लंघन करणाऱ्या लिंक्स मागवण्याचे निर्देश दिले. यासोबतच, पुढील सुनावणीसाठी ६ जुलैला होणार आहे. ■

### दक्षिण पॅसिफिक महासागरात भूकंप

**कॅनबेरा** : दक्षिण पॅसिफिक महासागरात रविवारी रात्री समुद्राखाली जोरदार भूकंपाचा हादरा बसला. भूकंपाची तीव्रता ६.१ इतकी नोंदवण्यात आली असून तो अवघ्या दहा किलोमीटर खोलीवर झाल्याने त्याचा प्रभाव अधिक जाणवला. दरम्यान भूकंपानंतर पुन्हा धक्के बसण्याची शक्यता नाकारता येत नसल्याने संबंधित भागात सतर्कतेचा इशारा देण्यात आला आहे.

### एप्रिलपासून दिल्लीत वीज महागण्याची शक्यता

**नवी दिल्ली** : एप्रिल महिन्यापासून दिल्लीत वीजदर वाढण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. वीज वितरण करणाऱ्या खासगी कंपन्यांची ३८ हजार कोटी रुपयांहून अधिक थकबाकी सरकारकडून फेडण्याची तयारी सुरू असल्याने या निर्णयाचा परिणाम थेट वीजदरांवर होण्याची शक्यता आहे. दिल्ली सरकारकडून तीन वीज वितरण कंपन्यांची मोठी आर्थिक देणी भागवण्याचा विचार सुरू असून यामुळे वीजदर वाढ होऊ शकते. मात्र, या वाढीचा थेट भार नागरिकांवर पडू नये यासाठी सरकारकडून अनुदान देण्याची शक्यता देखील वर्तवली जात आहे. यामुळे प्रत्यक्षात ग्राहकांवर किती परिणाम होईल, याबाबत अद्याप स्पष्टता नाही.

### कुटुंबातील चार जणांचा अपघातात मृत्यू

**परभणी** : परभणी जिल्ह्यात जिंतूर-चारठाणा महामार्गावर नातेवाईकांना भेटण्यासाठी निघालेल्या कुटुंबावर काळाने घाला घातला. टेम्पो ट्रॅव्हलर आणि कारची समोरासमोर धडक झाली असून या अपघातात एकाच कुटुंबातील चार जणांचा मृत्यू झाला. वसमत येथील सय्यद कुटुंबीय कारने मंठा येथील नातेवाईकांकडे जात असताना, मंठ्याकडून जिंतूरकडे येणाऱ्या वाहनाशी त्यांची समोरासमोर धडक झाली. या अपघातात सय्यद इस्माईल सय्यद मेहबूब, सय्यद सुमय्या अझर अली, अझर मेहमूद आणि सय्यद उपाध सय्यद या चौघांचा जागीच मृत्यू झाला. स्थानिक नागरिकांनी तत्काळ मदतीसाठी धाव घेत जखमींना रुग्णालयात हलवले, मात्र चौघांचाही मृत्यू झाला.

### रुग्णवाहिका-ट्रक धडकेत सात जणांचा मृत्यू

**सोनितपूर** : आसाममधील सोनितपूर जिल्ह्यात झालेल्या भीषण अपघातात सात जणांचा मृत्यू झाला. राष्ट्रीय महामार्ग क्रमांक १५ वर ट्युलिप चहामळ्याच्या परिसरातून रुग्णाला नेत असलेल्या रुग्णवाहिकेची समोरून येणाऱ्या मालवाहू वाहनाशी धडक झाली. या रुग्णवाहिकेत रुग्णासोबत त्याचे कुटुंबीयही होते. या अपघातात घटनास्थळीच सहा जणांनी प्राण गमावले, तर दोन जण गंभीर जखमी झाले. त्यांना तातडीने तेजपूर येथील वैद्यकीय महाविद्यालय रुग्णालयात दाखल करण्यात आले. मात्र उपचारादरम्यान आणखी एकाचा मृत्यू झाला. ■

# दत्ता मेघे यांच्यावर शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार

◆ **वर्धा, २३ मार्च**

विदर्भाचे दिग्गज नेते, राजकारणासह शिक्षण, आरोग्य, सहकार क्षेत्रांवर आपली अमिट छाप सोडणारे माजी मंत्री व भाजपाचे ज्येष्ठ नेते दत्ता मेघे यांच्यावर पवनार या त्यांच्या मूळ गावी आज सोमवार, २३ रोजी शासकीय इतमामात अन्त्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव सागर यांनी मुखाग्नी दिला.

याप्रसंगी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, केंद्रीय मंत्री नितीन गडकरी, महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे, पालकमंत्री डॉ. पंकज भोयर, राज्यमंत्री आशिष जयस्वाल, माजी केंद्रीय राज्यमंत्री हंसराज अहिर, खासदार अमर काळे, माजी खासदार रामदास तडस, माजी खासदार सुरेश वाघमारे, आ. समीर कुणावार, आ. राजेश बकाने, काँग्रेसचे ज्येष्ठ नेते रणजित देशमुख, वर्धेचे नगराध्यक्ष सुधीर पांगुळ, माजी मंत्री राजेंद्र मुळक, आमदार अभिजित वंजारी आदींसह विविध क्षेत्रांतील मान्यवर उपस्थित होते.

दुपारी १.३० वाजताच्या सुमारास दत्ता मेघे यांचे पार्थिव नागपूर येथून वर्धेत आणले. याठिकाणी हजारो चाहत्यांनी त्यांचे अन्त्यदर्शन घेतले. यावेळी अनेकांनी अश्रूला वाट मोकळी करून दिली. दुपारी ३.३० वाजताच्या सुमारास सावंगी (मेघे) येथील त्यांच्या निवासस्थानाहून सजवलेल्या ट्रकमधून अन्त्ययात्रा निघाली. 'दत्ता मेघे अमर रहे'च्या घोषणा दिल्या जात होत्या. शासकीय इतमामात अन्त्यसंस्काराला ६ वाजून ५ मिनिटांनी प्रारंभ झाला.पुत्र सागर मेघे यांनी दत्ता मेघे यांच्या पार्थिवाला मुखाग्नी दिला. ◂(तभा वृत्तसेवा)



दत्ता मेघे यांच्या पार्थिवावर पुष्पचक्र अर्पण करून श्रद्धांजली अर्पण करताना मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस

### उसळली तोबा गर्दी

दत्ता मेघे हे सर्वसामान्यांना आपलेसे वाटत होते. आपल्या नेत्याचे अन्त्यदर्शन घेण्यासाठी सावंगी (मेघे) येथील निवासस्थानी गर्दी केली होती. येथे येणाऱ्या प्रत्येकाच्या हाती झेंडूच्या फुलांचे हार दिले जात होते. अतिशय शिस्तबद्धरीत्या आलेली प्रत्येक व्यक्ती दत्ता मेघे यांच्या पार्थिवाला हार घालून अभिवादन करीत होती. ■

# आरोग्य विभागात मोठी भरती प्रक्रिया लवकरच

◆ **मुंबई, २३ मार्च**

राज्यातील आरोग्य व्यवस्थेला अधिक बळकटी देण्यासाठी आरोग्य विभागात नव्या आकृतिबंधानुसार मोठ्या प्रमाणावर पदभरती प्रक्रिया राबविण्याची तयारी सुरू झाली असून, ही भरती टप्प्याटप्प्याने करण्यात येणार आहे, अशी माहिती आरोग्यमंत्री प्रकाश आबिटकर यांनी विधानसभेत दिली. तारांकित प्रश्नोत्तरांच्या वेळी आमदार नानाभाऊ पटोले यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नाला उत्तर देताना आबिटकर यांनी सांगितले की, सध्या आरोग्य विभागात अनेक ठिकाणी कंत्राटी पद्धतीने सेवा सुरू आहे. मात्र, या व्यवस्थेत सुधारणा करून नियमानुसार भरती प्रक्रिया राबविण्यासाठी नवीन आराखडा तयार करण्यात येत आहे. राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत सध्या सुमारे १० हजार कर्मचारी कार्यरत असून, त्यांच्या सेवाशर्ती व भवितव्याबाबत निर्णय घेण्याची प्रक्रिया सुरू असल्याचेही त्यांनी नमूद केले. तसेच गट 'क' आणि गट 'ड' श्रेणीतील मोठ्या प्रमाणातील कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या वेतन व हक्कांबाबत तक्रारी आल्यास त्या गंभीरतेने हाताळल्या जातील, असेही त्यांनी स्पष्ट केले. आरोग्य सेवा अधिक परिणामकारक करण्यासाठी कंत्राटी कर्मचाऱ्यांचे हक्क अबाधित ठेवत सुधारित धोरण राबविण्यावर भर दिला जाणार असल्याचेही मंत्री आबिटकर यांनी यावेळी सांगितले. ◂(तभा वृत्तसेवा)



# चाकणकरांसह विश्वस्त मंडळाची चौकशी होणार

## अशोक खरात प्रकरणी तपास विस्तारला

◆ **नाशिक, २३ मार्च**

नाशिकमधील भोंदूबाबा अशोक खरात प्रकरणाला नवे वळण मिळत आहे. आतापर्यंत कर्मचारी आणि मंदिरातील पुजाऱ्यांची चौकशी सुरू असतानाच आता शिवनिका संस्थानच्या विश्वस्तांपर्यंत तपास पोहोचण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, शिवनिका संस्थानच्या अध्यक्षपदाची जबाबदारी अशोक खरात यांच्याकडे होती. काही वर्षांपूर्वी जुन्या विश्वस्तांनी साथ सोडल्यानंतर नव्या विश्वस्तांची नियुक्ती करण्यात आली होती. यामध्ये खरात यांच्या पत्नीचाही समावेश असल्याचे सांगितले जाते.



याचबरोबर रुपाली चाकणकर या देखील या विश्वस्त मंडळाचा भाग होत्या. दरम्यान, रुपाली चाकणकर यांनी यापूर्वीच विश्वस्त मंडळाची मुदत ऑगस्ट २०२५ मध्ये संपल्याचे स्पष्ट केले होते. मात्र, खरात यांना अटक झाल्यानंतर संस्थानच्या विश्वस्त मंडळाचा फलक अचानक गायब झाला. या घटनेमुळे संशयाचे वातावरण अधिकच गडद झाले. या संपूर्ण प्रकरणाचा सखोल तपास करण्यासाठी विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले आहे. संस्थानमधील कामकाज, निर्णयप्रक्रिया आणि आर्थिक व्यवहारांची बारकाईने चौकशी केली जात आहे. याच अनुषंगाने संबंधित विश्वस्तांना चौकशीसाठी बोलावले जाण्याची शक्यता व्यक्त होते आहे. या प्रकरणावर मंत्री नितेश राणे यांनी तीव्र प्रतिक्रिया देताना, प्रत्येक धर्मात अशा प्रवृत्तीचे लोक आढळतात असे म्हणत हल्लाबोल केला. तसेच पीडित महिलांनी थेट सरकारशी संपर्क साधावा, त्यांना पूर्ण मदत केली जाईल, असे आवाहन त्यांनी केले. ◂(वृत्तसंस्था)

### विशेष तपास पथक स्थापन

या प्रकरणाच्या तपासासाठी आयपीएस तेजस्विनी सातपुते यांच्या नेतृत्वाखाली विशेष तपास पथक स्थापन करण्यात आले. यामध्ये नाशिक शहर आणि ग्रामीण पोलिस दलातील वरिष्ठ अधिकाऱ्यांचा समावेश आहे. अशोक खरात आणि त्यांच्या सहकाऱ्यांविरुद्ध दाखल असलेल्या गुन्ह्यांचा वेगाने तपास सुरू आहे. ■

# कॅन्टरच्या धडकेत तीन ठार

◆ **बहादूरगड, २३ मार्च**

हरियाणातील बहादूरगडमध्ये एका भरधाव कॅन्टरने हाहाकार माजवला. अनियंत्रित झालेल्या कॅन्टरने प्रथम दिल्ली-रोहतक राष्ट्रीय महामार्गावरील औद्योगिक क्षेत्राजवळ रस्ता ओलांडणाऱ्या लोकांना धडक दिली, त्यानंतर पळून जाताना नवीन बसस्थानकाजवळ ऑटोरिक्षा आणि मोटारसायकलस्वाराला धडक दिली. दोन्ही अपघातांमध्ये तीन जणांचा मृत्यू झाला, तर इतर चार जण गंभीर जखमी झाले. ही घटना सोमवारी दुपारी १२:३० च्या सुमारास घडली.

अशोक, शंभू व योगेंद्र, अशी मृतकांची नावे आहे. मिळालेल्या माहितीनुसार, भरधाव कॅन्टरने प्रथम दिल्ली-रोहतक राष्ट्रीय महामार्गावर औद्योगिक क्षेत्रातील मामा चौकात रस्ता ओलांडणाऱ्या दोन जणांना धडक दिली. हा अपघात दुपारी १२:३० च्या सुमारास घडला. दोघांचाही जागीच मृत्यू झाला. त्यानंतर आरोपी चालकाने कॅन्टर नवीन बसस्थानकाकडे नेली. तेथे त्याने बसस्थानकाजवळ दोन दुचाकीस्वारांसह ऑटोला धडक दिली.

यात एका दुचाकीस्वाराचा जागीच मृत्यू झाला, तर दुसरा जखमी झाला. या दोन घटनांनंतर कॅन्टर नजफगड रोडवरील उड्डाणपुलाच्या खांबाला धडकला. त्यानंतर चालक कॅन्टर सोडून फरार झाला. पोलिस या प्रकरणाचा तपास करत आहेत. ◂(वृत्तसंस्था)

# ज्योतिबा मंदिराबाहेर पुजारी-भाविकांत संघर्ष

### २५ जणांवर गुन्हे दाखल

◆ **कोल्हापूर, २३ मार्च**

येथील ज्योतिबा मंदिराबाहेर झालेल्या संघर्षानंतर १० पुजारी आणि १५ भाविकांवर गुन्हे दाखल करण्यात आले, अशी माहिती पोलिस अधिकाऱ्याने सोमवारी दिली.

रविवारी दुपारी मंदिराच्या पालखीला अडथळा निर्माण झाल्यानंतर भाविकांवर हल्ला केल्याप्रकरणी पुजाऱ्यांवर गुन्हा दाखल करण्यात आला, अशी माहिती कोडोली पोलिस ठाण्यातील एका अधिकाऱ्याने दिली. या घटनेचा व्हिडीओ समाज माध्यमांवर व्हायरल झाला आहे.



करवीर गावातील भाविक धार्मिक मिरवणुकांमध्ये वापरली जाणारी पवित्र 'शासन काठी' घेऊन मंदिरात गेले होते. हे भक्त नृत्य करीत असताना मार्गावर असलेल्या मंदिराच्या देवतेच्या पालखीला अडथळा निर्माण झाला. पुजाऱ्यांनी या भाविकांना नाचण्यापासून रोखण्याचा आणि पालखीसाठी वाट काढून देण्याचा प्रयत्न केला, त्यावेळी संघर्ष उफाळून आला, असे त्या अधिकाऱ्याने सांगितले.

या झटापटीत भाविकांनी पुजाऱ्यांना धक्काबुक्की केली. त्यानंतर त्यापैकी दहा पुजाऱ्यांनीही प्रत्युत्तर दिले. गावाच्या प्रमुखाच्या मध्यस्थीमुळे हा संघर्ष थांबला. त्यानंतर त्यांनी मंदिराकडे लेखी माफीनामा सादर केला. हाणामारी आणि इतर गुन्ह्यांच्या आरोपाखाली भारतीय न्याय संहितेअंतर्गत १५ भाविक आणि १० पुजाऱ्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला. या प्रकरणात नावे असलेल्यांना नोटीस जारी करण्यात आली आणि पुढील तपास सुरू असल्याचे अधिकाऱ्यांनी सांगितले. ◂(वृत्तसंस्था)

# भारतातील दहशतवादी घटनांमध्ये ४३ टक्के घट

## पाकिस्तान यादीत अव्वल स्थानी, अफगाणिस्तानमध्ये सुधारणा

◆ **वॉशिंग्टन, २३ मार्च**

भारतात गेल्या एका वर्षात दहशतवादी घटनांमध्ये ४३ टक्के घट नोंदवली, तर पाकिस्तान दहशतवादाचा सर्वाधिक प्रभावित देश असल्याचे ग्लोबल टेररिझम इंडेक्स-२०२६ च्या नुकत्याच जाहीर झालेल्या अहवालातून समोर आले आहे.

यादीत भारत १३व्या स्थानावर आला आहे. गेल्या वर्षाच्या तुलनेत भारत दोन स्थानांनी खाली आला आहे. यापूर्वी भारत ११व्या स्थानावर होता.

दक्षिण आशिया सलग दहाव्या वर्षी दहशतवादाने सर्वाधिक प्रभावित क्षेत्र राहिले आहे. पहिल्यांदाच पाकिस्तान या यादीत अव्वल स्थानी आहे आणि दहशतवादाने सर्वाधिक प्रभावित देश बनला आहे. अफगाणिस्तानमधील परिस्थितीत सुधारणा झाली आहे आणि तो आता शीर्ष दहा देशांच्या यादीतून बाहेर आला. जगभरात २०२५ मध्ये दहशतवादामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये २८ टक्के घट झाली. दहशतवादी हल्ल्यांची संख्या देखील सुमारे २२ टक्क्याने कमी होऊन २,९४४ झाली आहे. एकूणच, यावर्षी ८१ देशांमध्ये परिस्थिती सुधारली आहे, तर १९ देशांमध्ये परिस्थिती बिकट असल्याचे अहवालात म्हटले आहे.



**मृत्यूमध्ये २८० टक्क्यांनी वाढ**

पश्चिम देशांमध्ये दहशतवादामुळे होणाऱ्या मृत्यूंमध्ये जवळपास २८० टक्क्यांपर्यंत वाढ नोंदवली गेली. यासोबतच १४ युरोपियन युनियन देशांमध्ये एकूण ५८ दहशतवादी हल्ले झाले.

यांमध्ये फ्रान्स (१४ हल्ले) आणि जर्मनी (६ हल्ले) प्रमुख होते. याशिवाय २० युरोपियन युनियन देशांमध्ये दहशतवादाशी संबंधित प्रकरणांमध्ये ४४९ लोकांना अटक करण्यात आली. ◂(वृत्तसंस्था)

### कट्टरवादासाठी समाज माध्यमांचा वापर

अतिरेकी विचारसरणी आणि कट्टरता पसरविण्यासाठी समाज माध्यमांचा सर्वाधिक वापर केला जात आहे. तरुणांना कट्टरवादाकडे आकर्षित करण्यासाठी डिस्कॉर्ड, ट्विच, रॉबलॉक्स आणि फोर्टनाइटसारख्या गेमिंग प्लॅटफॉर्मचा वापर केला जात आहे. ऑनलाइन समूहांमध्ये किल काउंट (मृत्यूंची संख्या) साठी स्कोअरबोर्ड तयार केले जातात, जे तरुणांना हिंसेसाठी प्रवृत्त करतात. दहशतवादी नवीन भरती करण्यासाठी ऑनलाइन प्लॅटफॉर्मचा मोठ्या प्रमाणात वापर करीत असल्याचे अहवालात नमूद आहे. ■

# विजय वडेट्टीवार यांच्यावर १०० कोटींचा मानहानीचा दावा

## राजू पाटील राजे यांची माहिती

◆ **वाशीम, २३ मार्च**

काँग्रेसचे गटनेते आमदार विजय वडेट्टीवार यांच्याविरोधात भाजपा नेते राजू पाटील राजे यांनी वाशीम जिल्हा सत्र न्यायालयात १०० कोटी रुपयांचा मानहानीचा दावा दाखल केला आहे.

माझ्यावर नकली नोटा प्रकरणी गुन्हा दाखल असून, शासन पाठीशी घालत असल्याचा आरोप वडेट्टीवार यांनी केला होता. न्यायालयाने सदर दावा स्वीकारला असल्याची माहिती राजू पाटील राजे यांनी पत्रकार परिषदेत दिली.

२८ डिसेंबर २०२५ रोजी विजय वडेट्टीवार यांनी सार्वजनिक माध्यमांसमोर वाशीममध्ये नकली नोटा प्रकरणी माझ्यावर गुन्हा दाखल असूनही अटक झाली नाही. तसेच शासन आरोपींना पाठीशी घालत असल्याचा आरोप केला होता. मात्र, हे सर्व आरोप खोटे व निराधार असल्याचे राजू पाटील यांनी स्पष्ट केले.



या प्रकरणी ३ जानेवारी २०२६ रोजी वडेट्टीवार यांना कायदेशीर नोटीस बजावून १५ दिवसांत खुलासा करण्यास व सार्वजनिक माफी मागण्यास सांगितले होते. मात्र, त्यांनी ना खुलासा केला, ना माफी मागितली. त्यामुळे १८ मार्च २०२६ रोजी वाशीम जिल्हा सत्र न्यायालयात १०० कोटी रुपयांचा मानहानी दावा दाखल करण्यात आला असून न्यायालयाने हा दावा स्वीकारला आहे. याप्रकरणी संबंधितांना नोटीस बजावण्यात आली आहे. विजय वडेट्टीवार यांच्यासह हरीश सारडा, तेजराव ईनामदार, पंकज इंगोले, आनंद खेर्डे, टी. व्ही. ९ चॅनल यांच्यावरही विद्यमान न्यायालयात दावा दाखल केला आहे. ◂(तभा वृत्तसेवा)

## अग्रलेख...

# प्रतिमा आणि प्रतिभासंगम!

प्रतिमा आणि प्रतिभा हे व्यक्तिमत्त्वाचा आलेख उंचावणारे दोन महत्त्वाचे स्तंभ असतात. यापैकी प्रतिमेचा स्तंभ हा चारित्र्याच्या पायावर उभा असतो, तर प्रतिभेचा स्तंभ बुद्धिमत्तेच्या पायावर भक्कम होत असतो. या आलेखाच्या उंचावत्या दिशेसोबत आपल्या व्यक्तिमत्त्वाचा आलेख स्पर्धा करू शकणार नाही अशी जाणीव झाली की स्पर्धकाच्या मनात द्वेषभावना जागी होते. आपल्या प्रतिमेच्या आणि प्रतिभेच्या रेषेची लांबी प्रतिस्पर्ध्याच्या रेषेहून अधिक होणे शक्य नाही असे दिसू लागले की द्वेषापोटी प्रतिस्पर्ध्याच्या प्रतिमा आणि प्रतिभेच्या रेषांची लांबी कमी करण्याकरिता प्रयत्न सुरू होतात आणि सातत्याने त्यात अपयश येत गेले की द्वेषभावना उफाळू लागते. मग प्रतिमाहननाचे आणि प्रतिभेचे पंख छाटण्याचे प्रयत्न सुरू होतात. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी सुमारे १२ वर्षांपूर्वी पंतप्रधानपदाची सूत्रे हाती घेतल्यापासून त्यांची जनमानसात उंचावणारी प्रतिमा आणि जनमान्यतेस पात्र ठरलेली प्रतिभा हे प्रतिस्पर्ध्यांसमोरील आव्हान ठरू लागल्याचे जेव्हा स्पष्ट होऊ लागले, तेव्हापासूनच मोदी यांच्या प्रतिमाहननाच्या मोहिमा सुरू झाल्या. पण प्रतिमा ही नेहमीच चारित्र्याच्या भक्कम पायावर उभी राहत असल्याने व मोदी यांच्या चारित्र्यावर चिखलफेक करता येईल असे काही हाती लागत नसल्याने हे प्रयत्न सातत्याने फसत गेले आणि विरोधाच्या राजकारणास नैराश्याने ग्रासले. मोदी यांच्या प्रतिमेमुळे त्यांना भक्कम जनाधार लाभत असल्याने, त्यांचे प्रतिमाहनन केल्याखेरीज त्यांच्या जनाधारास ओहोटी लागणार नाही अशा भावनेतून प्रतिमाहननाच्या मोहिमा सातत्याने राबविल्या गेल्या, पण त्या मोहिमादेखील राबविणाऱ्यांवरच उलटल्याने मोदी यांची प्रतिमा अधिक उजळून जनाधारही वाढत गेला. त्यामुळेच, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी नुकताच मुख्यमंत्री आणि पंतप्रधान या दोन्ही पदांचा मिळून ८,९३१ दिवसांचा (सुमारे २५ वर्षे) कार्यकाळ पूर्ण करून भारतात सर्वाधिक काळ 'सरकार प्रमुख' राहण्याचा ऐतिहासिक विक्रम प्रस्थापित केला आहे. त्यांच्या या प्रदीर्घ कारकीर्दीचा सकारात्मक आढावा घेताना केवळ एका नेतृत्वाच्या व्यक्तिमत्त्वाचे पैलू शोधणे पुरेसे ठरणार नाही. असे कोणतेही नेतृत्व आपल्या प्रतिमा आणि प्रतिभेच्या जोरावर समाज, देश आणि जागतिक स्तरावर आपल्या क्षमता कशा सिद्ध करतात त्याचा धांडोळा घ्यावा लागतो. त्यांचा नेतृत्वकाळ देशाच्या राजकारण, अर्थकारण आणि समाजकारणाच्या वाटचालीस दिशादर्शक ठरल्याची नोंद भविष्यकाळातील त्या इतिहासास घ्यावी लागेल आणि त्यामध्ये मुख्यत्वे भारताच्या आर्थिक सुधारणांचे पर्व म्हणून मोदी सरकारच्या अमृतकालीन वाटचालीचा आढावा घेणेदेखील अपरिहार्य ठरेल. कारण याच काळात भारताच्या अर्थव्यवस्थेचा आलेख जागतिक स्तरावरील दहाव्या क्रमांकावरून पाचव्या क्रमांकापर्यंत उंचावला आणि जगातील प्रमुख अर्थव्यवस्थांना मागे टाकण्याच्या जिद्दीने भविष्यकाळाची वाटचालही करू लागला आहे. याच कार्यकाळात 'मेक इन इंडिया' आणि 'आत्मनिर्भर भारत' या मोहिमांमुळे उत्पादनाला चालना मिळाली, 'एक राष्ट्र, एक कर' या अभिनव संकल्पनेतून वस्तू व सेवाकराच्या नव्या सुटसुटीत रचनेची अंमलबजावणी सुरू झाली आणि डिजिटल अर्थव्यवस्थेचे क्रांतिकारी पर्वदेखील भारतात सुरू झाले. आज यूपीआय प्रणालीमुळे भारत डिजिटल व्यवहारांत जगात अग्रस्थानी पोहोचला आहे. अर्थव्यवस्थेला स्थैर्य आल्यानंतर अनेक योजनांचा लाभ जनतेला थेट स्वरूपात मिळावा यासाठी जनधन, आधार आणि मोबाईल या त्रिसूत्रीचा कल्पक वापर ही मोदी सरकारची देशाला मिळालेली देणगी ठरणार आहे. कारण या त्रिसूत्रीमुळे सरकारी योजनांचा लाभ थेट लाभार्थींच्या बँक खात्यात जमा होऊ लागला. उज्ज्वला योजनेतून कोट्यवधी महिलांना मिळालेल्या गॅस जोडण्यांमुळे महिलांच्या आरोग्याच्या समस्या कमी झाल्याची नोंद घेतली गेली आहे आणि देशातील गरीब कुटुंबांना मिळालेल्या हक्काच्या घरांनी मोदी यांच्या प्रतिमेला बळ दिले आहे. याच कार्यकाळात भारतात जगातील सर्वांत मोठी आरोग्य विमा योजना सुरू झाली. देशभरात विणले गेलेले राष्ट्रीय महामार्गांचे जाळे, वंदे भारतसारख्या आधुनिक रेल्वे गाड्या, नवीन विमानतळ आणि जलद गतीने होणारे मेट्रोचे काम हा गेल्या दहा वर्षांच्या देशाच्या प्रगती-काळाचा कणा मानला जातो. पारतंत्र्याच्या काळात आणि स्वातंत्र्यानंतरही अनेक दशके देशाच्या अस्मितेस दुखावणाऱ्या काही वेदना सतत समाजास छळत होत्या. जम्मू-काश्मीर हा भारताचा अविभाज्य भाग आहे असे सतत ठणकावून सांगताना, अशीच एक वेदना जागी होत असे. या वेदनेवर केवळ भावनिक फुंकर मारणे पुरेसे नाही, तर दीर्घकाळाच्या या वेदनेची मुळे असलेल्या कलम ३७० चे अस्तित्व पुसून टाकण्याच्या धाडसी शस्त्रक्रियेस पर्याय नाही, हे मोदी सरकारने ओळखले आणि जम्मू-काश्मीरला विशेष दर्जा देणारे कलम ३७० रद्द करून हे राज्य देशाच्या मुख्य प्रवाहात अभिमानाने सामील झाले. दहशतवादाविरुद्धच्या शून्य सहनशीलतेच्या धोरणाने या राज्यातील अशांततेचा कायमचा बीमोड करण्याची हिंमत दाखविणारे सरकार म्हणून मोदी सरकारची दखल इतिहासाला घ्यावीच लागेल. अनेक शतकांपासून प्रलंबित असलेला अयोध्येतील राम मंदिराचा प्रश्न ही देशातील धार्मिक सलोख्यापुढील समस्या ठरेल, या भीतीने ही जखम दीर्घकाळ भळभळत राहिली. हा प्रश्न शांततापूर्ण मार्गाने मार्गी लागेल, याची कोणालाच खात्री नव्हती. अशा कोणत्याही समस्येचे निराकरण करण्याकरिता पुढाकार घेणाऱ्या नेत्यांची प्रतिमा अशा काळात कामी येत असते. मोदी सरकारने सामंजस्याने आणि शांततापूर्ण रीतीने शतकांपासूनची ही समस्या सोडवली आणि राम मंदिर उभे राहत असताना, सामाजिक सलोख्याचे नवे दर्शन जगाला घडले. प्रतिभासंपन्न नेतृत्वामुळे जागतिक प्रतिष्ठा प्राप्त होते, हे गेल्या दशकभरात देशाने अनुभवलेले वास्तव आहे. जी-२० परिषदेचे यशस्वी यजमानपद भूषवून भारताने जागतिक राजकारणात आपली बाजू भक्कम केली. रशिया-युक्रेन युद्धासारख्या कठीण काळातही भारताने आपले स्वतंत्र परराष्ट्र धोरण टिकवून ठेवले. आजही, अमेरिका-इस्रायल आणि इराण यांच्यातील महायुद्धाच्या सावटाखालील जगावर राजकीय, आर्थिक अस्थैर्याचे ढग जमा झालेले असतानाही, भारताच्या समाजजीवनास लाभलेली सुरक्षिततेच्या भावनेची आश्वस्ततादेखील इतिहासास दुर्लक्षित करता येणार नाही. मोदींची कारकीर्द ही राजकीय स्थिरता आणि निर्णयक्षमता यासाठी ओळखली जाते. यामुळेच आत्मनिर्भरतेच्या आत्मविश्वासाने देशाने 'विकसित भारता'चे ध्येय समोर ठेवून वाटचाल सुरू केली आहे.

नरेंद्र मोदी नावाच्या, सामान्य कुटुंबातून उदयास आलेल्या एका नेतृत्वाने देशाच्या प्रस्थापित राजकारणास जोरदार धक्का दिला आहे. पक्षाचा एक सामान्य कार्यकर्ता म्हणून राजकीय जीवनात प्रवेश केलेला एक नेता कोणा पूर्वजाच्या राजकीय पुण्याईवर नव्हे, तर असामान्य नेतृत्वक्षमता, प्रखर राष्ट्रनिष्ठा आणि परंपरांची जपणूक करतानाही नवतेचा ध्यास धरणारी स्वार्थनिरपेक्ष दूरदृष्टी या गुणांच्या जोरावर पंतप्रधानपदापर्यंत पोहोचला. घराणेशाहीच्या विळख्यात जखडलेल्या सत्तेच्या राजकारणास हा पहिला धक्का तर होताच, पण पुढे नरेंद्र मोदी यांनी घराणेशाहीच्या विरोधात पहिला आवाजही उठविला आणि घराण्यांच्या पुण्याईवर सत्तेचे लोणी चाखणाऱ्या पक्षांना आव्हान दिले. घराणेशाहीच्या राजकारणात देश, समाज, जनता याहूनही कुटुंब, घराणे, नातेवाईक यांचेच हित जपले जाते. कुटुंब हाच या राजकारणाचा केंद्रबिंदू असतो आणि कुटुंबप्रमुखाच्या एकखांबी आधारावर या पक्षांच्या राजकारणाचा तंबू उभा असतो. आपल्याखेरीज कोणीच समाजाचा किंवा देशाचा तारणहार असू शकत नाही अशी भावना समाजात रुजविण्याचा पद्धतशीर प्रयत्न ही घराणी करत असतात. लोकशाहीची ही कुचेष्टा थांबविण्याचा मोदी सरकारने घेतलेला ध्यास म्हणजे एकप्रकारे हे राजकारणाचे आणि लोकशाहीचे शुद्धीकरण आहे. प्रादेशिक पक्षांचे मुखवटे धारण केलेल्या राजकीय घराणेशाहीला विसर्जित करण्याची मोदी यांच्या नेतृत्वाखाली सुरू झालेली मोहीम म्हणजे सत्तेचे सामान्यांपर्यंत विकेंद्रीकरण करण्याचा नवा प्रयोग ठरतो आहे. राजकारणास बगल देणाऱ्या या मोहिमा कोणाच्या तरी नैराश्यास निमंत्रण देत असतील, तर प्रतिमाभंजनच्या मोहिमांना आणि प्रतिभेच्या कुचेष्टेला कारण मिळणारच!

## आंतरराष्ट्रीय

# इराणमधील सत्ता उलथविण्यात अपयश का?

प्रा. जयसिंग यादव

मध्यपूर्वेतील राजकारणात गेल्या काही दशकांपासून सर्वांत संवेदनशील आणि संघर्षपूर्ण समीकरण म्हणजे अमेरिका, इस्रायल आणि इराण यांच्यातील तणाव. विशेषतः इराणी इस्लामिक क्रांती झाल्यानंतर इराणमध्ये इस्लामिक रिपब्लिकची स्थापना झाली आणि त्यानंतर अमेरिका-इराण संबंध कायमच संघर्षमय राहिले. अलिकडच्या काळात अमेरिका आणि इस्रायलने इराणमधील सत्तांतर घडवून आणण्यासाठी थेट किंवा अप्रत्यक्ष प्रयत्न केल्याचे संकेत दिसून येतात. लष्करी कारवाया, आर्थिक निर्बंध, सायबर हल्ले आणि राजकीय दबाव अशा अनेक माध्यमांमधून इराणला कमकुवत करण्याचा प्रयत्न झाला, तथापि या सर्व प्रयत्नांनंतरही इराणची सत्ताव्यवस्था कोसळली नाही. उलटपक्षी, ती अधिक कणखरपणे टिकून राहिल्याचे दिसते. यामागे केवळ लष्करी ताकद नाही, तर इराणच्या राजकीय रचनेची वैशिष्ट्ये, वैचारिक आधार आणि संस्थात्मक संरचना यांचा मोठा वाटा आहे. इराणविरुद्ध अमेरिकेची भूमिका गेल्या चार दशकांमध्ये सतत कठोर राहिली आहे. विशेषतः अणुकार्यक्रमाच्या प्रश्नावरून आणि मध्यपूर्वेत इराणच्या वाढत्या प्रभावामुळे अमेरिका आणि इस्रायल दोघेही चिंतेत राहिले. त्यामुळे आर्थिक निर्बंध, गुप्त कारवाया, विरोधी गटांना समर्थन यांचा वापर करून इराणची सत्ता कमकुवत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. काही वेळा लष्करी कारवायांचाही अवलंब करण्यात आला. इराणच्या संरक्षणव्यवस्थेला धक्का देण्यासाठी हवाई हल्ले, लष्करी तळांवर लक्षित कारवाया किंवा अणुसंशोधनाशी संबंधित केंद्रांवर दबाव टाकण्याचे प्रयत्न झाले. या सर्व कारवायांचा मुख्य उद्देश एकच-इराणमधील विद्यमान राजवट अस्थिर करणे आणि अखेरीस सत्तांतर घडवून आणणे. प्रत्यक्षात मात्र या प्रयत्नांना अपेक्षित यश मिळालेले दिसत नाही. असे का घडत आहे?

इराणची सत्ताव्यवस्था एखाद्या व्यक्तीभोवती केंद्रित नसून अनेक संस्थांवर आधारित आहे. त्यामुळे एखादा नेता किंवा पदाधिकारी गमावला, तरी संपूर्ण व्यवस्था ढासळत नाही. सर्वोच्च नेत्याबरोबरच अनेक धार्मिक, राजकीय आणि लष्करी संस्था सत्तेचा भाग आहेत. इराणमधील सर्वांत प्रभावशाली संस्था म्हणजे 'इस्लामिक रिव्होल्युशनरी गार्ड कॉर्प्स' (आयआरजीसी). हे दल केवळ लष्करी शक्ती नसून राजकीय आणि आर्थिक क्षेत्रातही मोठा प्रभाव राखते. क्षेपणास्त्र कार्यक्रम, ड्रोन तंत्रज्ञान आणि अनेक रणनीतिक क्षेत्रांवर या दलाचे नियंत्रण आहे. महत्त्वाचे म्हणजे, ही संस्था वैचारिकदृष्ट्या इस्लामिक क्रांतीशी बांधील आहे. त्यामुळे बाह्य दबावामुळे तिची निष्ठा सहज डळमळीत होत नाही. इराणमध्ये राजकीय व्यवस्था केवळ प्रशासनिक रचनेवर नाही, तर वैचारिक आधारावर उभी आहे. शिया धार्मिक परंपरा, क्रांतीचा वारसा आणि परकीय हस्तक्षेपाविरोधातील राष्ट्रवादी भावना यामुळे सत्तेला व्यापक वैचारिक आधार मिळतो. परकीय हस्तक्षेप वाढला की अनेकदा ही राष्ट्रवादी भावना तीव्र होते आणि सत्तेला अधिक पाठिंबा मिळतो. इराणच्या अर्थव्यवस्थेचा मोठा भाग राज्याशी संबंधित संस्थांच्या ताब्यात आहे. धर्मादाय ट्रस्ट, सरकारी उद्योग आणि लष्करी संस्थांचे व्यावसायिक नेटवर्क यामुळे सत्तेशी निष्ठावान वर्ग तयार झाला आहे. या आर्थिक संरचनेमुळे सत्ताधारी अभिजात वर्गाचे हितसंबंध विद्यमान व्यवस्थेशी घट्ट जोडले गेले आहेत. इराणमध्ये सरकारविरोधी असंतोष आहे; परंतु संघटित नसून सुधारणावादी, राजेशाही समर्थक, डावे गट अशा गटांमध्ये विभागलेला आहे. त्यामुळे सत्तेला प्रभावी आव्हान निर्माण होत नाही.

इराणची राजकीय व्यवस्था पारंपरिक हुकूमशाहीसारखी नाही. ती अनेक सत्ताकेंद्रांवर आधारित आहे. धार्मिक नेतृत्व, लष्कर, निवडून आलेले प्रतिनिधी आणि न्यायसंस्था या सर्वांचा सत्ताव्यवस्थेत सहभाग आहे. देशात निवडणुका होतात. राष्ट्रपती आणि संसद निवडली जाते; मात्र उमेदवारांची तपासणी आणि राजकीय प्रक्रियेवर नियंत्रण ठेवणाऱ्या संस्थांमुळे ही लोकशाही मर्यादित स्वरूपाची राहते. याशिवाय, देशातील सुरक्षा यंत्रणा अत्यंत मजबूत मानली जाते. व्यापक पाळत ठेवण्याची व्यवस्था, इंटरनेट नियंत्रण आणि कठोर कायदे यामुळे मोठ्या प्रमाणावर बंडखोरी करणे कठीण होते. इतिहास सांगतो की परकीय लष्करी हस्तक्षेप अनेकदा अपेक्षित परिणाम देत नाही. अफगाणिस्तान, इराक किंवा लिबिया यासारख्या उदाहरणांमध्ये हस्तक्षेपानंतर राजकीय अस्थिरता वाढल्याचे दिसून आले. यामुळे इराणमधील अनेक नागरिकही बाह्य हस्तक्षेपाबाबत सावध भूमिका घेतात. सरकारविरोधी असंतोष असला, तरी परकीय शक्तींच्या मदतीने सत्तांतर व्हावे अशी सर्वांची इच्छा नसते. इराणमध्ये सामाजिक आणि आर्थिक असंतोष वाढत असल्याचे अनेक निरीक्षक मानतात. तरुण पिढी अधिक जागतिक विचारांची आहे आणि ती राजकीय बदलांची मागणी करते. त्यामुळे भविष्यात बदलाची शक्यता पूर्णपणे नाकारता येत नाही. तथापि, सध्या तरी इराणची राजकीय व्यवस्था संस्थात्मकदृष्ट्या मजबूत आहे. त्यामुळे बाह्य दबाव किंवा मर्यादित लष्करी कारवायांमुळे तकाळ सत्तांतर घडेल असे दिसत नाही.

इराणी इस्लामिक क्रांती घडून चार दशकांहून अधिक काळ उलटला असला, तरी इराण आज पुन्हा एका मोठ्या राजकीय आणि लष्करी संकटाच्या उंबरठ्यावर उभा आहे. अलिकडे अमेरिका आणि इस्रायल यांनी केलेल्या संयुक्त हवाई हल्ल्यांमध्ये इराणचे सर्वोच्च नेते अयातुल्ला अली खामेनी आणि काही वरिष्ठ लष्करी कमांडर मारले गेल्याच्या बातम्यांनी मध्यपूर्वेतील राजकारण ढवळून निघाले आहे. या हल्ल्यांमध्ये इराणच्या महत्त्वाच्या पायाभूत सुविधांचेही मोठे नुकसान झाले. यानंतर अमेरिका आणि इस्रायलने इराणमध्ये सत्तापालट घडवून आणण्याचे संकेत दिले, इतकेच नव्हे, तर इराणी जनतेलाही विद्यमान सरकार उलथवून टाकण्याचे आवाहन करण्यात आले. केवळ बाह्य लष्करी हल्ल्यांमुळे इराणची सत्ताकठोर व्यवस्था सहज कोसळेल असे मानणे भाबडेपणाचे ठरेल. कारण इस्लामिक क्रांतीनंतर या देशात अशी एक राजकीय रचना निर्माण झाली आहे, जी मोठ्या धक्क्यांनाही तोंड देण्यास सक्षम आहे. कडक नियंत्रित संस्था, वैचारिक प्रशिक्षण, सत्ताधारी वर्गातील ऐक्य आणि विखुरलेला विरोध या सर्व घटकांनी मिळून ही व्यवस्था टिकवून ठेवली आहे. खामेनी यांच्या मृत्यूनंतर त्यांचे पुत्र मोज्तबा खामेनी यांची सर्वोच्च नेते म्हणून निवड झाली. अनेक विश्लेषकांच्या मते ते आपल्या वडिलांची कठोर आणि पाश्चात्त्यविरोधी धोरणे पुढे चालू ठेवतील. त्यामुळे सत्तेमध्ये मूलभूत स्वरूपात बदल होण्याची शक्यता सध्या तरी कमी मानली जात आहे.

इस्लामिक क्रांतीनंतर इराणमध्ये धार्मिक, राजकीय आणि शैक्षणिक संस्थांचे विस्तृत जाळे उभे राहिले. या संस्थांद्वारे राज्याची विचारसरणी पिढ्यान्‌पिढ्या पुढे पोहोचवली जाते. शिया धर्मातील 'शहादत' किंवा बलिदानाची परंपरादेखील राजकीय निष्ठेला बळकटी देणारी ठरली आहे. यामुळे सत्तेप्रति निष्ठा केवळ राजकीय नसून वैचारिक आणि धार्मिक स्वरूपाचीही बनते. अनेक विश्लेषकांच्या मते हीच व्यवस्था इराणला इतर अनेक मध्यपूर्व देशांपेक्षा वेगळे आणि टिकाऊ बनवते. इराणमध्ये अनेक सरकारविरोधी चळवळी उभ्या राहिल्या. २००९ मधील 'ग्रीन मूव्हमेंट' असो किंवा महसा अमिनी यांच्या मृत्यूनंतर २०२२ मध्ये उसळलेल्या आंदोलनांच्या लाटेने राजवटीविरोधातील असंतोष स्पष्ट केला, तरीही या चळवळींमध्ये एकत्रित नेतृत्वाचा अभाव राहिला आणि कठोर दडपशाहीमुळे त्यांना यश मिळाले नाही.

(लेखक राज्यशास्त्राचे अभ्यासक आहेत.)

## वेध

नितीन शिरसाट

# गॅस टंचाईचा भडका; अवकाळीचा तडाखा

आखाती देशात सुरू असलेल्या युद्धाचा फटका पेट्रोल, डिझेल यासह दररोज स्वयंपाक घरातील घरगुती गॅस सिलेंडरच्या पुरवठ्याला बसत आहे. इंधन तुटवड्यामुळे ग्रामीण व शहरी भागात पुन्हा एकदा गॅसचा भडका उडाला आहे. त्यातही गॅस सिलेंडर चोरीच्या घटना व छुप्या अवैध मार्गाने गॅस विक्रीत वाढ झाली आहे. घरगुती गॅस सिलेंडरचा सर्रास वापर हॉटेल व्यावसायिक तसेच चौपाटीवर व्यवसाय करणारे लहान व्यावसायिक करीत असल्याने जिल्हा प्रशासनाने महसूल व पुरवठा विभागाचे पथक तयार करून धाडसत्र सुरू केले आहे. गॅस सिलेंडरच्या टंचाईने ग्रामीण भागात मातीच्या चुलींचा वापर वाढला आहे. सिलेंडरच्या किमतीत वाढ झाल्याने सामान्य नागरिकांना परवडत नसल्याने लाकूड व गोवऱ्या वापरून चुलीवर स्वयंपाक करण्याकडे महिलांचा कल वाढला आहे. गॅस टंचाई वाढल्याने आजही कोणतीही यंत्रसामुग्री न वापरता पूर्णपणे हाताने तयार केलेल्या मातीच्या चुलींना मागणी वाढली असून जुन्या काळातील चुलीवरच्या जेवणाची आठवण केली जात आहे. सध्या हॉटेल व्यावसायिक व घरगुती ग्राहकांकडून चुलीला मागणी वाढली आहे.

पारंपरिक पद्धतीने माती व शेणापासून बनविल्या जाणाऱ्या चुलींना मोठी मागणी आहे. घरगुती चूल २५० रुपयांपासून ते ३०० रुपयांपर्यंत तर हॉटेल व्यावसायिकांसाठी मोठी चूल ७०० ते एक हजार रुपयांपर्यंत मिळत आहेत. आजही चुलीवरच्या भाकरीची चव आवडत असल्याने घरात गॅस असला तरी काही लोक मातीच्या चुली घेऊन जात आहे. आखाती देशांमधील वाढत्या तणावाचा आणि इराण-इस्रायल युद्धाचा थेट परिणाम आता सर्वसामान्यांच्या खिशावर होऊ लागला आहे. आंतरराष्ट्रीय पातळीवरील आयात विस्कळीत झाल्याने गेल्या काही दिवसांत खाद्यतेलाच्या किमतीत वाढ झाली आहे.

हिंदुस्थान पेट्रोलियम एच. पी. गॅस, इंडियन गॅस, भारत गॅस यासह इतर कंपन्यांच्या सिलेंडर विक्री केंद्रावर ग्राहकांच्या रोज सकाळी ७ वाजेपासून सिलेंडरचा ट्रक संपेपर्यंत लांबलचक रांगा आहेत. बुलढाणा शासकीय रुग्णालयाच्या स्वयंपाकघरातून चोरट्यांनी काही दिवसांपूर्वी सिलेंडर चोरून नेल्याची घटना घडली आहे. अशा घटना दिवसेंदिवस वाढत आहे. त्यातही ज्यांना सिलेंडरची बुकिंग मोबाईलवर करावी लागते त्यांना केवायसी बंधनकारक करण्यात आली आहे. संगणक यंत्रणा ठप्प झाल्याने ग्राहकांची केवायसी अडकून पडली आहे. तर दुसरीकडे निसर्गाच्या अवकाळी लहरीपणाचा फटका शेतकऱ्यांना बसला आहे. राज्यात अनेक ठिकाणी गारांसह वादळी वाऱ्यासह पाऊस पडल्याने शेतीपिके फळबाग भाजीपाल्याचे मोठे नुकसान झाले आहे. लवकरच पंचनामे करून नुकसानभरपाई देण्याची मागणी शेतकरी करत आहेत. पश्चिम विदर्भातील अकोला, बुलढाणा, वाशीम, मराठवाड्यातील जालना, छत्रपती संभाजीनगर, अहिल्यानगर, धाराशिव यासह इतर जल्ह्यातील गहू, कांदा, मका, ज्वारी यासह द्राक्षे, मोसंबी, केळी, डाळिंब, टरबूज, भाजीपाला शिवाय यावर्षी लवकरच आलेला आंब्याचा मोहर व कैऱ्या गारपिटीने व वादळी पावसाने उन्मळून पडले आहेत. अवकाळी पावसामुळे शेतात पाणी साचले आहे. कापणी करून ठेवलेले पीकही पावसात भिजल्याने शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान वाढले आहे. हवामानातील या अचानक बदलामुळे शेतकऱ्यांवर दुहेरी संकट ओढवले आहे. प्रशासनाकडून नुकसानीचे पंचनामे करून मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांकडून होत आहे. अकोला, बुलढाणा आणि वाशीम या तीन जिल्ह्यांत १८ व १९ मार्च रोजी अवकाळी पावसासह गारपीट झाली. यात रबीतील पिकांसह उन्हाळी पिकांना मोठा फटका बसला आहे. एकट्या बुलढाणा जिल्ह्यात गारपीट व अवकाळी पावसामुळे १३ पैकी ११ तालुक्यांत ३ हजार ८०२ हेक्टरवरील पिकांचे नुकसान झाले आहे वीज पडल्याने एकाचा मृत्यू झाला. दुसरीकडे शेगाव तालुक्यातील आळसणालगत असलेल्या खेर्डा शिवारात अवकाळी पावसादरम्यान वीज पडून छत्रपती संभाजीनगर जिल्ह्यातील सोयगाव तालुक्यात येत असलेल्या किन्ही येथील आबा हिरामण माळी यांचा मृत्यू झाला. देऊळगाव राजा, लोणार आणि चिखली तालुक्यात गारपीट झाली. यासोबतच मोताळा आणि मलकापूर तालुक्यातील जळगाव खान्देश जिल्ह्याच्या सीमेलगत असलेल्या पट्ट्यात वादळी वाऱ्यासह पाऊस व तुरळक गारपीट होऊन नुकसान झाले आहे. शेतकऱ्यांच्या आशांवर पाणी फेरले. उभे पीक भिजल्याने व नुकसान झाल्याने अपेक्षित नफा हातातून निसटला असून, आधीच वाढत्या खर्चाच्या ओझ्याखाली दबलेल्या शेतकऱ्यांसमोर नव्या आर्थिक संकटाची स्थिती निर्माण झाली आहे. मका, ज्वारी, गहू, हरभरा, कांदा, केळी, पपई, बाजरी, चिया, संत्रा, मोसंबी व आंबा या पिकांचे नुकसान झाले आहे. नुकसाग्रस्तांचे पंचनाने तातडीने करण्याच्या सूचना केंद्रीय राज्यमंत्री प्रतापराव जाधव यांनी प्रशासनाला दिल्या आहेत. अस्मानी व सुलतानी संकटात सध्या सर्वसामान्य तसेच शेतकरी आर्थिक टंचाईचा सामना करीत आहे.

९८८१७१७८२८

## प्रासंगिक

# पाण्यासाठी लोकचळवळ उभारूया

सी. आर. पाटील

जागतिक जल दिन नुकताच साजरा करण्यात आला. या दिवसाच्या निमित्ताने पाण्याचे आपल्या जीवनात असलेले मध्यवर्ती स्थान तसेच भविष्यासाठी त्याचे संवर्धन आणि संरक्षण करण्याच्या आपल्या सामूहिक जबाबदारीची आठवण करून दिली जाते.


पाण्यामुळे सजीव, परिसंस्था आणि आर्थिक घडामोडी शाबूत राहतात. तरीही या अत्यावश्यक साधनसंपत्तीवर पडणारा ताण वाढत आहे. जगातील जवळपास १८ टक्के लोकसंख्या आणि पशुधन भारतात आहे, परंतु जगातील एकंदर गोड्या पाण्याच्या साठ्यापैकी केवळ ४ टक्केच पाणी भारतात उपलब्ध आहे. वेगाने होत असलेले शहरीकरण, वाढती मागणी आणि हवामान बदल यांमुळे कार्यक्षम आणि जबाबदार जल व्यवस्थापन हे राष्ट्रीय प्राधान्य बनले आहे.

हे आव्हान ओळखून, पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली भारताने जल व्यवस्थापनासाठी एकात्मिक दृष्टिकोन स्वीकारला आहे. जलशक्ती मंत्रालय स्थापन केल्यामुळे जल व्यवस्थापनाशी संबंधित निरनिराळे पैलू एकाच चौकटीत आले असून, सर्वांगीण नियोजनाच्या दिशेने हे निर्णायक स्थित्यंतर आहे.

संवर्धन आणि भूजल पुनर्भरण यावर लक्ष केंद्रित करून धरणे आणि जलाशयांद्वारे साठवण क्षमता वाढवणे; नदीजोडणीद्वारे संतुलित पद्धतीने पाणीवाटप शक्य करणे; जल जीवन मिशन आणि आधुनिकीकृत सिंचन क्षेत्र विकास यांसारख्या कार्यक्रमांतर्गत पाण्याची उपलब्धता वाढवणे; नमामि गंगेसारख्या उपक्रमांतर्गत पाण्याची गुणवत्ता सुधारणे; तसेच संशोधन, नवोन्मेष आणि जनजागृतीद्वारे लवचीकता निर्माण करणे यासारख्या उपायांद्वारे हा दृष्टिकोन संपूर्ण जलचक्रात येणाऱ्या समस्या दूर करण्याचा प्रयत्न करतो. एकत्रितपणे, या सर्व प्रयत्नांतून दीर्घकालीन जलसुरक्षेबाबतची व्यापक दूरदृष्टी दिसून येते.

जल व्यवस्थापन ही त्याच्या सर्व आयामांसह लोकचळवळ बनली पाहिजे ही बाब मान्य करणे ही गोष्ट या व्हिजनच्या केंद्रस्थानी आहे. शासकीय उपक्रमांमुळे आवाका वाढतो आणि दिशा मिळते, परंतु जेव्हा नागरिक सक्रियपणे सहभागी होऊन जबाबदारी हाती घेतात, तेव्हाच चिरस्थायी परिणाम साधला जाऊ शकतो.

प्रत्येक ग्रामीण कुटुंबाला सुरक्षित आणि पुरेसा पिण्याच्या पाण्याचा पुरवठा करण्यासाठी जल जीवन मिशन हा जगातील सर्वांत मोठा कार्यक्रम राबवला जात आहे. त्यामुळे आतापर्यंत १५.८ कोटींहून अधिक ग्रामीण कुटुंबांपर्यंत नळाद्वारे पाणी पुरवठ्याची सोय पोहोचली असून, त्यामुळे त्यांच्या राहणीमानाचा दर्जा सुधारला आहे. या मिशनमुळे लाखो महिलांना पाणी भरण्यासाठी करावे लागणारे कष्ट कमी झाले आहेत, त्यांचे आरोग्य सुधारले आहे शिवाय, शिक्षण आणि



चरितार्थासाठी अर्थार्जनामध्ये त्यांचा सहभाग वाढला आहे. या मिशनमध्ये पायाभूत सुविधा उभारणीच्या पलीकडे, ग्रामपंचायती आणि ग्राम जल आणि स्वच्छता समित्या यांना केंद्रस्थानी ठेवून सामुदायिक सहभागावरही प्रकर्षाने भर दिला जात आहे. महिलांना पाण्याच्या गुणवत्तेवर देखरेख ठेवण्याचे प्रशिक्षण दिले जात असल्यामुळे स्थानिक पातळीवर हे आपले काम असल्याच्या भावनेला बळकटी मिळत आहे. नमामि गंगे कार्यक्रमामुळे गंगा आणि तिच्या उपनद्यांमधील पाण्याची गुणवत्ता सुधारली आहे तसेच त्यातील सजीवांच्या परिसंस्थेचे पुनरुज्जीवन होण्यासही मदत झाल्यामुळे गंगेतील डॉल्फिनसह इतर महत्त्वाच्या जलचर प्रजातींच्या अधिवासात आणि संख्येतही वाढ झाली आहे. निर्मल आणि अविरल गंगा या उद्दिष्टावर लक्ष केंद्रित करण्यासोबतच, हा कार्यक्रम उपजीविका, सजगता आणि स्थानिक सहभागाला संवर्धन प्रयत्नांची जोड देऊन नदी पुनरुज्जीवनात समुदायांच्या सहभागाला प्राधान्य देणाऱ्या अर्थ गंगा आणि जन गंगा यासारख्या उपक्रमांमध्येही प्रगती करत आहे. जलशक्ती अभियानाच्या माध्यमातून जलसंधारण ही एक जनचळवळ बनली आहे. पाऊस - जिथे पडेल, जेव्हा पडेल, तिथे तो साठवा या पंतप्रधानांच्या आवाहनाने देशभरातील लोकांना कृती करण्यास प्रेरित केले आहे. जल संचय जन भागीदारी उपक्रमांतर्गत, पर्जन्यजल संचयन, पारंपरिक जलस्रोतांचे पुनरुज्जीवन, पाणलोट क्षेत्रांचा विकास आणि वृक्षारोपण यासारखी कामे सामुदायिक पातळीवर हाती घेतली जात आहेत.

या प्रयत्नांमुळे, सप्टेंबर २०२४ पासून ४५ लाखांहून अधिक जलसंवर्धन संरचनांची निर्मिती झाली आहे, शासकीय उपक्रमांचे पाठबळ मिळाल्यास सामुदायिक सहभागातून किती मोठ्या प्रमाणात परिणाम साध्य करता येतात हेच यावरून दिसून येते. संपूर्ण भारतात अशा सहभागाची उदाहरणे सहजपणे दिसून येतात. गुजरातच्या बनासकांठामध्ये, सहकारी दुग्ध संस्थांनी शेतकऱ्यांसोबत भागीदारी करून कमी खर्चात पुनर्भरण संरचनांची उभाणी केली आहे. छत्तीसगडमधील कोरा येथे, शेतकऱ्यांनी केवळ भूजल पुनर्भरणासाठी आपल्या जमिनीचा काही हिस्सा दिला आहे. शहरी भागांमध्ये, निवासी वस्त्या पावसाचे पाणी साठवण्याच्या आणि त्याचा पुनर्वापर करण्याच्या पद्धतींचा अवलंब करत आहेत. 'कर्मभूमी से मातृभूमी'सारखे उपक्रम जबाबदारीची वाढती भावना दर्शवतात, त्यामध्ये व्यक्ती आपापल्या मूळ गावी संवर्धनाच्या प्रयत्नांमध्ये योगदान देत आहेत. जलसुरक्षा सुनिश्चित करण्यात उद्योग आणि कृषी या क्षेत्रांची महत्त्वाची भूमिका आहे. अनेक उद्योग स्वेच्छेने जल लेखापरीक्षण, पुनर्वापर, शून्य द्रव विसर्जन आणि पर्जन्यजल संचयन यासारख्या सर्वोत्तम पद्धतींचा अवलंब करत असून त्याला जल तंत्रज्ञानात सातत्याने लागत असलेल्या नवनवीन शोधांची मदत होत आहे. कृषी क्षेत्रात, कमांड एरिया डेव्हलपमेंटचे आधुनिकीकरण यासारख्या कार्यक्रमांच्या साहाय्याने, सूक्ष्म-सिंचन, शेतामध्ये सुधारित जल व्यवस्थापन आणि उपलब्ध संसाधनांचा उत्तम वापर यासारख्या उपाययोजना सर्व प्रदेशांमध्ये अवलंबल्या जात आहेत, त्यामुळे शेतकऱ्यांना उदरनिर्वाहासाठी आधार मिळण्यासोबतच पर्यावरण रक्षणासाठीही त्यांची मदत होत आहे. भारताच्या शहरी भागातही पर्जन्यजल संचयन, सांडपाण्याचा पुनर्वापर आणि शाश्वत नियोजनाच्या माध्यमातून संवर्धनाची संस्कृती अंगीकारली गेली पाहिजे. पाण्याचा जबाबदारीने वापर होईल हे सुनिश्चित करण्यात प्रत्येक कुटुंब, संस्था आणि समुदायाचीही भूमिका आहे. भारताचा जलसुरक्षेच्या दिशेने होणारा प्रवास हा एक सामूहिक राष्ट्रीय प्रयत्न असून, तो विकसित भारत घडवण्यासाठी अत्यावश्यक आहे.

जागतिक जल दिनाचे औचित्य साधून, आपण जागरूकतेच्या पलीकडे जाऊन कृती करण्याच्या दिशेने पावले उचलूया. प्रत्येक नागरिकाने जरी एक लिटर पाणी वाचवले, त्याचा पुनर्वापर केला किंवा त्याचे पुनर्भरण केले, तर एक राष्ट्र म्हणून आपल्याला १४० कोटी लिटरहून अधिक पाण्याची बचत करता येईल. पाणी वाचवणे ही एक दैनंदिन सवय बनू द्या. जल-सुरक्षित भारत - जिथे प्रत्येक थेंब मौल्यवान समजला जाईल, प्रत्येक स्रोताची देखभाल केली जाईल आणि प्रत्येक नागरिक या अनमोल संसाधनाचा संरक्षक बनेल, असा भारत केवळ धोरणांच्या माध्यमातूनच नव्हे, तर येथील लोकांनी त्यांच्या दैनंदिन जीवनात निवडलेल्या पर्यायांमुळेही घडविता येईल.

(लेखक केंद्रीय जलशक्ती मंत्री आहेत)

### रामराज्याचा आदर्श आणि वास्तवता

प्रभू श्रीराम यांनी अयोध्येचे 'अ योध्येपण'म्हणजेच शांतता, सुव्यवस्था आणि धर्मनिष्ठा कधीही भंग होऊ दिले नाही. ''जननी जन्मभूमिश्च स्वर्गादपि गरीयसी'' ही भावना त्यांनी आपल्या आचरणातून साकारली. मातृभूमीचे रक्षण, प्रजेचे कल्याण आणि न्यायनिष्ठ राज्यकारभार हेच त्यांच्या जीवनाचे केंद्रबिंदू होते. रामराज्याची संकल्पना म्हणजे प्रजेच्या सुखाला सर्वोच्च स्थान देणारी व्यवस्था. त्या काळात राजा स्वतःच्या वैयक्तिक सुख-दुःखांपेक्षा समाजहिताला प्राधान्य देत होता. निर्णयप्रक्रियेत पारदर्शकता होती आणि प्रजेला न्याय मिळत असल्याचा ठाम विश्वास होता. आजच्या काळात आपण पाहतो की, विज्ञान-तंत्रज्ञानाच्या प्रगतीसोबत अनेक क्षेत्रांत विकास होत असला, तरी सामाजिक आणि नैतिक आव्हानेही वाढताना दिसतात. सीमांवरील तणाव, अंतर्गत सुरक्षेची चिंता, तसेच काही ठिकाणी वाढणारा स्वार्थ आणि भ्रष्टाचार यामुळे समाजात अस्वस्थतेचे वातावरण निर्माण होते. व्यक्तीच्या प्रगतीबरोबरच समाजहिताची जाणीव टिकवून ठेवणे ही काळाची गरज आहे.

रामांच्या दूरदृष्टीचे उदाहरण म्हणजे हनुमानावर सोपवलेली जबाबदारी. दक्षिण दिशेकडे लक्ष ठेवून राष्ट्राच्या सुरक्षेची जाणीव त्यांनी कायम ठेवली. तसेच बिभीषणाला लंकेचे राज्य देताना धर्माधिष्ठित नेतृत्वाची स्थापना केली. आजच्या समाजानेही या तत्त्वांचा विचार करण्याची गरज आहे. न्याय, कर्तव्यनिष्ठा, पारदर्शकता आणि राष्ट्रभक्ती. शासन आणि नागरिक यांच्यात विश्वासाचे नाते निर्माण होणे, तसेच प्रत्येकाने आपली सामाजिक जबाबदारी ओळखणे, हे अत्यंत आवश्यक आहे. रामराज्य हे त्रेतायुगातील अध्यात्मातील आदर्श नसून, वर्तमानाला दिशा देणारे मूल्य आहे. प्रत्येकाने आपल्या आचरणात सत्य, धर्म आणि कर्तव्य यांचा स्वीकार केला, तरच खऱ्या अर्थाने रामराज्य साकार होऊ शकते. या राम नवरात्राच्या काळात, प्रभू श्रीरामांच्या आदर्शांचे स्मरण करून आपणही एक संकल्प करूया. आपल्या जीवनात सत्य, कर्तव्य आणि राष्ट्रनिष्ठा यांचा दृढपणे स्वीकार करण्याचा. आपल्या कृतीतून समाजहित जपण्याचा आणि नैतिक मूल्यांचे पालन करण्याचा प्रयत्न करूया.

**रमा देशमुख**/नागपूर

## वाचक पत्रे

### वणवे रोखा, निसर्गसंपदा वाचवा!

उन्हाळ्यात ठिकठिकाणी वणवे लागून व काही समाजकंटकामार्फत वणवे लावून वर्षानुवर्षे वाढवलेली बहुमोल निसर्गसंपदा आगीच्या भक्ष्यस्थानी पडत असते. उन्हाळ्यात लागणारे हे वणवे नैसर्गिक असल्याचे भासवले जाते पण हे यातील बरेचसे वणवे मानवनिर्मितच असतात हे उघड सत्य आहे. काही समाजकंटक जाणीवपूर्वक शहराजवळच्या डोंगरावरील हिरवाईला वणवे लावून ती नष्ट करतात. चराईकरिता चांगले गवत यावे या हेतूने हे वणवे लावले जातात. (आग लागल्यावर चांगले व भरपूर गवत उगवते हा त्या मागचा उद्देश असतो.) लाकूडफाटा, कोळसा मिळवण्यासाठी तसेच शेती व शिकारीसाठी जमीन तयार करण्यासाठी या बहुमोल निसर्गसंपदेला आगी लावल्या जातात. या आगीत वृक्ष, वनस्पती, वन्यजीवांची हानी, स्थलांतर यामुळे जे नुकसान होत असते त्याची भरपाई होण्यास खूप वर्षांचा कालावधी जातो. निसर्गाची अपरिमित हानी होते. या आगीमुळे पर्यावरणाची हानी तर होतेच पण कार्बनडायऑक्साईडही वातावरणात वाढतो. त्यामुळे पृथ्वीचे तापमान वाढते. एकूणच झाडांना लावल्या जाणाऱ्या या आगी म्हणजे राष्ट्रीय हानी आहे. असे असतानाही या मानवनिर्मित वणव्यांकडे केंद्र व राज्याचे वने आणि पर्यावरण खाते, पोलिस खाते दुर्लक्ष करीत असतात. आगी लावणाऱ्या या समाजकंटकांवर पोलिस तसेच प्रशासन कोणतीही कारवाई करीत नाही. त्यामुळेच वणव्यांच्या घटनांत वाढ होताना दिसत आहे. काही भ्रष्ट कर्मचारी आणि अधिकारी यांच्यामुळे निसर्गाची कधीही भरून न निघणारी हानी होत आहे, म्हणूनच सरकारने या वणव्यांची गांभीर्याने दखल घ्यायला हवी. वणवे लावून पर्यावरणाची हानी करणाऱ्या समाजकंटकांवर कठोर कारवाई व्हायला हवी. वणव्यांमुळे पर्यावरणाची होणारी हानी टाळायची असेल तर मानवनिर्मित वणवे रोखायलाच हवे.

**श्याम ठाणेदार**/९९२२५४६२९५

### छ. संभाजी महाराजांचा आदर्श

लव्ह जिहादच्या माध्यमातून हिंदू मुलींना भावनिक जाळ्यात ओढून त्यांचे धर्मांतर केले जात आहे. स्वातंत्र्योत्तर काळात हिंदूंच्या असंघटितपणामुळे हिंदू स्वदेशातच अल्पसंख्यक होत आहेत. १९४७ मध्ये भारतात ८.१ टक्के असलेली मुस्लिमांची संख्या २०२६ पर्यंत २० टक्क्यांच्या आसपास पोहोचण्याची शक्यता आहे. पीएफआयसारखी संघटना भारताला २०४७ पर्यंत इस्लामिक राष्ट्र बनवण्याचे स्वप्न पाहत आहे. वक्फ कायदा, लॅण्ड जिहाद आणि लव्ह जिहाद याद्वारे जिहादी कारवायांचे षडयंत्र रचले जात आहे. ही संकटे रोखण्यासाठी हिंदूंनी आता छत्रपती संभाजी महाराजांचा आदर्श डोळ्यांसमोर ठेवून संघटित होणे अनिवार्य आहे.

**अपर्णा जगताप**/पुणे

वाचक पत्रे पाठविण्यासाठी ईमेल ॲड्रेस
tbedit2016@gmail.com

# सोलापुरात आजपासून अध्यात्म, आरोग्य व संस्कारमूल्यांचा जागर

- निर्यापक श्रमण जैन मुनीश्री १०८ वीरसागरजी महाराज व त्यांच्या संघांची उपस्थिती
- बाळीवेसेतील गांधीनाथा रंगजीमध्ये दररोज मेडिटेशन, महावीर भवनमध्ये प्रवचन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

सोलापुरात आध्यात्म, आरोग्य व संस्कारमूल्यांचा जागर आयोजित केल्याची माहिती शुक्रवार पेठ येथील श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्टचे अध्यक्ष सुनील गांधी यांनी पत्रकार परिषदेत दिली.

संतशिरोमणी आचार्यश्री १०८ विद्यासागरजी महाराज यांचे शिष्य निर्यापक श्रमण जैन मुनीश्री १०८ वीरसागरजी महाराज यांच्यासह मुनीश्री विशालसागरजी, धवलसागरजी, मंथनसागरजी, मननसागरजी, विरलसागरजी तसेच क्षुल्लक श्री १०५ विजितसागरजी महाराज यांच्या पावन उपस्थितीत विविध आध्यात्मिक व सामाजिक उपक्रम होणार असल्याचे त्यांनी सांगितले. यावेळी वालचंद शिक्षण समूहाचे विश्वस्त पराग शहा, श्री आदिनाथ महाराज दिगंबर जैन मंदिर ट्रस्टचे विश्वस्त राजकुमार कोठडिया, अरविंद शहा, सचिव आशितोष शहा, सहसचिव सुहास शहा (कोठारी), प्रा. मनीष शहा, मंगेश शहा, पराग गांधी, प्रशांत कोठडिया, महिला अध्यक्षा पल्लवी मेहता व



सचिव निशा गांधी आदी उपस्थित होते.

**असे असणार उपक्रम**

२४ मार्चपासून दररोज : सकाळी ६:३० वाजता, बाळीवेस येथील गांधी नाथा जैन बोर्डिंग येथे ध्यान, प्राणायाम, मनःशांती तंत्रे आणि सकारात्मक विचारसरणी विकसित करण्यासाठी मार्गदर्शन.

शुक्रवार पेठेतील महावीर भवनात तसेच दररोज : सकाळी ८:३० वा. व दुपारी ३:३० सखोल प्रवचन सत्र, सायंकाळी ६:१५ भक्ती आरती व शंका समाधान.

**२९, ३० व ३१ मार्च :** भगवान महावीर जन्म कल्याणक महोत्सवानिमित्त श्री आदिनाथ दिगंबर जैन मंदिर समोरील भगवान महावीर भवन विविध आध्यात्मिक कार्यक्रम.

**६ ते १४ एप्रिल :** वालचंद शिक्षण समूहात विविध कार्यक्रम. ९ एप्रिल २०२६ रोजी नवकार इंटरनॅशनल दिवस साजरा

**दोन दिवसीय विशेष कार्यशाळा**

मुनीश्रींनी आपल्या मनोगतात वालचंद शिक्षण समूहासाठी दोन दिवसीय विशेष कार्यशाळा आयोजित करण्याचा मानस व्यक्त केला आहे. पहिला दिवस शिक्षकांसाठी, दुसरा दिवस विद्यार्थ्यांसाठी या कार्यशाळेचा मुख्य उद्देश केवळ शैक्षणिक प्रगतीपुरता मर्यादित नसून, विद्यार्थ्यांच्या व्यक्तिमत्वाचा सर्वांगीण विकास घडवणे हा आहे. आजच्या तणावग्रस्त आणि स्पर्धात्मक वातावरणात विद्यार्थ्यांमध्ये वाढत चाललेली अस्थिरता, एकाग्रतेचा अभाव, नैतिक मूल्यांतील घट आणि जबाबदारीची कमी जाण या पार्श्वभूमीवर ही कार्यशाळा अत्यंत उपयुक्त ठरणार आहे.



# नवतेजस्विनी महोत्सव : बँकांच्या माध्यमातून महिला बचत गटांना मिळाले आर्थिक पाठबळ

**नागरिकांनी प्रदर्शनाला भेट देण्याचे आवाहन** | **प्रदर्शनात ३६ स्टॉलची उभारणी**

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर दि. २३ मार्च-**

माविमच्या ५१ व्या वर्धापन दिनानिमित्त नव तेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत महिला बचत गट उत्पादित विविध वस्तू व खाद्यपदार्थ विक्री आणि प्रदर्शनाचे उद्घाटन अप्पर जिल्हाधिकारी गणेश निऱ्हाळी यांच्या हस्ते झाले.

याप्रसंगी जिल्हा समन्वय अधिकारी मन्सूर पटेल, नाबार्डचे जिल्हा विकास व्यवस्थापक नितीन शेळके, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा माविमचे राजकुमार पवार, विभागीय व्यवसाय सल्लागार सिद्धाराम माशाळे, तालुका व्यवस्थापक रणजित शेंडे व माविम अधिकारी प्रशांत गायकवाड उपस्थित होते. उद्घाटन प्रसंगी अप्पर जिल्हाधिकारी गणेश नि-हाळी यांनी महिलांना शुभेच्छा देताना सांगितले की, पुढील दोन दिवसांत मी स्वतः माझ्या कुटुंबासह येथे येऊन खाद्यपदार्थांचा आस्वाद घेईन. उपस्थितांनीही स्टॉलला भेट देऊन महिलांच्या प्रयत्नांना प्रोत्साहन द्यावे, असे आवाहन त्यांनी केले.

या महोत्सवात महिला बचत गटांना बँकांच्या माध्यमातून मोठे आर्थिक पाठबळ मिळाले. बँक ऑफ इंडियाकडून २४ गटांना एकूण १ कोटी ७६ लाखांचे धनादेश, बँक ऑफ महाराष्ट्रतर्फे कामधेनू व राजमाता गटांना १ कोटी १४ लाखांचे धनादेश तर आयसीआयसीआय बँकेतर्फे १०५ स्वयंसहायता महिला बचत गटांना तब्बल ४ कोटी ५० लाखांचे धनादेश वितरण करण्यात आले. प्रदर्शनात एकूण ३६ स्टॉल उभारण्यात आले असून त्यात खाद्यपदार्थांसह दैनंदिन वापराच्या वस्तूंची विक्री सुरू आहे. महिलांच्या उद्यमशीलतेला चालना देणारा हा उपक्रम स्वावलंबनाच्या दिशेने महत्त्वाचे पाऊल ठरेल तर धनादेशातून मिळालेले हे पाठबळ महिलांना आर्थिकदृष्ट्या सक्षम बनविण्यासाठी उपयुक्त ठरेल, असे माविमच्या वतीने सांगण्यात आले. प्रारंभी मान्यवरांच्या हस्ते सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात झाली. महिलांनी सामूहिक गीत गायन करून वातावरण भारावून टाकले.


## जाहिर नोटीस

तमाम लोकांना विशेषतः शहर सोलापूर, तालुका उत्तर सोलापूर येथील तसेच आजूबाजूच्या परिसरातील लोकांना आमच्या अशिलानी दिलेल्या माहिती व कागदपत्रावरुन या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

डि।। व सब डि।। सोलापूर पैकी शहर सोलापूर महानगरपालिका ग.व.सु. हद्दीतील पेठ-फक्रोद्दीन नगर, सोलापूर या नांवाने ओळखल्या जाणाऱ्या नगरातील झोपडी घर नं.६ यांसी म.न.पा. मिळकत क्र.०२०१८०२६७० ही मिळकत घरजागा आहे. सदर ठिकाणी १० × १० फुटाची एक खोली आहे. सदरची खोली वीट, मातीने बांधून वरती पन्हाळी पत्रे, वासे घातलेले आहे. आमचे अशिल नसीमाबी मंहमदउस्मान शेख यांचे वडिल जहाँगीर साो. मिर्झा सो बेग यांचे नांवावर असून पै. जहाँगीर साो. मिर्झासो बेग यांचे दिनांक ०९/०७/२००६ रोजी सोलापूर येथे मृत्यु झालेला आहे. तसेच आमचे अशिलाचे आई म्हणजे मयताचे पत्नी पै. फातिमा जहाँगिर बेग यांचे दि.०४/०३/२०१७ रोजी मृत्यु झालेला आहे. या दोघांचे मृत्युपश्चात आमचे अशिल हे त्यांचे एकमेव मुलगी या नात्याने वारस असून त्यांचेशिवाय अन्य कोणीही वारस नाहीत.

आमचे अशिल नसीमाबी मंहमदउस्मान शेख हे विवाहीत असून त्यांचे लग्नपुर्वीचे माहेरकडील नांव मैमुनिसाबेगम जहाँगिरसाहेब बेग असे असून त्यांचे लग्नानंतरचे सासरकडील नांव नसीमाबी मंहमदउस्मान शेख असे आहे. या दोन्ही नांवाची व्यक्ती ते एकच असून ते मयत जहाँगीर साो. मिर्झासो बेग यांचे एकमेव विवाहीत मुलगी या नात्याने सदर वर नमुद मिळकतीस वारस आहेत.

सदरहू घर नं. ६ फक्रोद्दीनगर झोपडपट्टी या मिळकत घरजागेत आमचे अशिल राहणेस असून सदरची मिळकत आजमितीस त्यांचे कब्जेवहिवाटीत आहे. सदर मिळकतीवरील आमचे अशिलाचे मयत वडील पै. जहाँगीर साो. मिर्झासो बेग यांचे सदर मिळकतीवरील म.न.पा.तील नांव कमी करुन आमचे अशिल नसीमाबी मंहमदउस्मान शेख यांचे नांवाची वारस नोंद करणेकामी सो.म.पा.चे कर आकारणी ग.व.सु. विभागाचे दप्तरी वारस नोंद होऊन त्यांचे नांवे कर पावती मिळावे याकरिता आमचे अशिल म.न.पा.कडे अर्ज दाखल करणार आहेत.

तरी सदरहू घरजागेवर आमचे अशिला व्यतिरिक्त इतर कोणाचाही कुठल्याही प्रकारचे हक्क व अधिकार असेल अथवा इतर कोणाचाही कसल्याही प्रकारचा हक्क व हितसंबंध, गहाण, दान, बक्षिस, लीज, करार, मदार, टाच, जप्ती, बोजा, पोटगी, बक्षिसपत्र, खरेदीखत अगर इतर हक्क व हितसंबंध असल्यास त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झालेपासून ७ दिवसाचे आंत हक्काचे व अधिकाराचे लेखी कागदोपत्री पुराव्यानिशी खालील पत्यावर लेखी हरकत नोंदवावी. मुदतीत कोणाचेही कसलेही हरकत व तक्रार न आल्यास ही घरजागा निर्वेध, निजोखमी आहे असे समजून आमचे अशिल त्यांचे नांवाची वारस नोंद सो.म.पा.चे कर आकारणी विभाग.ग.व.सु. विभागाचे दप्तरी त्याचे नावाची वारस नोंद करून घेतील व त्यानंतर कोणाचेही व कसल्याही प्रकारचे तक्रार व हरकतीचा विचार केला जाणार नाही याची नोंद घ्यावी.

ही जाहीर नोटीस दिली तारीख २३/०३/२०२६

सही/-
**ढेकणे एस. एम.**
ॲडव्होकेट
रा. १२६-अे वाणी गल्ली बाळे, ता. उत्तर सोलापूर जि. सोलापूर
अशिलातर्फे ॲडव्होकेट

## खरेदीपूर्व जाहिर नोटीस

तमाम लोकांस सोलापूर जिल्ह्यातील व विशेषतः मौजे मैंदर्गी (ग्रामीण) ता. अक्कलकोट जि. सोलापूर तसेच सोलापूर जिल्ह्यातील लोकांना या खरेदीपुर्व जाहिर नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

मिळकतीचे वर्णन : डि. व सब डि तालुका अक्कलकोट मौजे मैंदर्गी (ग्रामीण) ता. अक्कलकोट येथील शेतजमीन गट नं.३२१/१/अ यांसी एकूण क्षेत्र १ हे १९ आर आकार १ रु ७३ पै इतकी असून सदरची जमीन हि जिरायत आहे. त्यांसी चतुःसिमा : पुर्वेसः मैंदर्गी दुधनी रस्ता, पश्मिचेस : सुरेखा काशिनाथ दिवटे यांची जमीन, दक्षिणेस : सुरेश विठ्ठल नागुर यांची जमीन व उत्तरेस : इरप्पा लक्ष्मण चिक्कळी यांची जमीन ही शेतजमीन व आतील दगड माती तंदगभूत वस्तूसह व वहिवाटीचे इजमेंटचे सर्व हक्कासहची जमीन हि **धानय्या शिवानंद मठपती** यांचे स्वतंत्र मालकी व कब्जे वहिवाटीची होती व आहे. सदर मिळकत हि त्यांनी आमचे अशील सुरेश विठ्ठल नागुर यांना कायमखुष खरेदीने देण्याचे ठरवुन रितसर इसारा पावती करुन इसारा रक्कम स्विकारलेली आहे. सदरहू मिळकत हि निर्वेध व निजोखमी असल्याची खात्री व विश्वास त्यांनी आमच्या अशीलांना दिलेली आहे.

तरी वर नमुद मिळकतीवर इतर कोणाचाही अग्रहक्क, मालकी, साठेखत, लिज, जप्ती, टाच, गहाण, कर्ज, दान, खरेदीखत, बक्षीस, पोटगी, बोजा, कब्जा व इतर कोणत्याही प्रकारचा हक्क हितसबंध असल्यास हि खरेदीपुर्व जाहिर नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन सात दिवसाच्या आत खालील पत्यावर कागदपत्रे पुराव्यानिशी लेखी हरकत नोंदवावी. मुदतीनंतर कोणाचीही कोणतीही तक्रार अगर हरकत आमच्या अशिलावर अथवा वर नमुद जमिनीवर बंधनकारक राहणार नाही. कोणाचीही फसगत होऊ नये म्हणुन हि खरेदीपुर्व जाहिर नोटीस दिली असे. ता. २३/०३/२०२६

सही/-
**ॲड. ए. डी. नाईकवाडी**
नोटरी भारत सरकार
रा. १८८६/४ विणकर वसाहत,
मैंदर्गी ता. अक्कलकोट
मो.नं. ९८८१५२२९०७
अशिल- सुरेश विठ्ठल नागुर

## PUBLIC NOTICE

Notice is hereby given to the public in large that, The property mentioned in schedule hereunder is purchased by Anuradha Vijaykumar Waghmare by registered sale deed.

That, prior sale deed bearing R.E. No. 465/2003, dated 04-02-2003 & Reconvenyce Deed R.E. No. 2408/2025, dated 02-05-2025. That, the said sale deeds have been lost by Anuradha Vijaykumar Waghmare. Now the original sale deeds are no available with her and accordingly she has filed missing complaint at Sadar Bazar Police Station, Solapur City bearing its Missing Online Registered Loss online Report dated 23-03-2026.

Our Client is going to take a loan from ICICI Home Finance Ltd, Br. Solapur by securing the mortgage. All persons or institutions having any claim or right in respect of the said property or any part thereof by way of inheritance, share, sale, mortgage, lease, lien, license, gift, exchange, trust, possession or encumbrance or otherwise howsoever are hereby required to inform the same in writing supported with the original documents to the undersigned at the address given below mentioned, within 7 days from the date of publication of this notice, failing which, the claim or claims, if any of such person, persons or institution/s shall be considered to have been waived and /or abandoned. Further, it is also hereby informed through this public notice that no one should deal with the said properties on the basis of the said properties on the basis of the said documents.

**THE SCHEDULE OF THE PROPERTY**

District and sub District Solapur, Taluka Pandharpur, within limits of Zilla Parishad Boundry at Mouje Isbavi property bearing Gut No. 93, out of Plot No. 22/1 admeasuring area 144.00 Sq.mtr. & online 7/12 extract admeasuring area 1.44.00 Are. Sq.Mtr., & it is bounded and surrounded by East: Plot No.22/2, West :-Plot No. 21, South: Plot No. 29, North:- Road.

This Notice is issued on 23-03-2026

सही/-
**ॲड. सलाम मोहम्मदसाब बगलुल**
B.A., LL.B., M.S.W. D.M.C.J.
ॲडव्होकेट
ऑफिस पत्ता, गाळा नं. १०, पहिला मजला, दारुस्सलाम अपार्टमेंट, सिध्देश्वर पेठ, सोलापूर मो.नं. ९८६००९४५९६

## PUBLIC NOTICE
## REGARDING LOSS OF DOCUMENTS

This is to inform the general public that the original documents pertaining to the immovable property bearing City Survey No. 268/A/15, admeasuring 161.50 Square Meters, situated at Mangalwedha Taluka Mangalwedha District Solapur, have been lost/ misplaced while travelling near Solapur Bus Stand area, Solapur, and despite making all possible efforts, the same could not be traced.

In this regard, the property holder, Mr. Bharat Dada Nagane, has lodged an online Lost Documents Report with Solapur City Police, Faujdar Chawadi Police Station on 23/03/2026.

List of Lost Original Documents:

1. Mortgage Release Deed bearing Sr. No. 3057 dated 28/08/2013
2. Sale Deed bearing Sr. No. 363 dated 30/08/1991
3. Registration Receipt of Sale Deed bearing Sr. No. 45 dated 08/01/1998

All the above-mentioned documents have been lost in their original form.

If any person finds the above-mentioned documents, they are requested to hand over the same at the address mentioned below or contact the undersigned. The general public is hereby cautioned not to misuse the said documents in any manner whatsoever.

Further, if any person has any right, claim, or objection in respect of the said documents or the said property, they are required to submit the same in writing within 7 (seven) days from the date of publication of this notice to the undersigned Advocate, failing which it shall be presumed that no such claim or objection exists.

Date : 23/03/2026
Place : Solapur

Sign/-
**Adv. Krishna Vijay Babare**
(LL.B., LL.M.)
Plot No. 12, Jai Malhar Nagar, Bale, Solapur – 413002
Mobile: 9168013333

## महाळुंग श्रीपुर नगरपंचायत, महाळुंग श्रीपुर
## निविदा

जा.क्र १३/२०२६
दिनांक २८/०३/२०२६

या जाहीर निविदा सूचनेद्वारे सर्व पुरवठादार यांना कळविण्यात येते की, महाळुंग श्रीपूर नगरपंचायतीच्या विविध विभागाकरिता सन २०२६-२७ या आर्थिक वर्षाकरिता निविदा मागविण्यात येत आहेत. पुढीलप्रमाणे सविस्तर बाबनिहाय माहिती व निविदा नगरपंचायत कार्यालयात कार्यालयीन वेळेत दि. २४/०३/२०२६ ते दि. ३०/३/२०२६ रोजी सायं. ०५:०० वाजेपर्यंत उपलब्ध राहील. तपशीलप्रमाणे बयाणा रक्कम भरलेल्या निविदा बंद लिफाफा पद्धतीत नगरपंचायत कार्यालयात दि २४/०३/२०२६ ते दि. ३०/०३/२०२६ रोजी सायंकाळी ०५:०० वाजेपर्यंत स्वीकारल्या जातील. मुदतीनंतर आलेल्या निविदा विचारात घेतल्या जाणार नाहीत एक व कोणतीही निविदा स्वीकारणे अथवा नाकारणेचा अधिकार नगरपंचायतीकडून राखून ठेवण्यात आलेला आहे.

| अ. नं. | तपशील | बयाणा रक्कम | निविदा फॉर्म फि |
|---|---|---|---|
| | **वार्षिक निविदा** | | |
| १ | महाळुंग श्रीपुर नगरपंचायत विद्युत विभागा करिता साहित्य पुरवठा करणे. | २०००/- | १०००/- |
| २ | महाळुंग श्रीपुर नगरपंचायत पाणीपुरवठा विभागाकरिता साहित्य पुरवठा करणे. | २०००/- | १०००/- |
| ३ | महाळुंग श्रीपुर नगरपंचायत पाणीपुरवठा विभागातील १ HP ते ४५ HP पर्यंत मोटार दुरुस्ती करणे. | २०००/- | १०००/- |

निविदा कालावधी करार केलेपासून एक वर्ष राहील. निविदेतील अटी व शर्तीत कोणताही बदल करण्याचा अधिकार मुख्याधिकारी यांना राहील.

टीप - अ) लिफाफा क्र. १ मध्ये पुढील कागदपत्रे जोडावीत. १) बयाणा रक्कम भरलेची पावती. २) तांत्रिक व आर्थिक क्षमता सिद्ध करणारी कागदपत्रे. ३) अनुभव पात्रता सिद्ध करणारी कागदपत्रे. ४) निविदाधारकाच्या वतीने कोणास प्राधिकृत केले असल्यास त्याबाबतचे कुलमुखत्यार पत्र किंवा अधिकर्ता अधिकृत असलेचा पुरावा. ५) संविधेमध्ये पदाधिकाऱ्यांचा सहभाग नसलेचे प्रतिज्ञापत्र. ६) पॅनकार्डची साक्षांकीत झेरॉक्स प्रत. ७) लिफाफा क्र.२ मध्ये अक्षरी व अंकात नमूद केलेले दर व योग्य पद्धतीने निविदाधारकाने नमुद केलेप्रमाणे साक्षांकीत केलेल्या मुळ प्रतितील निविदा दर पत्रक द्यावे.

**सही/-**
**मुख्याधिकारी**
**महाळुंग श्रीपुर नगरपंचायत**

S.U. Kathale Charitable Trust
Ph : (02184) 222699, 229312
Dr.B.M. Nene Ashwini Rural Cancer Research And Relief Society's
**Nargis Dutt Memorial Cancer Hospital**
**Shri Navalmal Firodia Memorial**
**Linear Accelerator & Diagnostic Centre**
**Support - TATA MEMORIAL CENTRE**
Agalgaon Road, BARSHI-413401, Dist. Solapur, (M.S.), India.
E-mail: ashwinisociety@gmail.com Web: www.ndmch.org

## TENDER NOTICE

Sealed tenders are invited from Authorized Service Provider for Security Guard services for our 137 beded Nargis Dutt Memorial Cancer Hospital, Barshi for round o' clock security service for period of 36 months. 7 security guard with 12 hour shift required. The number may increase in future subject to need of institute. The copy of Shop Act License, GST Registration Form VI License under section 12(2) of the contract labour (Regulation & Abolition) Act 1970 service provider establishment allotment letter for employee provident fund should be attested with tender submitted. The tender should be reached on or before 28.03.2026 between 9.00 to 5.00 pm in prescribed format at administrative office by hand only. Management reserve rights for Tender Process

**Contact Person :** Kishor Paranjape (Admin Officer) 9921138391
Pradip Karande (Asst. Admin Officer) 9764070008

| **Security Guard Services** | **Consolidate service charges per month (GST Inclusive / Extra as applicable)** |
|---|---|
| Per person 12 hours shift | |

Date: 23/03/2026

**(Sign/-)**
**Adv. Dilip Sopal**
**Executive President**

## सद्संकल्प शिक्षण व समाजसेवा संस्था, सोलापूर
**(अल्पसंख्याक संस्था)**
**शिक्षक पाहिजेत**

या संस्थेच्या अंशतः अनुदानित शाळेत खालील पात्रतेचे सहशिक्षक भरावयाचे आहेत.

| अ. क्र. | पद | शैक्षणिक पात्रता | जागा |
|---|---|---|---|
| १ | सहशिक्षक | एच.एस.सी.डी.एड /डी.टी.एड / बी.एस.सी.बी.एड आणि टीईटी / सीटीईटी | ०१ |

तरी पात्रताधारक उमेदवारांनी संस्थेच्या सोलापूर येथील विश्वभूषण विद्यालय, अभिषेक नगर, अक्कलकोट रोड सोलापूर येथील कार्यालयातून विहीत नमुन्यातील अर्ज घेवून मुलाखतीस सोमवार दि. ३०/०३/२०२६ रोजी सकाळी ठिक ११.०० वाजता मुळ कागदपत्रांसह स्वखर्चाने उपस्थित रहावे.
(संपर्क - मुख्याध्यापक - ९०११०७०७४९)

**सचिव/अध्यक्ष**
**शाळा समन्वय समिती**

## IDFC FIRST Bank Limited

IDFC FIRST Bank
**(erstwhile Capital First Limited, amalgamated with IDFC Bank Limited and presently known as IDFC First Bank Limited) | CIN : L65110TN2014PLC097792**
**Registered Office: -** KRM Towers, 8th Floor, Harrington Road, Chetpet, Chennai- 600031.
Tel : +91 44 4564 4000 | Fax: +91 44 4564 4022

### वित्तीय मालमत्तेचे सुरक्षितीकरण आणि पुनर्रचना आणि सुरक्षित हितसंबंधांची अंमलबजावणी अधिनियम, २००२ च्या कलम १३ (२) अंतर्गत सूचना

खालील कर्जदार आणि सह-कर्जदारांनी **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) कडून खाली नमूद केलेली सुरक्षित कर्जे घेतली. खाली नमूद केलेल्या कर्जदार आणि सह-कर्जदारांची कर्जे त्यांच्या संबंधित मालमत्तेच्या गहाणखताने सुरक्षित करण्यात आली आहेत. त्यांनी संबंधित कर्ज करारांच्या अटी आणि शर्तींचे पालन करण्यात अयशस्वी झाल्यामुळे आणि अनियमित झाल्यामुळे, त्यांचे कर्ज आरबीआयच्या मार्गदर्शक तत्त्वांनुसार एनपीए म्हणून वर्गीकृत करण्यात आले. **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये** विलीन झालेली आणि सध्या **आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड** म्हणून ओळखली जाणारी) यांना देय असलेल्या रकमा खालील तक्त्यात अधिक स्पष्टपणे वर्णन केलेल्या संबंधित सूचनांनुसार नमूद केल्या आहेत आणि त्या रकमेवरील पुढील व्याज देखील लागू असेल आणि त्यांच्या संबंधित तारखांपासून कराराच्या दरानुसार आकारले जाईल.

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 1 | 132692904 | मालमत्तेवर कर्ज | 1. अशोक निवृत्ती पाखरे 2. शैला अशोक पाखरे | 28/02/2026 | INR 9,47,568.36/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिलकट क्रमांक २०३ असलेले निवासी घर, एकूण भूखंड क्षेत्रफळ २५१४ चौ. फूट, दगड, विटा आणि काँक्रीट वापरून बांधलेले निवासी घर, तळमजल्याचे क्षेत्रफळ = ५४०.०० चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ = ५४०.०० चौ. फूट, स्थान: गाव: गायगावहन, ग्रामपंचायत: गायगावहन, तालुका: सांगोला, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०६, आणि सीमा: पूर्व: रस्ता, पश्चिम: शिवाजी मुडे, उत्तर: अनिल खांडेकर, दक्षिण: बाबासो फाते

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 2 | 101132669 & 156689306 | मालमत्तेवर कर्ज | 1. राहुल अशोक डांगे 2. संगीता अशोक डांगे | 26/02/2026 | INR 5,08,507.5/- |

**मालमत्तेचा पत्ता :** ग्रामपंचायत मिलकट क्र. ५३२, गट क्र. ३१०/१ मधील भूखंड क्र. १६३, एकूण क्षेत्रफळ ३३.३० चौ. मीटर, गोपाळपूर येथे स्थित, ग्रामपंचायत गोपाळपूरच्या हद्दीत, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि सीमा: पूर्व: भिंत, पश्चिम: रस्ता, उत्तर: भूखंड क्र. १६४, दक्षिण: बाबर किराणा दुकान भूखंड क्र. १६२

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 3 | 95823212 | मालमत्तेवर कर्ज | 1. संतोषी सुजित बाबर 2. सुजित अनंतराव बाबर | 20/12/2025 | INR 8,08,420.21/- |

**मालमत्तेचा पत्ता :** गट क्रमांक १३९/२ मधील भूखंड क्रमांक १०२ चा संपूर्ण तुकडा, क्षेत्रफळ २०१ चौरस मीटरपैकी १००.५ चौ. मीटर उत्तर बाजू, गाव: मोडनीब, तालुका: माढा, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०१, आणि सीमा: पूर्व: भूखंड क्रमांक १०१, पश्चिम: ९ मीटर रुंद रस्ता, उत्तर: मोकळी जागा, दक्षिण: भूखंड क्रमांक १०२ पैकी उर्वरित क्षेत्र, गट क्रमांक १३९/२ पैकी

| अं. क्र. | कर्ज खाते क्र. | कर्जाचा प्रकार | कर्जदार आणि सह-कर्जदारांची नावे | कलम १३ (२) सूचना दिनांक | कलम १३ (२) सूचनेनुसार थकबाकीची रक्कम |
|---|---|---|---|---|---|
| 4 | 109532981 | मालमत्तेवर कर्ज | 1. शशिकांत जालिंदर माने 2. सत्यजित शशिकांत माने | 26/02/2026 | INR 6,87,117.81/- |

**मालमत्तेचा पत्ता:** ग्रामपंचायत मिलकट क्र. ६०३ असलेले निवासी घर, एकूण भूखंड क्षेत्रफळ ११५० चौ. फूट, दगड, विटा आणि काँक्रीट वापरून बांधलेले निवासी घर, तळमजल्याचे क्षेत्रफळ = ८२८ चौ. फूट, एकूण बांधकाम क्षेत्रफळ ८२८ चौ. फूट, गाव: पुलुज, ग्रामपंचायत: पुलुज, तालुका: पंढरपूर, जिल्हा: सोलापूर, महाराष्ट्र-४१३३०४, आणि सीमा: पूर्व: सुभाष अंकुश सावंत, पश्चिम: मच्छिंद्र पांडुरंग सावंत, उत्तर: रस्ता, दक्षिण: ६०२ गंगुबाई गुलाब सावंत

या प्रकाशनाच्या तारखेपासून ६० दिवसांच्या आत तुम्हाला वरील तक्त्यात दाखवलेल्या तपशीलांनुसार आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) कडे रक्कम त्यांच्या संबंधित तारखांपासून आणि इतर खर्च, शुल्क इत्यादींपासून करारबद्ध व्याजदरासह भरण्याचे आवाहन करण्यात येत आहे. असे न केल्यास, वर नमूद केलेल्या गहाण ठेवलेल्या मालमत्तेविरुद्ध कलम १३ (४) आणि कलम १४ अंतर्गत, आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीची कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये विलीन झालेली आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड म्हणून ओळखली जाणारी) देय रक्कम वसूल करण्यासाठी कार्यवाही सुरू करण्यास अधीन असेल. शिवाय, तुम्हाला सदर कायद्याच्या कलम १३ (१३) अंतर्गत सदर सुरक्षित मालमत्ता विक्री/भाडेपट्टा किंवा इतर प्रकारे हस्तांतरित करण्यास मनाई आहे.

**सही/- अधिकृत अधिकारी**
**आयडीएफसी फर्स्ट बँक लिमिटेड (पूर्वीचे कॅपिटल फर्स्ट लिमिटेड, आयडीएफसी बँक लिमिटेडमध्ये एकत्र केलेले आणि सध्या आयडीएफसी फर्स्ट बँकलिमिटेडम्हणून ओळखले जाते)**

दिनांक : **24/03/2026**
**स्थळ : सोलापूर, महाराष्ट्र**

## The Vaidyanath Urban Co-Op. Bank Ltd.,
**Head Office: Mondha, Parli Vaijnath, Dist. Beed. Pin-431 515.**

The Vaidyanath Urban Co-operative Bank Ltd, Parli Vaijnath Dist. Beed a leading Co-operative Bank having presence in all Maharashtra, urgently requires following post & Location:

| Sr. No. | Name of Post | Vacancy | Qualification | Experience | Location | Age Limit |
|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Law Officer | 1 | LLB/ LLM form registered university, registered with Bar Council of India. | Minimum 5 years experience in any Bank as Law officer | Chatrapati Sambhajinagar | Not above 35 Yrs |
| 2 | Jr. Law Officer | 1 | LLB form registered university, registered with Bar Council of India. | Minimum 1 years experience. | Chatrapati Sambhajinagar | Not above 30 Yrs |
| 3 | Br. Manager | 7 | Graduate in any faculty. ICWA/MBA/JAIIB/CAIIB /LLB will be an added advantage. | Minimum 5 years experience in any Bank as B.M. for this post business, skills are expected. | Parbhani, Latur, Wadwani, Solapur, Nashik, Paithan, Tuljapur | Not above 40 Yrs |
| 4 | Jr. Officer | --- | Graduate in any faculty. GDC&A/JAIIB/CAIIB will be an added advantage | Minimum 5 years experience in any Bank as Jr. Officer. | Any Branch as per requirement. | Not above 35 Yrs |

» Resource from recognized university with good communication skill. Sound Working knowledge of computer is essential.
» Interested candidate fulfilling the above eligibility norms as on the last date of receipt of application, need to send their application along with a detailed resume and latest passport size photograph.
» The application should reach us on or before Dt. 30.03.2026 on the following E-mail address. **hr@vaidyanath.bank.in**

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## महत्त्वाचे

### सूर्यवंशी व्यावसायिक नाही : जितेश शर्मा

**नवी दिल्ली** : वैभव सूर्यवंशी हा व्यावसायिक नाही, असे यष्टिरक्षक-फलंदाज जितेश शर्मा एबी डिव्हिलियर्ससोबतच्या एका पॉडकास्टमध्ये म्हणाला. इंडियन प्रीमियर लीगच्या नवीन हंगामापूर्वी बोलताना जितेशने सूर्यवंशी मैदानाबाहेर कसा वागतो, याची एक झलक उपस्थितांना दिली.



एका १५ वर्षांच्या मुलाकडून तुम्ही नेमकी ज्या प्रकारच्या वागणुकीची अपेक्षा कराल, तसाच तो वागतो. तो व्यावसायिक नाही, हे मी तुम्हाला खात्रीने सांगू शकतो. प्रत्येक जण त्याला व्यावसायिक बनवण्याचा प्रयत्न करत आहे, पण तो कधीही पूर्णपणे व्यावसायिक बनेल असे वाटत नाही, असे जितेश म्हणाला. हे दोन्ही खेळाडू एकमेकांसाठी काही नवीन नाहीत. नोव्हेंबर २०२५ मध्ये झालेल्या रायझिंग स्टार्स आशिया चषक स्पर्धेदरम्यान, भारत अ संघाकडून खेळताना जितेश आणि सूर्यवंशीने एकाच ड्रेसिंग रूममध्ये वेळ घालविला होता. आता मात्र हे दोन्ही खेळाडू एकमेकांचे प्रतिस्पर्धी म्हणून समोरासमोर उभे ठाकणार आहेत. सूर्यवंशी राजस्थान रॉयल्स संघाकडून खेळताना दिसेल, तर जितेश गतविजेत्या असलेल्या रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू संघाचे प्रतिनिधित्व करेल.

### राजस्थान संघात सॅमच्या जागी शनाकाची निवड

**जयपूर** : राजस्थान रॉयल्सने आयपीएल २०२६ स्पर्धेपूर्वी दुखापतग्रस्त सॅम करनच्या जागी श्रीलंकेचा टी-२० संघ कर्णधार दासुन शनाकाची निवड केली आहे. या निवडीमुळे संघातील एक महत्त्वाची पोकळी भरून निघाली आहे. एका मोठ्या आणि गाजलेल्या ट्रेडद्वारे (खेळाडूंच्या अदलाबदलीद्वारे) या संघात सहभागी झालेला करन, मांडीच्या स्नायूंच्या दुखापतीमुळे या हंगामातून बाहेर पडला आहे. आयपीएलच्या लिलावात कोणताही खरेदीदार न मिळाल्याने शनाका सुरुवातीला (पाकिस्तान सुपर लीग) मध्ये लाहोर कलंदर्स संघाकडून खेळणार होता. मात्र, आयपीएलमध्ये सहभागी होण्याची संधी मिळाल्यामुळे त्याने आपला निर्णय बदलला आहे. हा श्रीलंकन अष्टपैलू खेळाडू लवकरच राजस्थान रॉयल्स संघात सहभागी होईल अशी अपेक्षा आहे. करनचा बदली खेळाडू म्हणून शनाकाला २ कोटी रुपयांना करारबद्ध करण्यात आले आहे. या अष्टपैलू खेळाडूने यापूर्वीही गुजरात टायटन्स संघाचे प्रतिनिधित्व केले आहे.

### पाकिस्तानी सशस्त्र गटाची वॉर्नर, स्मिथला धमकी

**कराची** : पाकिस्तानस्थित सशस्त्र गट जमात-उल-अहरारने डेव्हिड वॉर्नर, डॅरिल मिचेल आणि स्टीव्ह स्मिथसारख्या आंतरराष्ट्रीय खेळाडूंना पीएसएलमध्ये सहभागी न होण्याचा इशारा दिला असून, ही स्पर्धा उधळून लावण्याची धमकी दिली आहे. पाकिस्तान क्रिकेट मंडळाने पीएसएल २०२६ चा हंगाम केवळ दोन शहरांमध्ये व प्रेक्षकांविना आयोजित करण्याचा निर्णय घेतला आहे. या हंगामाचे भवितव्य धोक्यात असल्याचे दिसून येत आहे. पीएसएलमध्ये सहभागी होणाऱ्या परदेशी खेळाडूंना या स्पर्धेतून माघार घेण्याचे, अन्यथा गंभीर परिणामांना सामोरे जावे लागेल, असे सांगण्यात आल्याचे वृत्त आहे. जर खेळाडू पीएसएल लीगसाठी पाकिस्तानला गेले, तर त्यांच्या सुरक्षेची कोणतीही हमी देता येणार नाही, असेही या गटाने स्पष्ट केले आहे.

### इम्पॅक्ट प्लेयर नियम आवडत नाही : अक्षर


**नवी दिल्ली** : मला इंडियन प्रीमियर लीगमध्ये लागू करण्यात आलेला इम्पॅक्ट प्लेयर नियम अजिबात आवडत नाही. मी या नियमाच्या विरोधात आहे, असे दिल्ली कॅपिटल्सचा कर्णधार अक्षर पटेल याने म्हटले आहे. या नियमामुळे दहा संघांच्या या स्पर्धेत अष्टपैलू खेळाडूंची भूमिका कमी होत असल्याचे त्याने नमूद केले.

# धोनी, विराट, रोहित आयपीएलसाठी सज्ज

## टी-२० विश्वचषकाचा जल्लोष मावळला, आता आयपीएलची गर्जना सुरू

◆ **नवी दिल्ली, २३ मार्च**

भारताच्या टी-२० विश्वचषक विजयाचा आनंद आणि त्याशी निगडित भावना अजूनही पूर्णपणे मनावर रुजल्या नाहीत तोच, क्रिकेटचे वेळापत्रक मात्र कोणाचीही वाट पाहत नाही. अवघ्या पाच दिवसांतच, सर्वांचे लक्ष इंडियन प्रीमियर लीग (आयपीएल) २०२६ च्या भव्य सोहळ्याकडे वळणार आहे आणि यासहच पुन्हा एकदा थरारक लढती, दिग्गज खेळाडूंचा जलवा आणि अभूतपूर्व आनंद, उत्साहाचा आणखी एक हंगाम सुरू होणार आहे.



राष्ट्रीय स्तरावरील यशाच्या शिखरावरून फ्रॅन्चायझी क्रिकेटच्या विश्वातील उन्मादाकडे होणारा हा प्रवास अत्यंत सहज आणि नैसर्गिक आहे. चाहतेही या हंगामासाठी आतापासूनच सज्ज झाले आहेत. हा हंगाम अत्यंत गाजणारा ठरेल, अशी त्यांना खात्री आहे.

आयपीएल ही आजही जगातील सर्वात फायदेशीर व सर्वाधिक लोकप्रिय टी-२० लीग म्हणून ओळखली जाते. या लीगची सर्वात मोठी ताकद म्हणजे यात सहभागी असलेल्या सुपरस्टार्सची मांदियाळी. एम.एस. धोनी, विराट कोहली, रोहित शर्मा, ऋषभ पंत, शुभमन गिल, हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह - अशी नावे आहे. हे दिग्गज खेळाडू लक्षावधी क्रिकेटप्रेमींच्या मनात घर करून आहेत. ते पुन्हा एकदा या स्पर्धेच्या केंद्रस्थानी असतील. केवळ त्यांच्या उपस्थितीनेच सामन्यांमधील उत्साह शिगेला पोहोचतो आणि प्रत्येक सामना एका अविस्मरणीय सोहळ्यात रूपांतरित होतो.

नेहमीप्रमाणेच, हा हंगाम सुरू होण्यापूर्वी होणाऱ्या चर्चांमध्ये एक प्रश्न प्रामुख्याने विचारला जातो: 'धोनी खेळणे सुरू ठेवणार का?' त्याच्या भविष्याबद्दल अनेक तर्कवितर्क लावले जात असले तरीही, भारताचा हा माजी कर्णधार आपल्या तंदुरुस्तीने, खेळातील चलाखीने आणि क्रिकेटवर आजही कायम असलेल्या आपल्या प्रभावाने सर्वांनाच सतत आश्चर्यचकित करीत असतो. चाहत्यांसाठी, धोनीचा सहभाग असलेली प्रत्येक स्पर्धा म्हणजे एक बोनसच असते. ज्याची चमक आजही जराही कमी झालेली नाही अशा या दिग्गज खेळाडूला प्रत्यक्ष पाहण्याची संधी आहे. विराट व रोहित यांचे पुनरागमन या स्पर्धेतील उत्सुकतेत आणखीच भर घालते. हे दोन्ही दिग्गज खेळाडू आता भारताच्या टी-२० व कसोटी संघांचा भाग नसल्यामुळे, आयपीएल मधील त्यांचे सामने अधिकच महत्त्वाचे ठरतात. त्यांच्या चाहत्यांसाठी, ही लीग आपल्या लाडक्या नायकांना प्रत्यक्ष मैदानात खेळताना पाहण्याचे मुख्य व्यासपीठ ठरते व याबद्दलची उत्कंठा खरोखरच अंगावर रोमांच उभे करणारी असते.

गिलला जरी टी-२० विश्वचषकात खेळण्याची संधी मिळाली नसली, तरी त्याची लोकप्रियता प्रचंड वाढली आहे. त्याने स्वतःला भारतीय क्रिकेटमधील सर्वात तेजस्वी युवा चेहऱ्यांपैकी एक म्हणून प्रस्थापित केले आहे. त्याची मोहक फलंदाजी शैली व क्रिकेट विश्वातील वाढता दबदबा यामुळे तो या हंगामातील एक प्रमुख आकर्षण ठरला आहे. दुसरीकडे, ऋषभ पंत हा देखील एक अत्यंत वेधक व्यक्तिमत्त्व म्हणून चर्चेत आहे. चाहते त्याच्या कामगिरीवर आणि सामन्यावर त्याच्या पडणाऱ्या प्रभावावर बारकाईने लक्ष ठेवून आहेत.

केवळ वैयक्तिक कौशल्याच्या पलीकडे जाऊन, चाहत्यांना काहीतरी अद्वितीय अनुभव देते स्पर्धा, मनोरंजन व भावना यांचा एक सुरेख संगम. ही स्पर्धा चाहत्यांना एक दुर्मिळ संधी उपलब्ध करून देते, जिथे त्यांना त्यांचे आवडते खेळाडू मग ते दिग्गज असोत किंवा नवोदित तारे एकाच व्यासपीठावर एकत्र खेळताना व अविस्मरणीय क्षण निर्माण करताना पाहता येते.

आयपीएल २०२६ जवळ येत असताना, चाहत्यांमधील उत्साह स्पष्टपणे जाणवत आहे. खचाखच भरलेली स्टेडियम्स, प्रेक्षकांचा गगनभेदी जल्लोष आणि शेवटच्या क्षणापर्यंत उत्कंठा वाढवणारे सामने क्रिकेटच्या या सर्वात मोठ्या टी-२० क्रिकेट महोत्सवातील आणखी एका अविस्मरणीय पर्वासाठी सर्व काही सज्ज झाले आहे.

आयपीएल २०२६ च्या हंगामाची सुरुवात २८ मार्च रोजी सायंकाळी ७.३० वाजता होईल. या हंगामातील पहिला सामना गतविजेते रॉयल चॅलेंजर्स बंगळुरू (आरसीबी) आणि सनरायझर्स हैदराबाद यांच्यात बंगळुरू येथील एम. चिन्नास्वामी स्टेडियमवर खेळला जाईल. या सामन्यांचे थेट प्रक्षेपण स्टार स्पोर्ट्स नेटवर्कवर केले जाईल, तसेच जिओ हॉटस्टार (डिजिटल प्लॅटफॉर्मवर) वर त्याचे थेट प्रवाह उपलब्ध असेल.

(वृत्तसंस्था)

# सर्वोत्तम हॉकीपटू पुरस्कारासाठी हार्दिक, सुखजीत, संजय, अभिषेकला नामांकन

## महिलांमध्ये सलीमा, नवनीत, लालरेमसियामी, सविता शर्यतीत

◆ **नवी दिल्ली, २३ मार्च**

भारताचा स्टार मध्यरक्षक हार्दिक सिंग, आक्रमक खेळाडू सुखजीत सिंग व संजय, तसेच बचावपटू अभिषेक हे २०२५ सालासाठीच्या हॉकी इंडिया बलबीर सिंग सीनियर प्लेअर ऑफ द इयर पुरस्काराच्या शर्यतीत आहेत.



हार्दिक सिंग



सलीमा टेटे

महिलांच्या श्रेणीमध्ये सलीमा टेटे, नवनीत कौर, लालरेमसियामी व सविता यांची या सर्वोच्च सन्मानासाठी नामांकन करण्यात आले आहे.

येथे शुक्रवारी आयोजित करण्यात आलेल्या हॉकी इंडिया पुरस्कार वितरण समारंभात, जुगराज सिंग पुरस्कार (२१ वर्षांखालील पुरुष गटातील उदयोन्मुख खेळाडूसाठी) व असुंता लाक्रा पुरस्कार (२१ वर्षांखालील महिला गटातील उदयोन्मुख खेळाडूसाठी) यांच्या माध्यमातून नवोदित प्रतिभेवरही प्रकाशझोत टाकला जाईल.

एकूण आठ श्रेणींमधील ३२ नामांकित खेळाडूंनी अंतिम यादीत स्थान मिळविले आहे. याशिवाय एचआय अध्यक्ष पुरस्कार (उत्कृष्ट कामगिरीसाठी) व जमन लाल शर्मा पुरस्कार (अमूल्य योगदानासाठी) यांसारखे विशेष सन्मानही प्रदान केले जाणार आहे.

तसेच, वर्षातील सर्वोत्तम पंच/पंच व्यवस्थापक, वर्षातील सर्वोत्तम तांत्रिक अधिकारी आणि सर्वोत्तम सदस्य घटक या पुरस्कारांच्या माध्यमातून पदाधिकाऱ्यांचाही गौरव केला जाईल.

या समारंभात, आशिया चषकात सुवर्णपदक जिंकणाऱ्या भारतीय पुरुष संघाचा आणि विश्वचषकांत कांस्यपदक पटकावणाऱ्या कनिष्ठ (ज्युनियर) पुरुष संघाचाही सत्कार करण्यात येईल.

भारतीय हॉकीसाठी अत्यंत महत्त्वाच्या असलेल्या वर्षात आपण पदार्पण करत असताना, गत वर्षभरात केलेली उत्कृष्ट कामगिरी आणि दिलेल्या योगदानाची दखल घेणे महत्त्वाचे आहे. त्यांचे प्रयत्न आणि त्यांनी केलेली प्रगती यांचा गौरव करण्यास आम्ही उत्सुक आहोत, असे हॉकी इंडियाचे अध्यक्ष दिलीप तिर्की यांनी म्हटले.


(वृत्तसंस्था)

# भारतीय तिरंदाज हंगामाची दिशा ठरविण्यास उत्सुक

## बँकॉक आशिया चषक तिरंदाजी आजपासून

◆ **बँकॉक, २३ मार्च**

मंगळवारपासून येथे सुरू होणाऱ्या आशिया चषक - पहिला टप्प्याची तिरंदाजी स्पर्धेसह भारतीय तिरंदाजी संघ आपल्या नवीन आंतरराष्ट्रीय तिरंदाजी हंगामाची सुरुवात करणार आहे. या स्पर्धेसाठी भारताने एका नव्या दमाच्या संघाची निवड केली असून, यात प्रस्थापित दिग्गज खेळाडूंच्या ऐवजी, उत्साही तरुण खेळाडू व पुनरागमन करणाऱ्या अनुभवी खेळाडूंच्या मिश्रणावर भर देण्यात आला आहे.



या स्पर्धेत भारतीय संघात दीपिका कुमारी, अंकिता भगत, धीरज बोम्मादेवरा, तरुणदीप राय, ज्योती सुरेखा वेन्नम व अभिषेक वर्मा यांसारखे प्रमुख खेळाडू सहभागी नसतील. याचे कारण असे की, भारतीय संघ व्यवस्थापनाला (थिंक-टँक) या खंडांतर्गत स्पर्धेचा उपयोग, सप्टेंबर-ऑक्टोबरमध्ये जपानमध्ये होणाऱ्या आशियाई क्रीडा स्पर्धेसह भरगच्च असलेल्या आगामी हंगामासाठी आपल्या राखीव खेळाडूंच्या क्षमतेची चाचणी करण्यासाठी करायचा आहे.

तथापि, भारताचे हे अव्वल तिरंदाज एप्रिल महिन्यापासून सुरू होणाऱ्या जागतिक चषकाच्या पहिल्या दोन टप्प्यांमध्ये- प्युएब्ला (मेक्सिको) व शांघाय येथे - पुन्हा मैदानात उतरतील.

आपले प्रमुख तिरंदाज संघात नसतानाही, गतविजेता असलेला भारतीय संघ या स्पर्धेचा प्रबळ दावेदार मानला जात आहे. गत वर्षीच्या स्पर्धेच्या पहिल्या टप्प्यात भारताने पाच सुवर्णपदकांसह एकूण आठ पदके जिंकून गुणतालिकेत अव्वल स्थान पटकावले होते. जागतिक तिरंदाजीतील महाशक्ती मानल्या जाणाऱ्या दक्षिण कोरियाने या स्पर्धेकडे पाठ फिरवली असल्याने, भारतीय संघ आशिया चषक स्पर्धेतील आपले वर्चस्व कायम राखण्यास उत्सुक असेल.

कोरियाच्या अनुपस्थितीत, चीन व बांगलादेश हे भारताचे मुख्य प्रतिस्पर्धी असतील.

रिकर्व्ह प्रकारातील पुरुष गटात, ऑस्ट्रेलियाचा रायन टायॅक हा जागतिक क्रमवारीत २७ व्या क्रमांकावर असलेला अव्वल तिरंदाज आहे; तर महिला गटात, रशियात जन्मलेली तटस्थ खेळाडू नुरिनिसो माखमुदोवा (क्रमवारी ४५) ही सर्वोच्च मानांकन असलेली तिरंदाज आहे.

(वृत्तसंस्था)

## भारतीय इनडोअर ॲथलेटिक्स भुवनेश्वरमध्ये आजपासून

**भुवनेश्वर** : भारतीय ॲथलेटिक्स महासंघाच्या यजमानपदाखाली मंगळवारपासून येथे इनडोअर ॲथलेटिक्स प्रकारातील पहिल्या-वहिल्या राष्ट्रीय अजिंक्यपद स्पर्धा होणार आहे. दोन दिवस चालणाऱ्या या स्पर्धेच्या आयोजनाद्वारे, दोन वर्षांनंतर याच ठिकाणी होणाऱ्या जागतिक ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धेच्या तयारीचे पहिले पाऊलही भारत उचलत आहे. देशात पहिल्यांदाच अशा प्रकारच्या जागतिक दर्जाच्या ट्रॅक अँड फील्ड स्पर्धेचे आयोजन केले जाणार आहे. भारतात इनडोअर ॲथलेटिक्स हा खेळाचा प्रकार अद्याप फारसा परिचित नाही, तरीही काही भारतीय खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर या प्रकारात सहभागी होत आले आहेत. याचे मुख्य कारण म्हणजे, देशात जागतिक दर्जाच्या इनडोअर क्रीडा सुविधांची असलेली कमतरता. भालाफेकपटू नीरज चोप्रा व धावपटू अविनाश साबळे यांसारखे परिचित चेहरे या स्पर्धेत सहभागी होणार नाहीत, कारण त्यांचे क्रीडा प्रकार या स्पर्धेच्या यादीत समाविष्ट नाहीत.या स्पर्धेसाठी येथील कलिंगा स्टेडियम संकुलात जागतिक दर्जाची क्रीडा सुविधा उभारण्यात आली आहे.

ओडिशा सरकारशी समन्वय साधून काम करणाऱ्या भारतीय ॲथलेटिक्स महासंघाला २०२८ मध्ये येथेच आशियाई इनडोअर ॲथलेटिक्स अजिंक्यपद स्पर्धा आयोजित करण्याचीही आशा आहे.

# दिल्लीला स्टार्कच्या आगमनाची प्रतीक्षा

## क्रिकेट ऑस्ट्रेलियाकडून अद्याप एनओसी नाही

◆ **नवी दिल्ली, २३ मार्च**

दिल्ली कॅपिटल्स संघासोबतच्या आयपीएल प्रवासासाठी क्रिकेट ऑस्ट्रेलियाने मिचेल स्टार्कला अद्याप ना हरकत प्रमाणपत्र (एनओसी) दिलेले नाही, असे या फ्रॅन्चायझीने सोमवारी स्पष्ट केले. मात्र, १ एप्रिल रोजी होणाऱ्या स्पर्धेतील त्यांच्या सलामीच्या सामन्यापूर्वी हा प्रमुख वेगवान गोलंदाज संघात सहभागी होईल, अशी आशा त्यांना अजूनही आहे.

दिल्ली कॅपिटल्सचे खेळाडू अक्षर पटेल, क्रिकेट संचालक वेणुगोपाल राव व मुख्य प्रशिक्षक हेमांग बदानी यांनी संघाच्या या प्रमुख वेगवान गोलंदाजाच्या उपलब्धतेबाबत विचारलेल्या अनेक प्रश्नांची उत्तरे दिली. गत हंगामात स्टार्कने ११ सामन्यांमध्ये १४ बळी घेतले होते. आम्ही क्रिकेट ऑस्ट्रेलियाकडून एनओसी मिळण्याची वाट पाहत आहोत. एकदा का आम्हाला ते मिळाले, की तो आमच्या संघात कधी सामील होईल हे आम्हाला समजेल, असे बदानी म्हणाले.



आम्ही क्रिकेट ऑस्ट्रेलियाच्या सतत संपर्कात आहोत. तो गोलंदाजीचा सराव करत आहे. काही दिवसांपूर्वीच त्याने गोलंदाजी केली होती. जोपर्यंत क्रिकेट ऑस्ट्रेलिया त्याला खेळण्यासाठी तंदुरुस्त असल्याचे प्रमाणपत्र देऊन हिरवा कंदील दाखवत नाही, तोपर्यंत फ्रॅन्चायझी म्हणून आम्ही फार काही करू शकत नाही, असे प्रशिक्षकांनी सांगितले.

एनओसी मिळण्यास होणारा विलंब हा तंदुरुस्तीच्या समस्येमुळे आहे की कामाच्या भाराच्या व्यवस्थापनामुळे असे विचारले असता वेणुगोपाल राव म्हणाले की, तो नक्कीच येणार आहे; प्रश्न केवळ क्रिकेट ऑस्ट्रेलियाकडून एनओसी मिळण्याचा आहे. क्रिकेट ऑस्ट्रेलिया व आम्ही स्टार्कच्या तंदुरुस्ती व कामाच्या भारावर लक्ष ठेवून आहोत. राव व बदानी यांच्या सानिध्यात बसलेल्या अक्षरला असा प्रश्न विचारण्यात आला की, जर स्टार्क १ एप्रिल रोजी लखनौ येथे विरुद्ध होणाऱ्या संघाच्या पहिल्या सामन्यापूर्वी वेळेवर पोहोचू शकला नाही, तर त्याच्या जागी टी. नटराजन्ला खेळवण्यासाठी तो तयार आहे का? या टप्प्यावर याचे उत्तर देणे कठीण आहे. जर स्टार्कला एनओसी मिळाले, तर तो पहिल्या सामन्यापूर्वीही येऊ शकतो. आम्ही त्या माहितीची वाट पाहत आहोत. जर तो आला नाही, तर एका डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाच्या जागी दुसऱ्याच डावखुऱ्या वेगवान गोलंदाजाला घेण्याचा कोणताही मोह आमच्या मनात नाही.

(वृत्तसंस्था)

# माद्रिदचा ॲटलेटिकोवर ३-२ ने रोमांचक विजय

## ला लीगा फुटबॉल ● विनिसियस ज्युनियरचे महत्त्वपूर्ण दोन गोल

◆ **बार्सिलोना, २३ मार्च**

ला लीगा फुटबपॉल स्पर्धेत आक्रमक खेळाडू विनिसियस ज्युनियरने नोंदविलेल्या महत्त्वपूर्ण दोन गोलच्या बळावर रियल माद्रिदने ॲटलेटिको माद्रिदवर ३-२ अशा एका गोलच्या फरकाने रोमांचक विजय नोंदविला. या विजयाबरोबरच रियल माद्रिद संघ ला लीगा विजेतेपदाच्या शर्यतीत कायम राहिला.



या मोसमाच्या सुरुवातीला प्रशिक्षक झाबी अलोन्सो यांना पदावरून दूर केल्यामुळे व काही लाजिरवाण्या पराभवांमुळे विनिसियसला माद्रिदच्या चाहत्यांच्या टोमण्यांना सामोरे जावे लागले होते. निकाल सुधारत गेल्यामुळे माद्रिदच्या समर्थकांकडून विनिसियसला मिळणारा प्रतिसादही सुधारला आहे. सप्टेंबरमध्ये झालेल्या ५-२ च्या मानहानीकारक पराभवानंतर ॲटलेटिकोवरील विजय आणि चॅम्पियन्स लीगमध्ये पेप गार्डिओलाच्या मॅन्चेस्टर सिटीला बाहेर काढल्यामुळे, नवीन प्रशिक्षक अल्वारो अर्बेलोआ यांच्या मार्गदर्शनाखाली माद्रिदने एक उच्च टप्पा गाठला आहे. संघाच्या अलीकडील सुधारलेल्या कामगिरीचे श्रेय विनिसियसला योग्यरित्या दिले जात आहे, कारण स्टार खेळाडू किलियन एमबाप्पे आणि ज्यूड बेलिंगहॅम दुखापतीमुळे बाहेर आहे. विनिसियसने मिडफिल्डर फेडेरिको वाल्व्हर्डेसोबत माद्रिदला नेतृत्व करण्यास मदत केली.

(वृत्तसंस्था)

# अरुंधती रेड्डी, फरहान महिन्याचे मानकरी

◆ **दुबई, २३ मार्च**

ऑस्ट्रेलियाविरुद्धच्या टी-२० आंतरराष्ट्रीय मालिकेत केलेल्या उत्कृष्ट कामगिरीबद्दल भारताची मध्यमगती गोलंदाज अरुंधती रेड्डी हिला आयसीसीने सोमवारी महिन्याची सर्वोत्तम खेळाडू म्हणून घोषित करण्यात आले. हा पुरस्कार तिला फेब्रुवारी महिन्यातील कामगिरीसाठी देण्यात आला आहे.



पुरुषांच्या टी-२० विश्वचषकातील आपल्या असाधारण कामगिरीबद्दल पाकिस्तानचा सलामीवीर साहिबजादा फरहान यालाही फेब्रुवारी महिन्याचा मानकरी म्हणून गौरवण्यात आले.

ऑस्ट्रेलिया दौऱ्यावर अरुंधती रेड्डीने आपल्या उत्कृष्ट गोलंदाजीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तिच्या या कामगिरीमुळे भारताला ऑस्ट्रेलियाविरुद्धची तीन सामन्यांची टी-२० मालिका २-१ ने जिंकण्यात मोलाची मदत झाली. या मालिकेत सर्वाधिक बळी घेणारी गोलंदाज ती ठरली. तिने अनुक्रमे ४/२२, २/३० आणि २/३५ अशी गोलंदाजीची आकडेवारी नोंदविली.

फेब्रुवारी महिन्यातील मानकरी म्हणून निवड होणे हा माझ्यासाठी खरोखरच एक मोठा सन्मान आहे. विशेषतः, ऑस्ट्रेलियामध्ये टी-२० मालिका जिंकण्यात मी योगदान देऊ शकले, हे जाणून मला अधिकच विशेष वाटते. ऑस्ट्रेलियाला त्यांच्याच मायभूमीवर पराभूत करणे कधीच सोपे नसते; त्यामुळे हा पुरस्कार माझ्यासाठी अधिकच अर्थपूर्ण ठरतो, असे अरुंधती रेड्डी म्हणाली.

साहिबजादाने अनेक दिग्गज खेळाडूंना मागे टाकत हा पुरस्कार पटकावला. टी-२० विश्वचषकाच्या एकाच हंगामात सर्वाधिक धावा करण्याचा विराट कोहलीचा विक्रम त्याने मोडला. तसेच, या स्पर्धेच्या एकाच हंगामात दोन शतके (नामिबिया व श्रीलंका यांच्याविरुद्ध) झळकावणारा तो पहिलाच खेळाडू ठरला. या आक्रमक सलामीवीराने सात टी-२० सामन्यांमध्ये ३८३ धावांचा डोंगर उभारला. यात त्याने ७६.६० ची प्रभावी सरासरी आणि १६०.२५ चा उत्कृष्ट स्ट्राइक रेट राखला.

(वृत्तसंस्था)

# अल्काराझचा सेबास्टियन कोर्डाकडून पराभव

### मियामी ओपन टेनिस

◆ **मियामी गार्डन्स, २३ मार्च**

मियामी ओपन टेनिस स्पर्धेच्या तिसऱ्या फेरीत स्पेनच्या कार्लोस अल्काराझचे आव्हान संपुष्टात आले. त्याला सेबास्टियन कोर्डाकडून तीन सेट्समध्ये पराभव पत्करावा लागला.

जानेवारीमध्ये ऑस्ट्रेलियन ओपनचे विजेतेपद पटकावून करिअर ग्रॅण्ड स्लॅम पूर्ण करणाऱ्या २२ वर्षीय अल्काराझची या हंगामातील कामगिरी १७-२ अशी झाली आहे. पुरुष एकेरीच्या जागतिक क्रमवारीत अव्वल स्थानी असलेल्या या खेळाडूला गत आठवड्यात इंडियन वेल्स येथील उपांत्य फेरीत डॅनिल मेदवेदेवकडूनही पराभव स्वीकारावा लागला होता.



कार्लोस अल्काराझ



सेबास्टियन कोर्डा

दुसऱ्या सेटमध्ये ५-४ अशा स्थितीत असताना कोर्डा सामन्यासाठी सर्व्हिस करीत होता; परंतु अल्काराझने जोरदार पुनरागमन करत सलग पाच गेम्स जिंकले. त्यानंतर २५ वर्षीय कोर्डाने पुन्हा स्वतःला सावरले आणि दोन तास १९ मिनिटांत ६-३, ५-७, ६-४ असा विजय मिळवित सामना आपल्या नावी केला.

हा सामना अर्थातच खूप कठीण होता. कोर्डा अविश्वसनीय खेळला. त्याने अत्यंत उत्कृष्ट खेळ केला. सामन्यात अनेकदा बरोबरीची स्थिती निर्माण झाली होती, त्याचा मला पुरेपूर फायदा घेता आला नाही. त्या महत्त्वाच्या गुणांच्या आणि क्षणांच्या बाबतीत तो माझ्यापेक्षा सरस ठरला, , असे अल्काराझ म्हणाला.

गत वर्षी मियामीमध्ये दुसऱ्या फेरीत ५५ व्या क्रमांकावरील डेव्हिड गॉफिनने ही कामगिरी केल्यापासून, अल्काराझचा पराभव करणारा कोर्डा हा सर्वात कमी मानांकन असलेला खेळाडू ठरला आहे.

कोर्डाचा पुढील सामना पात्रता फेरीतून आलेल्या मार्टिन लँडालुसशी होईल. लँडालुसने १४ वे मानांकन असलेल्या कॅरेन खाचानोव्हचा ६-३, ७-६ (२) असा पराभव करत पुढील फेरीत प्रवेश केला आहे.

अमेरिकेचे खेळाडू टेलर फ्रिट्झ आणि टॉमी पॉल यांनीही कोर्डासह चौथ्या फेरीत स्थान मिळवले. सहावे मानांकन असलेल्या फ्रिट्झने रेली ओपेल्काचा ६-३, ६-४ असा पराभव केला, तर २२ वे मानांकन असलेल्या पॉलने राफेल कोलिग्नॉनला ६-२, ३-६, ७-६ (५) अशा विजयासह स्पर्धेबाहेर केले. जिरी लेहेका, हॅलेंटिन व्हॅचेरो व टॉमस मार्टिन एचेव्हेरी हे देखील विजेत्यांच्या यादीत आहे.

महिलांच्या गटात, अव्वल मानांकित आर्यना सबालेंका हिने कॅथरीन मॅकनॅलीचा ६-४, ६-२ असा सहज पराभव केला. एलेना रायबाकिना हिने मार्टा कोस्त्युकला ६-३, ६-४ असे हरवले, तर जेसिका पेगुला हिने लैला फर्नांडिसवर ६-२, ६-२ असा विजय नोंदविला.

जस्मिन पाओलिनी,एलिना स्वितोलिना, एकातेरिना अलेक्झांड्रोवा, मॅडिसन कीज व इवा जोविक या स्पर्धेबाहेर पडल्या.

(वृत्तसंस्था)

सोलापूर तरुण भारत, सोलापूर येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड, तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

सोलापूर तरुण भारत
https://epaper.dainiktarunbharat.com/


# पंढरपुरात मार्केट यार्ड ते भिंगे चौक येथील उड्डाणपूल लवकर करा

## भाजपाची उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांच्याकडे मागणी

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ मार्च -**

शहरातील वाहतूक कोंडी कमी होण्यासाठी व आषाढी यात्रा कालावधीमध्ये वाखरी पालखी तळापासून पंढरपूर मध्ये दाखल होत असलेल्या विविध संतांच्या पालख्या शहरात सुरळीत व सुरक्षित याव्यात म्हणून मार्केट यार्ड ते भिंगेचौक पर्यंत उड्डाणपुल लवकर करावा या मागणीसाठी भाजपाच्या येथील उपनगराध्यत्रासह, नगरसेवक तसेच भारतीय जनता पार्टीच्या वतीने येथील उपविभागीय अधिकारी सचिन इथापे यांना सोमवारी (ता.२३) निवेदन देण्यात आले.

पंढरपूर शहरातील वाहतूक कोंडी कमी होणेसाठी व आषाढी यात्रा कालावधीमध्ये वाखरी पालखी तळापासून पंढरपूर मध्ये दाखल होत असलेल्या श्री संत ज्ञानेश्वर महाराज पालखी, श्री संत तुकाराम महाराज पालखी व इतर मानाच्या पालख्या शहरात सुरळीत व सुरक्षित याव्या म्हणून मार्केमर्केट यार्ड ते भिंगेचौक पर्यंत उड्डाणपुल लवकर करावा म्हणून सोलापूर जिल्ह्याचे माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी वारंवार शासनाकडे पाठपुरवठा करून या उड्डानपुलासाठी केंद्रीय मंत्री नितीन गडकरी व महाराष्ट्र शासनाकडून निधी मंजूर करून आणला होता.

सध्या मार्केट यार्ड ते सरगम टॉकीज पर्यंत उड्डानपुलाचे काम प्रगतीपथावर आहे. तसेच इंदिरा गांधी चौक ते भिंगे चौक येथे ही उड्डानपुलाचे काम सुरू केले आहे. परंतू नवीपेठ परिसरात राहात असलेले नागरिक यांनी नगरपरिषदेच्या जागेवरती केलेले अतिक्रमण निघू नये म्हणून स्थानिक नागरिकांना हाताशी धरून हा उड्डाणपुल होवू नये म्हणून काही मंडळींनी विरोध सुरू केला आहे. वास्तविक पाहता हा उड्डानपुल अंदाजे ४ बाय ४ पिलरवरून (elevated ) उभा केला जाणार आहे व येथे कोणतीही भिंत बांधण्यात येणार नाही.

या उड्डान पुलाचा यात्रा कालावधीमध्ये निश्चितच चांगला उपयोग होणार आहे. मात्र इतरवेळी सुध्दा नवीपेठ भागात व सरगम टॉकीज जवळील रेल्वे पुलाच्या खाली होणारी वाहतूक कोंडी संपणार आहे. तसेच या उड्डानपुलावरून नागरिकांना, विद्यार्थ्यांना व भाविकांना शहरातून इसबावी सारख्या उपनगराकडे जाण्यास व येण्यास उपयोग होणार आहे. तरी या भागात मुख्य रस्त्यावर केलेले अतिक्रमण त्वरीत काढून नागरिकांसाठी रस्ता खुला करून द्यावा अशी ही मागणी करण्यात आली आहे. या उड्डानपुलामुळे कोणत्याही व्यापाराचे कसले ही नुकसान होणार नाही व जागाही बाधित होणार नाही. उलट नवीपेठ भागामध्ये व इंदिरा गांधी चौकामध्ये रेल्वे पुलाखाली होणारी वाहतूक कोंडी कमी होणार आहे. तरी शहरातील नागरिकांसाठी, विद्यार्थांसाठी व पंढरपूर शहरामध्ये येणाऱ्या लाखो भाविकांसाठी हा उड्डानपुल लवकरात लवकर पुर्ण करावा अशी मागणी पालिकेचे उपनगराध्यक्ष महादेव धोत्रे, गटनेते भागवत बडवे ,सुजितकुमार सर्वगोड व भारतीय जनता पार्टीचे शहराध्यक्ष रोहित पानकर यांनी दिली. यावेळी पाणीपुरवठा सभापती




अमोल डोके, नगरसेवक ड.सुनिल वाळूजकर, विनायक संगीतराव, सौरभ थिटे,माजी नगरसेवक गुरुदास अभ्यंकर, इब्राहिम बोहरी, कृष्णा वाघमारे, राहुल परचडे, शरद माने, विक्रम शिरसट, सिकंदर ढवळे, पिंटू शिंदे, मयूर भिंगे, निखिल परचंडे, गणेश शिंदे नाईक,गुरु दोडिया, शिलरत्न झेंडे, यल्लाप्पा कबाडे, भाजपा महिला आघाडीच्या अपर्णा तारके, संचिता सगर, सुवर्णा कुरणावळ, अंजना जाधव, ज्योती कुलकर्णी आदी महिला पदाधिकारी देखील उपस्थित होत्या.

### आंदोलनाचा दिला इशारा

दरम्यान वरील वस्तुस्थितीचा विचार न करता काही राजकीय व सामाजिक कार्यकर्ते हे काम बंद पाडण्याच्या प्रयत्नात आहेत. भविष्यात पंढरपूर शहरामध्ये शासनाच्या मिळणाऱ्या मोठ्या निधीतून विकासकामे होणार आहेत. त्यामुळे अशा विकासाच्या आड येणाऱ्या प्रवृत्तीच्या लोकांवर वेळीच कायदेशीर पायबंद घालावा अन्यथा खालील पदाधिकारी, शहरातील नागरिक, वारकरी, फडकरी, भाविक व विद्यार्थी यांना घेवून धरणे आंदोलन करतील असा ही इशारा देण्यात आला आहे

## महत्वाचे...



### राष्ट्रवादीचे सातारा जिल्हा निरीक्षक नागेश फाटे यांचा पंढरपूर काँग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार

**पंढरपूर, दि.२३ मार्च -**

राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या सातारा जिल्हा निरीक्षकपदी उद्योग, व्यापार विभागाचे प्रदेशाध्यक्ष नागेश फाटे यांची निवड झाल्याबद्दल सोलापूर जिल्हा काँग्रेस कमिटीचे उपाध्यक्ष सतीश शिंदे, पंढरपूर तालुका अध्यक्ष संदीप पाटील यांनी फाटे यांच्या पंढरपूर येथील संपर्क कार्यालयास सदिच्छा भेट देऊन नागेश फाटे यांचा पंढरपूर तालुका काँग्रेस कमिटीच्या वतीने सत्कार करून पुढील कार्यास शुभेच्छा दिल्या. याप्रसंगी श्री विठ्ठल अर्बन को-ऑपरेटिव्ह सोसायटीचे संचालक डॉ.रमेश फाटे, शुभम फाटे, माझी नगरसेवक प्रशांत शिंदे, व्यवस्थापक संग्राम कापसे, विनायक शिंदे, निवृत्ती भटकर उपस्थित होते. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टी शरदचंद्र पवार पक्षाच्या वतीने काही दिवसापूर्वी सातारा जिल्हा निरीक्षक पदाची जबाबदारी नागेश फाटे यांना देण्यात आल्याने त्यांच्यावर विविध क्षेत्रातील मान्यवरांकडून शुभेच्छांचा वर्षाव होत असल्याचे दिसून येत आहे.



### चैत्री यात्रेनिमित्त दिंडीधारकांनी प्लॉटसची मागणी नोंदवावी : प्रांताधिकारी सचिन इथापे

**पंढरपूर, दि.२३ मार्च -**

चैत्री यात्रा एकादशीचा मुख्य सोहळा २९ मार्च रोजी साजरा होत असून, यात्रा कालावधी २३ मार्च ते २ एप्रिल असा आहे. या यात्रेत येणाऱ्या शेकडो दिंड्यांना वास्तव्यासाठी भक्तीसागर येथे पासष्ठ एकर जागा उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. २३ मार्चपासून प्लॉट नोंदणी सुरु करण्यात आली आहे. संबधितांनी भक्तीसागर येथे प्लॉटची मागणी नोंदवावी, असे आवाहन प्रांताधिकारी सचिन इथापे यांनी केले आले आहे.चैत्री यात्रेला येणाऱ्या दिंड्यांमधील भाविकांच्या निवाऱ्याची सोय भक्तीसागर येथे करण्यात आलेली आहे. या ठिकाणी भाविकांना निवाऱ्यासोबत पिण्याचे शुद्ध पाणी, शौचालय, वीज कनेक्शन, पोलीस संरक्षण, प्रथमोपचार केंद्र आदी सुविधा या ठिकाणी दिल्या जातात. या ठिकाणी भाविकांच्या अडीअडचणी सोडवण्यासाठी आपत्कालीन मदत केंद्र स्थापन करण्यात येते. येथे भाविकांना मुलभूत सेवासुविधा पुरवण्यात येणार असून आपत्कालीन प्रतिसाद केंद्रातून भाविकांना सेवा देण्यात येणार आहे. यासाठी नायब तहसिलदार सुधाकर धाईंजे (मो.क्र.९७६७२४८२१०), तसेच ग्राम महसूल अधिकारी प्रमोद खंडागळे (मो.क्र.९६५७२९०४०३) यांच्याकडे संपर्क साधावा, असे आवाहनही श्री. इथापे यांनी केले आहे.




### शंकरराव यादव यांना श्रीसंत दामाजीपंत पुरस्कार प्रदान

**श्रीपूर दि. २३ मार्च-**

श्रीपूर येथील आबासाहेब देशमुख चॅरिटेबल ट्रस्ट शैक्षणिक संकुलातील चंद्रशेखर विद्यालय, प्राथमिक शाळा विभागाचे उपमुख्यध्यापक शंकरराव यादव यांना ज्ञानक्रांती सामाजिक बहुउद्देशीय संस्था महाराष्ट्र राज्य यांचेवतीने मंगळवेढा येथे श्रीसंत दामाजीपंत ज्ञानक्रांती राज्यस्तरीय शिक्षकरत्न पुरस्कार प्रदान करण्यात आला. महाराष्ट्र विधानसभा तालिका अध्यक्ष तथा मंगळवेढा- पंढरपूरचे विद्यमान आमदार समाधान महादेव आवताडे यांचे प्रमुख उपस्थितीत जिल्हा परिषद शिक्षक समितीचे सोलापूर जिल्हा अध्यक्ष सुरेश पवार यांचे हस्ते पुरस्काराचे वितरण करण्यात आले, यावेळी मंचावर मुंबई येथील अनिता चौधरी, सह्याद्री वाहिनीच्या निवेदक वनिता घाडगे, अध्यक्ष शफिक शेख, डॉ. निसार शेख, गायकवाड, नगरसेवक, नगरसेविका उपस्थित होत्या! शंकरराव यादव सर हे स्काऊट-गाईडचे सोलापूर जिल्हा ट्रेनिंग कमिशनर म्हणून कार्यरत असून स्काऊट-गाईड मधील त्यांचे कार्य विशेष उल्लेखनीय आहे, त्यांच्या मार्गदर्शनाखाली चंद्रशेखर विद्यालयातील अकरा विद्यार्थ्यांना राष्ट्रीय सुवर्ण बाण पुरस्कार नवी दिल्लीचा हरियाणा येथे देवून सन्मान करण्यात आला आहे . शैक्षणिक कार्याबरोबरच त्यांची विविध क्षेत्रातील कार्यकर्तुत्वाची दखल घेत संस्थेने हा पुरस्कार देऊन गौरविले आहे . या पुरस्काराबद्दल संस्था अध्यक्ष डॉ. रामदास देशमुख व पदाधिकारी, शाळा व्यवस्थापन समितीचे उपाध्यक्ष विजयकुमार चव्हाण, स्काऊट-गाईड जिल्हा पदाधिकारी यांनी अभिनंदन केले .

### सांगोल्यात विविध उत्सव पदाधिकारी निवडी संपन्न

**सांगोला,दि.२३ मार्च -**

ब्राह्मण सभा, सांगोला यांच्या वतीने दि.१९ एप्रिल रोजी भगवान श्री परशुराम उत्सव आणि दि.२८ मे रोजी स्वातंत्र्यवीर सावरकर जयंती साजरी केली जाणार आहे. यानिमित्त विठ्ठल मंदिर, देशपांडे गल्ली येथे बैठक आयोजित करण्यात आली होती. सदर बैठकीत या उत्सवाच्या यशस्वी आयोजनासाठी कार्यकारिणीची निवड करण्यात आली असून उत्सव अध्यक्षपदी ज्ञानेश्वर कुलकर्णी, उपाध्यक्षपदी श्रीनाथ बिडीकर, खजिनदारपदी निलेश ताकभाते तर प्रसिद्धी प्रमुख म्हणून नागेश जोशी, डॉ.मानस कमलापूरकर आणि प्रा.राजेंद्र ठोंबरे यांची निवड करण्यात आली. यावेळी सचिन बेले, कौस्तुभ भोसेकर, समर्थ देशपांडे, रवि कुलकर्णी, मंगेश कुलकर्णी, संजय हसबनीस, अरुण कुलकर्णी, श्रीकांत हसबनीस, उदय पुजारी, शेखर देशपांडे, श्रद्धा देशपांडे, अनिता बेले, रेणुका लऊळकर, सुमेधा वांगीकर, अश्विनी कुलकर्णी उपस्थित होत्या.

## सेंट जोसेफ स्कूल बार्शीचा जलतरणपटू पार्थ अंधारेचे अरबी समुद्रात यश

**तभा वृत्तसेवा**
**बार्शी, दि. २३ मार्च-**

मुंबईतील अरबी समुद्रात पार पडलेल्या अत्यंत आव्हानात्मक अशा ६२ व्या ' संक रॉक लाईट हाऊस ते गेटवे ऑफ इंडिया' ओशन स्विमथॉन २०२६ मध्ये बार्शीच्या पार्थ अंधारे याने आपल्या कौशल्याची मोहोर उमटवली आहे. येथील सेंट जोसेफ इंग्लिश मीडियम स्कूलचा पार्थने १६ ते २५ वयोगटात ५ किलोमीटरचे अंतर यशस्वीपणे पूर्ण केले. खुल्या समुद्रातील लाटा, पाण्याचा वेगवान प्रवाह आणि खाऱ्या पाण्याचा सामना करण्यासाठी लागणारी शारीरिक क्षमता पार्थने पिंगळे सरांच्या मार्गदर्शनाखाली सरावातून कमावली आहे. त्यांच्या अचूक तांत्रिक नियोजनामुळेच पार्थने ५ कि.मी. अंतर अवघ्या १ तासात पूर्ण केले. पार्थने स्विमिंग पूलमधील वेगासोबतच आता समुद्रातील आव्हानावरही त्याने मात केली आहे. पार्थच्या या यशाबद्दल त्याचे मार्गदर्शक



बाळराजे पिंगळे सर, प्राचार्य फादर वर्गीस ऑगस्टा क्रीडाशिक्षक व सर्व शिक्षक यांनी त्याचे विशेष कौतुक केले आहे. भविष्यात आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचे प्रतिनिधित्व करण्याचे पार्थचे ध्येय असून, त्यादृष्टीने बाळराजे पिंगळे यांच्या मार्गदर्शनाखाली त्याचा पुढील सराव जोमाने सुरु आहे.

## माळशिरस तालुक्यात अवकाळीचा तडाखा

### तातडीने पंचनामे करा, अन्यथा 'स्वाभिमानी'चा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**पिलीव दि २३ मार्च**

माळशिरस तालुक्यात गेल्या काही दिवसांपासून झालेल्या अवकाळी पाऊस आणि गारपिटीमुळे शेती पिकांचे प्रचंड नुकसान झाले आहे. या नुकसानीचे प्रशासनाने तातडीने पंचनामे करून शेतकऱ्यांना भरपाई मिळवून द्यावी, अशी मागणी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे माळशिरस तालुकाध्यक्ष अजित बोरकर यांनी तहसीलदारांकडे एका निवेदनाद्वारे केली आहे.

तालुक्यातील आंबा, द्राक्षे, गहू, हरभरा यांसह इतर नगदी पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. शेतकरी आधीच आर्थिक अडचणीत असताना या नैसर्गिक संकटामुळे (अस्मानी संकट) बळीराजा पूर्णपणे कोलमडून गेला आहे. विशेषतः आंबा आणि द्राक्ष बागायतदारांचे मोठे आर्थिक नुकसान झाल्याचे निवेदनात म्हटले आहे.

अनेक ठिकाणी पिकांचे नुकसान होऊनही प्रशासनाकडून पंचनामे करण्यास टाळाटाळ केली जात असल्याच्या तक्रारी



शेतकऱ्यांनी संघटनेकडे केल्या आहेत.

प्रामुख्याने आंबा बागांच्या नुकसानीचे पंचनामे करण्यास प्रशासन उदासीन असल्याचे दिसून येत आहे. या पार्श्वभूमीवर, प्रशासनाने तत्काळ सर्व पिकांचे वस्तुनिष्ठ पंचनामे करण्याचे आदेश द्यावेत, अशी आग्रही मागणी करण्यात आली आहे.

यावेळी स्वाभिमानी शेतकरी संघटनेचे जेष्ठ नेते मगन काळे तालुकाध्यक्ष अजित बोरकर आंबा उत्पादक सुखदेव सरगर, निनाद पाटील रामचंद्र नेहरू मदने, सतीश काळे, राजाराम बोरकर, कैलास इंगळे, दत्तात्रय काळे, शेतकरी उपस्थित होते.

### चार दिवसांचा अल्टिमेटम

शेतकऱ्यांच्या या मागणीची दखल न घेतल्यास स्वाभिमानी शेतकरी संघटना आक्रमक पवित्रा घेणार आहे. येत्या चार दिवसांत पंचनाम्याची प्रक्रिया सुरू न झाल्यास तहसीलदार कार्यालयासमोर 'ठिय्या आंदोलन' करण्यात येईल.

**अजित बोरकर,** तालुका अध्यक्ष, स्वाभिमानी शेतकरी संघटना

## आठवडा बाजारातून घरी जाताना अपघात, पती-पत्नीचा मृत्यू

सांगोला-पंढरपूर मार्गावरील अपघात



**तभा वृत्तसेवा,**
**सांगोला,दि.२३ मार्च -**

रविवार दि.२२ मार्च रोजी सांगोला येथील आठवडा बाजारातून दुचाकी वर घरी जाताना टेम्पोच्या धडकेत अपघात होऊन पती-पत्नीचा मृत्यू झाल्याची घटना घडली. याबाबत अधिक माहिती अशी, बामणी (ता. सांगोला) येथील रामचंद्र पांडुरंग बनसोडे (वय-५८), लक्ष्मी रामचंद्र बनसोडे (वय-५०) हे पती-पत्नी सांगोल्यातील आठवडा बाजारातून बाजार घेऊन दुचाकी वर घरी जात असताना सांगोला ते पंढरपूर जाणाऱ्या रस्त्यावर देशमुख वस्ती जवळ आले असता टेम्पोने धडक दिली. या धडकेत पती रामचंद्र बनसोडे यांचा जागीच तर पत्नी लक्ष्मी बनसोडे यांचा उपचारादरम्यान मृत्यू झाला. या घटनेची माहिती ग्रामीण रुग्णालयातील वैद्यकीय अधिकारी डॉ.माळी यांनी पोलिसांना दिली असून सांगोला पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. दरम्यान, या अपघातामुळे बामणी गाव व परिसरात शोककळा पसरली असून हळहळ व्यक्त होत आहे.

## इतिहास संशोधन पध्दतीवरील ग्रंथाचे प्रकाशन

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर, दि.२३ मार्च -**

येथील उमा महाविद्यालयातील इतिहास विषयाच्या डॉ.सुवर्णा हजारे डांगे लिखित 'इतिहासाची ओळख : ऐतिहासिक साधने व संशोधन पद्धती' या संशोधनपर ग्रंथाचे प्रकाशन पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे कुलगुरू डॉ.प्रकाश महानवर यांच्या हस्ते नुकतेच संपन्न झाले.



कुलगुरू दालनात पार पडलेल्या या कार्यक्रमास प्र-कुलगुरू डॉ.लक्ष्मीकांत दामा, प्रभारी कुलसचिव डॉ. अतुल लकडे, उपकुलसचिव डॉ. उमराव मेटकरी, मानव्यविद्या शाखेचे अधिष्ठाता प्राचार्य डॉ. ई. जा. तांबोळी, यांची प्रमुख उपस्थिती होती. तसेच विद्यापीठातील विविध विद्याशाखांचे अधिष्ठाता, विभागप्रमुख, संशोधक व मार्गदर्शक मोठ्या संख्येने उपस्थित होते. यावेळी बोलताना कुलगुरू डॉ. प्रकाश महानवर यांनी विद्यार्थ्यांमध्ये संशोधन वृत्ती विकसित करण्यासाठी अशा ग्रंथांची गरज अधोरेखित केली. विद्यापीठ अनुदान आयोगाने पदवी व पदव्युत्तर स्तरावर संशोधनाला दिलेले महत्त्व लक्षात घेता, सोप्या आणि नेमक्या भाषेत संशोधन पद्धती समजावून सांगणारे साहित्य अत्यल्प प्रमाणात उपलब्ध असल्याचे त्यांनी नमूद केले.

प्र-कुलगुरू डॉ. लक्ष्मीकांत दामा यांनी डॉ. सुवर्णा हजारे डांगे यांच्या कार्याचे कौतुक करून पश्चिम महाराष्ट्रातील ऐतिहासिक साधनांचा अधिक सखोल अभ्यास करावा, नवीन संशोधन मांडावे आणि इतिहासातील दडलेली माहिती सर्वांसमोर आणावी, असे आवाहन केले. नवीन शैक्षणिक धोरणाच्या पार्श्वभूमीवर विविध विषयांच्या समन्वयातून शिक्षण घेताना विद्यार्थ्यांना संशोधन पद्धतीची सुस्पष्ट समज आवश्यक आहे. ही गरज ओळखून बी.ए. भाग-२ च्या विद्यार्थ्यांसाठी उपयुक्त ठरेल, अशा पद्धतीने हा ग्रंथ तयार करण्यात आल्याचे लेखक डॉ. सुवर्णा हजारे डांगे यांनी स्पष्ट केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक प्रा. डॉ. दत्तात्रय डांगे यांनी केले, तर आभार प्रदर्शन उमेश माने यांनी केले. दरम्यान हा ग्रंथ इतिहास विषयातील विद्यार्थ्यांसाठी तसेच संशोधकांसाठी मार्गदर्शक ठरेल, असा विश्वास उपस्थितांनी व्यक्त केला. या ग्रंथ प्रकाशनाच्या निमित्ताने माजी आमदार प्रशांत परिचारक, माजी प्राचार्य डॉ.मिलिंद परिचारक, अँड. प्रणव परिचारक, प्राचार्य डॉ.धीरजकुमार बाड, प्रा.डॉ.प्रभाकर कोळेकर, डॉ.नारायणराव लोखंडे, डॉ.हनुमंतराव लोंढे, डॉ. एम.एस.पवार, सूर्यकांत पारखे, तानाजीराव वाघमोडे आदींनी अभिनंदन केले.

## पंढरपूर अर्बन बँकेच्या मुख्यकार्यकारी अधिकारीपदी उमेश विरधे

### बँकिंग क्षेत्रातील व सहकार क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभवामुळे तिसऱ्यांदा संधी : प्रशांत परिचारक

**तभा वृत्तसेवा,**
**पंढरपूर,दि.२३ मार्च -**

येथील पंढरपूर अर्बन बँकेच्या मुख्यकार्यकारी अधिकारीपदी उमेश विरधे यांना तिसऱ्यांदा मुदत वाढ देण्यात आली आहे. नुकत्याच झालेल्या बँकेच्या सर्वसाधारण सभेत बँकेच्या प्रगतीसाठी श्री.विरधे हे पुन्हा एकदा 'मुख्य कार्यकारी अधिकारी' (उएज) म्हणून या पुढील तीन वर्षासाठी अर्थात सन २०२९ पर्यंत आपली सेवा देणार असल्याचे बँकेचे सर्वे सर्वा तथा माजी आमदार प्रशांत परिचारक यांनी जाहीर केले. यावेळी बँकेच्या वतीने श्री.विरधे यांचा सत्कार देखील करण्यात आला.

पंढरपूर शहर आणि तालुक्याची नव्हे तर सोलापूर जिल्ह्याची अर्थवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पंढरपूर अर्बन बँकेची वार्षिक सर्वसाधारण सभा नुकतीच येथे पार पडली. या सभेत बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून कार्यरत असलेल्या उमेश विरधे यांना पुन्हा एकदा याच




पदावर पुढील तीन वर्षासाठी अर्थात २०२९ पर्यंत मुदतवाढ देण्यात आली.

विशेष म्हणजे श्री.विरधे यांच्या निवृत्तीच्या वयाची ७ वर्षे उलटली आहेत. आज ते तब्बल ६५ वर्षांचे झालेले आहेत तरीही तोच उत्साह, तीच कामाची ओढ आणि तीच जिद्द आजही त्यांच्यामध्ये कायम दिसत असल्याचे गौरवोदगार अनेक आजी, माजी संचालकांनी यावेळी सत्कार प्रसंगी व्यक्त केले.

बँकिंग क्षेत्रातील व सहकार क्षेत्रातील त्यांचा प्रदीर्घ अनुभव आणि संस्थेप्रतीची निष्ठा पाहून पंढरपूर अर्बन बँकेचे सर्वसर्वो तथा माजी आमदार प्रशांत परिचारक, बँकेचे अध्यक्ष सतीश मुळे, तसेच पंढरपूर अर्बन बँकेचे सर्व संचालक मंडळ यांनी पुन्हा एकदा श्री.विरधे यांच्यावर विश्वास दाखवला आहे.

नुकत्याच पार पडलेल्या बँकेच्या सर्वसाधारण सभेत उमेश विरधे यांना पुन्हा एकदा संधी दिल्याबद्दल माजी आमदार प्रशांत परिचारक यांच्या हस्ते त्यांचा सत्कार करण्यात आला.

यावेळी बँकेचे अध्यक्ष सतिश मुळे, पांडुरंग कारखान्याचे माजी अध्यक्ष दिनकर मोरे तसेच बँकेचे सर्व आजी,माजी संचालक मंडळ तसेच असंख्य सभासद उपस्थित होते.

# १५ ते ४५ वयोगटातील आत्महत्येचे प्रमाण ९० टक्के

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

जगात दरवर्षी १ लाख ७० हजार आत्महत्या होतात. त्यापैकी ६६ टक्के आत्महत्या भारतात होतात. त्यामध्ये १५ ते ४५ वयोगटातील आत्महत्येचे प्रमाण ९० टक्के आहे, असे प्रतिपादन मानसोपचार तज्ज्ञ डॉ. प्रसन्न खटावकर यांनी केले. येथील व्ही.जी.शिवदारे कॉलेज ऑफ आर्टस्, कॉमर्स अँड सायन्सच्या वतीने 'युवकांतील वाढत्या आत्महत्या : कारणे आणि उपाय' या विषयावर बोलत होते.




कुटुंबाचे दडपण, शैक्षणिक अपयश, प्रेमभंग, छोटे कुटुंब, आर्थिक ताण, मित्र-मैत्रिणींकडून होणारे रॅगिंग, नैराश्य, व्यसनाधीनता, समाज माध्यमांचा विपरित परिणाम अशा कारणांमुळे तरुणांमध्ये आत्महत्या करण्याचे प्रमाण वाढत आहे. मित्र-मैत्रिणी, आप्तस्वकीय यांच्याशी चर्चा, समुपदेशकांशी सल्लामसलत आणि सकारात्मक दृष्टिकोन अवलंबून आत्महत्या टाळता येतात, असेही त्यांनी सांगितले.

यावेळी संस्थेचे विश्वस्त प्रा.भीमाशंकर शेटे, प्राचार्य डी.एस. सुत्रावे, प्रभारी प्राचार्य डॉ.ए.बी. वळसंगे, प्रा.डॉ. श्रीकांत येळेगावकर यांच्यासह विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते. डॉ.ए.एल. बिराजदार यांनी पाहुण्यांचा परिचय करुन दिला. प्रा.डॉ.एस.एल. दामा यांनी प्रास्ताविक केले. प्रा.ए.सी.बिरोळी यांनी आभार मानले.

दरम्यान, आजच्या धावपळीच्या युगात मानवी जीवन सुसह्य झाले असले, तरी मानसिक ताणतणावामुळे आत्महत्येसारख्या घटनांमध्ये मोठी वाढ होताना दिसत आहे. एका धक्कादायक आकडेवारीनुसार, एकूण आत्महत्यांपैकी तब्बल ९० टक्के आत्महत्या या १५ ते ४५ या वयोगटातील व्यक्तींच्या होत आहेत. देशाच्या प्रगतीत मोलाचा वाटा असणारी ही 'कार्यक्षम पिढी' अशा प्रकारे टोकाचे पाऊल उचलत असल्याने समाजात चिंतेचे वातावरण पसरले आहे.




# आई प्रतिष्ठानकडून २५ हजार पोळ्यांचे वाटप

## — १२ हजार ५०० गरजू कुटुंबांनी घेतला लाभ —

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

आई प्रतिष्ठानकडून सोलापुरातील १२ हजार ५०० गरजू कुटुंबांना २५ हजार गुळाच्या पोळ्यांचे वाटप करण्यात आले. नवीन विडी घरकुल परिसरात गुढीपाडव्याचे औचित्य साधून हा उपक्रम राबवण्यात आला. या कार्यक्रमास आई प्रतिष्ठानचे संस्थापक अध्यक्ष आणि भारतीय जनता पार्टीचे शहर उपाध्यक्ष मोहन डांगरे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी सृष्टी डांगरे, स्वरा डांगरे, विनय वल्लाल, पवन श्रीराम, बाबू चिप्पा, आदित्य वन्नाल, अक्षया कोंडा, श्रावंती गुंडेली, नंदिनी बडगंची, नारायण गुंडेली, लखन वन्नाल, राघवेंद्र बडगंची, मधुकर बल्ला, व्यंकटेश इंदापुरे, कार्तिक गणशेटी, रोहित येरबाटी, अमर कनकी, नगराज कानकी, अभिषेक कानकी, साई गर्दास आदी उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात सृष्टी डांगरे यांच्या हस्ते वैदिक पद्धतीने व्याहार्ती होम करून करण्यात आली. यावेळी मोहन डांगरे म्हणाले, समाजातील प्रत्येक घटकापर्यंत आनंद, आपुलकी आणि सणाचा उत्साह पोहोचवणे हीच आई प्रतिष्ठानची खरी ओळख आहे. आई प्रतिष्ठानने राबविलेल्या या उपक्रमामुळे हजारो कुटुंबांच्या सणाला गोडवा लाभला असून, या सामाजिक कार्याचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# 'जनगणना'च्या कामासाठी मनुष्यबळ, प्रशिक्षण कार्यक्रम, वेळापत्रक निश्चित

- स्वातंत्र्यानंतरची ही सोळावी जनगणना
- तीन टप्प्यात होणार यंदाची जनगणना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

जिल्हाधिकारी कुमार आशीर्वाद यांच्या मार्गदर्शनाखाली सोलापूर जिल्हा प्रशासनाने जनगणना २०२७ कार्यासाठी आवश्यक मनुष्यबळ, प्रशिक्षण कार्यक्रम व वेळापत्रक निश्चित केले आहे.



स्वातंत्र्यानंतरची ही सोळावी जनगणना आहे. यंदाची जनगणना एकूण तीन टप्प्यात केली जाणार आहे, अशी माहिती निवासी उपजिल्हाधिकारी अभिजीत पाटील यांनी दिली.

जिल्हा नियोजन समितीच्या सभागृहात आयोजित सोलापूर जिल्हा जनगणना २०२७ प्रशिक्षण कार्यक्रमाच्या शुभारंभप्रसंगी बोलताना ते पुढे म्हणाले, १ एप्रिल ते ६ एप्रिल २०२६ या कालावधीत प्रत्यक्ष फील्ड ट्रेनिंग दिले जाणार आहे. १ मे २०२६ ते १५ मे २०२६ या कालावधीत स्वयंगणना, १६ मे २०२६ ते १४ जून २०२६ या कालावधीत घरगणना करण्यात येणार आहे. CEMS पोर्टलद्वारे ही प्रक्रिया पार पडणार आहे, असेही त्यांनी सांगितले. यावेळी राष्ट्रीय प्रशिक्षक किरण गुरव, पवन गोडे, जिल्हा समन्वयक अभिजीत भांड, उपजिल्हाधिकारी सुशांत बनसोडे, महापालिकेचे अतिरिक्त आयुक्त संदीप कारंजे, मास्टर ट्रेनर तपन डंके यांच्यासह जनगणने विषयक सर्व संबंधित अधिकारी उपस्थित होते.

| जिल्ह्यातील जनगणना अशी | |
|---|---|
| एकूण तालुके | ११ |
| नगरपालिका/नगरपरिषद/नगरपंचायत | १७ |
| -HLB (House Listing Blocks) : | |
| ग्रामीण | ४४०९ |
| नगरपरिषद | १०३९ |
| एकूण | ५४४८ |
| **प्रगणकांची आवश्यकता** | |
| ग्रामीण | ४८५३ |
| नगरपरिषद | ११५१ |
| एकूण | ६००४ |
| **पर्यवेक्षकांची आवश्यकता** | |
| ग्रामीण | ८०९, |
| नगरपरिषद | २०८ |
| एकूण | १०१७ |
| **क्षेत्रीय प्रशिक्षक** | १०६ |
| **मास्टर ट्रेनर्स** | ३ |

# क्षयरोग दिनानिमित्त रॅली, शिबिरे, फूड बास्केट वाटप

## १०० दिवसीय 'टीबी मुक्त भारत' अभियान

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च**



सोलापूर महानगरपालिकेच्या शहर क्षयरोग केंद्राच्या वतीने जागतिक क्षयरोग दिन विविध जनजागृतीपर उपक्रमांनी साजरा करण्यात येणार आहे. जनजागृती रॅली, पथनाट्य, व्याख्याने, निक्षय-मित्र सन्मान, टीबी तपासणी व स्क्रीनिंग शिबिरे, निबंध, पोस्टर व रांगोळी स्पर्धा तसेच निक्षय मित्रांच्या माध्यमातून रुग्णांना फूड बास्केट वाटप असे कार्यक्रम आयोजित करण्यात आले आहेत.

नगरसेवकांच्या हस्ते फूड बास्केट वाटप पंधरवडा साजरा केला जाणार आहे. डॉ. वैशंपायन स्मृती शासकीय वैद्यकीय महाविद्यालय येथे प्रश्नमंजुषा व व्याख्याने, सिव्हिल हॉस्पिटल अंतर्गत नर्सिंग कॉलेजमध्ये पोस्टर स्पर्धा, तसेच ऑल इंडिया इन्स्टिट्यूट ऑफ लोकल सेल्फ गव्हर्मेंट कॉलेज येथे क्षयरोग विषयक जनजागृतीपर व्याख्यानाचे आयोजन करण्यात आले आहे.

दि. २४ मार्चपासून १०० दिवसीय प्रधानमंत्री टीबी मुक्त भारत अभियान सुरू करण्यात येणार असून, सर्व नागरी आरोग्य केंद्रे, आयुष्यमान आरोग्य मंदिर व एचबीटी केंद्रांमध्ये या अभियानाची अंमलबजावणी होणार आहे. सन २०२६ मध्ये सोलापूर शहरात ६२० टीबी रुग्ण नोंदविण्यात आले असून, त्यापैकी ४ रुग्ण एमडीआर टीबीचे आहेत. अभियानांतर्गत जोखीमग्रस्त लोकांची तपासणी, रुग्णांवर वेळेवर उपचार, संपर्कातील व्यक्तींची तपासणी व प्रतिबंधात्मक उपचार यावर विशेष भर देण्यात येणार आहे. क्षयरोगाची लक्षणे आढळल्यास नागरिकांनी मोफत तपासणी व उपचाराचा लाभ घ्यावा, तसेच १०० दिवसीय अभियानात सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे, अतिरिक्त आयुक्त तथा नियंत्रण अधिकारी (आरोग्य) वीणा पवार, उपायुक्त आशिष लोकरे, आरोग्याधिकारी डॉ. राखी माने व शहर क्षयरोग अधिकारी डॉ. अरुंधती हराळकर यांनी केले आहे.



**नरसिंह अवतार :** पूर्व विभाग श्रीराम मंदिरच्या वतीने श्रीराम नवमीनिमित्त सोमवारी प्रभु श्रीरामास नरसिंह अवताराने अलंकृत करण्यात आले होते.

# शहिदांना संभाजी आरमारची मानवंदना

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

भारतीय स्वातंत्र्यासाठी सशस्त्र क्रांती लढा देणारे महान क्रांतीवीर शहीद भगतसिंग, सुखदेव, राजगुरु यांना ब्रिटिश सरकारने फाशीची शिक्षा दिली होती. या बलिदानानंतर देशभरात ब्रिटिश राजवटीविरुद्ध असंतोष निर्माण झाला.

या बलिदानाची प्रेरणा घेऊन हजारो क्रांतिवीर प्राणपणाने देश स्वातंत्र्याच्या लढ्यासाठी सज्ज झाले. भारतीय स्वातंत्र्य लढ्यात या दिवसाचे महत्व अतुलनीय आहे. संभाजी आरमार प्रतीवर्षी या दिवशी शहिदांना अभिवादन करून या तेजस्वी इतिहासाचा जागर करत असते. संभाजी आरमारचे संस्थापक अध्यक्ष श्रीकांत डांगे यांच्या हस्ते शहीदांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करण्यात आला. भारत माता की जय वंदे मातरम इन्कलाब जिंदाबाद च्या घोषणा देण्यात आल्या. याप्रसंगी संभाजी आरमारचे कार्याध्यक्ष नगरसेवक शिवाजी वाघमोडे, शशिकांत शिंदे, गजानन जमदाडे, सागर ढगे, अमीत कदम, रेवण कोळी, राज जगताप, सागर दासी, द्वारकेश बबलदीकर, मल्लिकार्जुन पोतदार, तेजस चौधरी, सुरेश मामड्याल, गणेश नागणे, समर्थ डोंगरे उपस्थित होते.

# दिव्यांगांना मिळणार मोफत कृत्रिम पाय व कॅलिपर

## माऊली फाउंडेशन आणि शहा परिवाराचा कौतुकास्पद उपक्रम

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च-**

सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील दिव्यांगांना मोफत कृत्रिम पाय आणि कॅलिपर देण्यासाठी जयपूर फूट शिबिर संकेत शहा, डॉ. सुरेल शहा आणि माऊली फाउंडेशन (काळबादेवी, मुंबई) यांच्या संयुक्त विद्यमाने ४ एप्रिल रोजी शिंदे चौकातील शिवस्मारक येथे होणार आहे. वडील सुनील शहा यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त शहा बंधूंनी सामाजिक ऋण फेडण्याच्या हेतूने हा कौतुकास्पद उपक्रम आयोजित केला आहे.





शनिवार ४ एप्रिल रोजी सकाळी ९ ते दुपारी १ वाजेपर्यंत हे शिबिर शिवस्मारक येथे होणार आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यात दिव्यांगांची संख्या मोठ्या प्रमाणावर आहे. त्यांना दैनंदिन जीवनात कामे करताना कृत्रिम पाय व कॅलिपरची आवश्यकता प्रकर्षाने भासते. कृत्रिम पाय, कॅलिपर नसल्यामुळे नोकरी, व्यवसायाच्या ठिकाणी अनेक समस्यांना सामोरे जावे लागते. यातून अनेक दिव्यांग बांधवांमध्ये न्यूनगंडाची भावना तयार होऊन त्यांचा आत्मविश्वास कमी होतो. परिणामी, त्यांच्या प्रगतीत अडथळे निर्माण होतात. यावर उपाय म्हणून शहा परिवाराने सुनील शहा यांच्या ८१ व्या वाढदिवसानिमित्त अनावश्यक खर्च टाळून सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील दिव्यांगांना कृत्रिम पाय व कॅलिपर विनामूल्य देण्यासाठी या उपक्रमाचे आयोजन केले आहे.

या शिबिरासाठी पूर्व नोंदणी आवश्यक असून नोंदणीची अंतिम मुदत २ एप्रिल आहे. सोलापूर शहर आणि जिल्ह्यातील अधिकाधिक दिव्यांग बांधवांनी याचा लाभ घ्यावा व अधिक माहितीसाठी ९५२९२३३०६७ किंवा ९८१९६६९३७५ या भ्रमणध्वनी क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन संकेत शहा व ॲड. सुरेल शहा यांनी केले आहे.

# महापालिकेतर्फे शहिद भगतसिंग, शहिद सुखदेव, शहिद राजगुरू यांना अभिवादन

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

महानगरपालिकेच्या वतीने शहीद भगतसिंग, शहीद सुखदेव, शहीद राजगुरू यांच्या पुण्यतिथीनिमित्त कौन्सिल हॉल येथील महापौर यांच्या कार्यालयामध्ये शहीद भगतसिंग, शहीद सुखदेव, शहीद राजगुरू यांच्या प्रतिमेस महापौर विनायक कोंड्याल यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. नगरसेविका कल्पना कदम, नितीन गायकवाड, भोजराज पवार, चंद्रकांत दोंतुल, उमेश कोळेकर, शेखर सकट, सिद्धू तिमिगार, अशोक खडके, परशुराम चाबुकस्वार उपस्थित होते.

दरम्यान, नवी पेठ येथील महानगरपालिका प्राथमिक शिक्षण मंडळामध्ये शहीद दिनानिमित्त पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी मुख्य लिपिक माहेजबीन शेख, पर्यवेक्षक संतोष बुलबुले, निलोफर सय्यद, महेश वालावलकर, सारंग अंजीखाने, तुकाराम भोसले, अविनाश शिंदे, सचिन जाधवर, गुरुप्रसाद तलवार, भालचंद्र साखरे, कदीर शेख आदी उपस्थित होते.

# जि.प.अध्यक्षांच्या बैठकीला दांडी

- ✓ पहिल्याच दिवशी कडक कारवाई
- ✓ माध्यमिक शिक्षणाधिकाऱ्यावर नोटीसचे आदेश

**तभा वृत्तसेवा,**
**सोलापूर, दि.२३ मार्च**

सोलापूर जिल्हा परिषदेत नव्या नेतृत्वाने पहिल्याच दिवशी कडक भूमिका घेतल्याने प्रशासनात शिस्तीचे नवे संकेत दिसू लागले आहेत. आढावा बैठकीस अनुपस्थित राहिलेल्या माध्यमिक शिक्षणाधिकारी सचिन जगताप यांच्यावर अध्यक्ष दीपक वैद्य आणि उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी तीव्र नाराजी व्यक्त केली.




बैठकीस स्वतः उपस्थित राहणे अपेक्षित असताना सचिन जगताप यांनी प्रतिनिधी पाठवला. मात्र त्या प्रतिनिधीकडे कोणतीही ठोस माहिती नसल्याने अध्यक्ष व उपाध्यक्ष संतप्त झाले. बैठकीत आवश्यक माहिती सादर न झाल्याने कामकाजात अडथळे निर्माण झाल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

यावेळी "जगताप नेमके कुठे गेले होते?", "त्यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांची पूर्वपरवानगी घेतली होती का?" अशा प्रश्नांची सरबत्ती करत संबंधित अधिकाऱ्यांवर कारवाईची भूमिका घेतली. याच पार्श्वभूमीवर अध्यक्ष दीपक वैद्य व उपाध्यक्ष इंद्रजीत पवार यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी कुलदीप जंगम यांना सचिन जगताप यांना कारणे दाखवा नोटीस बजावण्याचे स्पष्ट आदेश दिले.

नव्या नेतृत्वाच्या या कडक भूमिकेमुळे जिल्हा परिषदेत शिस्त आणि जबाबदारीची नवी पायाभरणी होत असल्याची चर्चा प्रशासनात सुरू झाली आहे.

# जांभळी पाणकोंबडीला मिळाले जीवदान

**तभा वृत्तसेवा**
**सोलापूर, दि. २३ मार्च-**

डब्ल्यूसीएएसचे सदस्य शिवानंद हिरेमठ आणि सचिन पाटील होटगी तलाव परिसरात पक्षी निरीक्षण आणि फोटोग्राफी करण्यासाठी गेले असता. तलावात एकाच ठिकाणी जांभळी पाणकोंबडी हतबल होऊन थांबलेली दिसली. जवळपास अर्धा तास पक्षी निरीक्षण करता असताना हिरेमठ सरांचा लक्ष पाणकोंबडी वर गेल्यावर अचानक तो उडण्याचा प्रयत्न करत असलेला दिसला. परंतु त्याची धडपड पाहिल्यानंतर तो जाळीत अडकला असेल हे लक्षात आल्यावर सचिन पाटील यांना कल्पना देऊन दोघांनी तातडीने तलावात उतरले. जवळ जाऊन पहिल्यानंतर मासे पकडण्याच्या हुकमध्ये पंखाची एक बाजू अडकलेली दिसली. शिवानंद हिरेमठ यांच्या सूचनेनुसार सचिन पाटील यांनी त्याची सुखरूप सुटका करून निसर्गात मुक्त करण्यात आले.






**हे पत्र मुद्रक व प्रकाशक** दिलीप शिवमुर्ती दुलंगे यांनी **सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय** १९/२० औद्योगिक वसाहत, होटगी रोड, सोलापूर येथे छापून तरुण भारत कार्यालय, स्वेतसागर निवास, राजमाता जिजामाता महाविद्यालयजवळ, पत्रकार रोड, शिवनगर, जि. लातूर - ४१३५१२. कार्यालयातून प्रकाशित करून वितरीत केले. दूरध्वनी : ८८८८८४७२३९ ● मुख्य समुह संपादक : **दिलीप यशवंत पेठे.** ● मुख्य संपादक : **प्रशांत वसंतराव माने** (पी. आर. बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांच्यावर आहे) दैनिक सोलापूर तरुण भारत. **RNI No. MAHMAR/2023/86477. E-mail starunbharatgmail.com.** ● **Websate:http://dainiktarunbharat/** या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही.

**Owned by, SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LTD. Printed by, Published by** DILIP SHIVMURTI DULANGE **Printed at** SOLAPUR TARUN BHARAT MEDIA LT. 19,20 INDUSTRIAL ESTATE, HOTGI ROAD, SOLAPUR, Dist. SOLAPUR, 413003. **Publised at** TARUN BHARAT OFFICE, SwetSagar Niwas, Near Rajmata Jijamata College, Patrakar Road, Shivnagar, Dist. Latur Pin 413512, **RNI No. MAHMAR/2023/86477**
● **CHIEF GROUP EDITOR :** DILIP YASHWANT PETHE ● **CHIEF EDITOR :** PRASHANT VASANTRAO MANE

# लातूर दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.


## जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ करिता अर्ज सादर करण्याचे आवाहन

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** राज्याचे युवा धोरण २०१२ अंतर्गत शालेय शिक्षण व क्रीडा विभागाच्यावतीने शासन निर्णय १२ नोव्हेंबर, २०१३ अन्वये जिल्ह्यात कार्यरत असलेल्या युवक, युवतींना व नोंदणीकृत संस्थांनी केलेल्या समाजहिताच्या कार्याचा गौरव व्हावा आणि युवा विकासाचे कार्य करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन मिळावे, यासाठी जिल्हास्तरावर जिल्हा युवा पुरस्कार दरवर्षी दिला जातो.

युवक, युवतीसाठी पुरस्काराचे स्वरुप गौरव पत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रुपये १० हजार व संस्थेसाठी गौरवपत्र, सन्मानचिन्ह, रोख पुरस्कार रुपये ५० हजार असे आहे. यासाठी जिल्ह्यातील युवक, युवती तसेच नोंदणीकृत संस्थांकडून जिल्हा युवा पुरस्कार २०२५-२६ वर्षाच्या युवा पुरस्कारासाठी अर्ज मागविण्यात येत असून अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत १० एप्रिल २०२६ अशी आहे. यासाठीचे अर्ज जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालयातून प्राप्त करुन घ्यावेत व अधिक माहितीसाठी जिल्हा क्रिडा अधिकारी कार्यालयात क्रीडाधिकारी बाबासाहेब इंगोले यांच्याशी संपर्क साधावा, असे आवाहन लातूर येथील जिल्हा क्रिडा अधिकारी महादेव कसगावडे यांनी केले आहे.



## विविध वृत्त...

### भास्करराव माधवराव मिरजकर यांचे निधन



**लातूर :** श्री भास्करराव माधवराव मिरजकर (वय ८८) यांचे रविवारी दि.२२ मार्च २०२६ रोजी सायंकाळी ५ वाजण्याच्या सुमारास सोलापूर येथे वृद्धापकाळाने निधन झाले. अंत्यविधी सोमवार दि.२३ मार्च २०२६ रोजी सकाळी ९ वाजता सोलापूर येथील पुना नाका, हिंदू स्मशानभूमी येथे करण्यात येणार आहे. त्यांच्या पश्चात तीन मुले,एक मुलगी,सुना नातवंडे असा परिवार आहे. दैनिक सामनाचे जिल्हा प्रतिनिधी अभय मिरजकर यांचे ते वडील होत.

### माणिकप्रभू विद्यालयात विद्यार्थ्यांचा सत्कार

### खोदलेले रस्ते दुरूस्त करावे

**लातूर :** नंदी स्टॉप भागातल्या राम नगर परिसरात एकदा नवीन पाईपलाईन अन् दुसऱ्यांदा ड्रेनेजच्या नावाखाली रस्ते खोदले; पण ते अजून दुरूस्त केलेले नाहीत. राम नगर परिसरातील नागरिकांना येण्या-जाण्यास मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

रस्ते पूर्वीसारखे करावेत, अशी राम नगर परिसरातील नागरिकांची मागणी आहे. समोरून एखादे वाहन आल्यास मोठी अडचण होत असून, वाहने पास होत नाहीत.

आणखी एकदा रस्ता खोदला जाणार असल्याची चर्चा नागरिकांत आहे. रस्ते खोदले तरी ते पुन्हा दुरूस्त करावेत. दुरूस्त न केल्याने विद्यार्थी, महिला व लहान बालकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.

### चिमणी दिन साजरा

**अहमदपूर :** वाढते शहरीकरण आणि निसर्गातील बदलांमुळे चिमण्यांची संख्या घटत चालली आहे. त्यांचे जतन आणि संवर्धन व्हावे, या उद्देशाने अहमदपूर येथील वनपरिक्षेत्र कार्यालयात शुक्रवारी (दि.२०) रोजी जागतिक चिमणी दिन मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी उपजिल्हाधिकारी मंजुषा लटपटे, वन परिमंडळ अधिकारी गोविंद माळी, रामभाऊ केसाळे, मस्के, व्ही. डी. होनराव, यासह अहमदपूर वन विभागाचे सर्व कर्मचारी आणि निसर्गप्रेमी उपस्थित होते. यशस्वितेसाठी वनरक्षक व्ही. डी. होनराव यांनी परिश्रम घेतले.

### आरटीई प्रवेशाची रेंज तीन किमीच्या पलीकडेही

**लातूर :** आर्थिक दृष्ट्या वंचित, दुर्बल घटकांतील विद्यार्थ्यांना इंग्रजी माध्यमातून मोफत शिक्षण मिळावे म्हणून सरकारने आरटीई प्रवेशा अंतर्गत दिलेली एक किलो मीटरची रेंज कमी करून ती तीन किलो मीटरपर्यंत वाढविण्यात आली. यामुळे पालकांना पाहिजे त्या इंग्रजी माध्यम शाळेत प्रवेश मिळण्यास मदत होणार आहे.

बऱ्याचदा पालक आरटीई अंतर्गत योग्य इंग्रजी माध्यमांची शाळा मिळत नसल्याने मोफत प्रवेश मिळत असताना नकार देतात. घरापासून एक किलो मीटरपर्यंत एकही योग्य इंग्रजी माध्यमाची शाळा नसल्याने पालकांची मोठी अडचण व्हायची. ही अडचण पाहून शिक्षण विभागाने तीन किलो मीटरपर्यंतच्या किंवा त्यापेक्षा काही अंतरावरील शाळांना पसंती देण्याची संधी पालकांना ठेवल्याने अर्ज करणाऱ्या पालकांची संख्या देखील वाढणार आहे. अर्ज भरण्यास तांत्रिक अडचणी येत असल्याने शिक्षण विभागाने आरटीई प्रवेशाचे अर्ज भरण्यास मुदतवाढ दिली. याचा फायदा पालकांना होत असून, योग्य शाळेत प्रवेश घेण्याची संधी सुद्धा मिळणार आहे. त्यामुळे पालकांतून समाधान व्यक्त केले जात असून, रिक्त जागा आणि अर्ज तिप्पट आल्याचे सध्याचे चित्र आहे.

### आजचा विद्यार्थी हा उद्याचा जबाबदार नागरिक : सपोनि बांगर

**औराद शहाजानी :** आजचा विद्यार्थी हा उद्याचा जबाबदार नागरिक असून विद्यार्थ्यांनी आपल्या व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास करून ठरविलेल्या ध्येय सिद्धीसाठी सकारात्मक वाटचाल करावी, असे प्रतिपादन सपोनी हनुमंत बांगर यांनी केले.

येथील मास्टर दीनानाथ मंगेशकर महाविद्यालयाच्या वार्षिक स्नेहसंमेलनाचे प्रमुख अतिथी म्हणून ते बोलत होते. अध्यक्षस्थानी प्र. प्राचार्य शंकर कल्याणे होते. व्यासपीठावर नेताजी जाधव, डॉ. विनोद चिंते, डॉ. भगवान कदम, प्रा. दुर्गादास सबनीस, पल्लवी लवटे (सचिव, विद्यार्थी विकास परिषद) यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना हनुमंत बांगर यांनी विद्यार्थ्यांना मोबाईलचा मर्यादित व सुयोग्य वापर करावा, आक्षेपार्ह पोस्ट व्हायरल करू नयेत, रिल्सच्या विळख्यातून बाहेर पडावे. आई-वडीलांच्या कष्टाची जाणीव ठेवत आपल्या आचरण व कृतीतून त्यांची बदनामी होणार नाही याकरिता दक्ष रहावे. आपली वेशभूषा, केशभूषा, राहणीमान इत्यादी सभ्य व शिस्तबद्ध असले पाहिजे. कोणाच्याही खोट्या अमिषाला बळी न पडता सदैव आपला विवेक जागृत ठेवून जीवनाची वाटचाल करावी असेही त्यांनी यावेळी सांगितले. तसेच महाविद्यालयीन जीवनातील आनंददायी व अविस्मरणीय अनुभव असलेल्या स्नेहसंमेलन या उपक्रमास शुभेच्छा दिल्या. सूत्रसंचालन तथा आभार विजय पवार यांनी केले.

# निर्माता दिग्दर्शक विशाल गिरीचा डफी चित्रपट लवकरच पडद्यावर





**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** लातूरचे सुपुत्र आणि चित्रपट सृष्टीत अल्पावधीत स्वतःचे स्वतंत्र अस्तित्व निर्माण करणाऱ्या विशाल गिरी यांचा डफी हा मराठी चित्रपट लवकरच पडद्यावर येणार आहे. या चित्रपटाचे चित्रीकरण नुकतेच बीड जिल्ह्यातील शिरूर कासार भागात पूर्ण झाले आहे. चित्रपट प्रेक्षकांच्या काळजाचा ठाव घेणार असल्याचा विश्र्वास दिग्दर्शक गिरी यांनी व्यक्त केला आहे. सध्या सोशल मिडियावर या चित्रपटाची चांगलीच चर्चा चालू आहे.

या चित्रपटात प्रमुख भूमिकेत सैराट फेम कलाकार तानाजी गलगुंडे झळकणार आहे. त्याचबरोबर भूषण मंजुळे, अर्चना सूर्यवंशी, चैताली चव्हाण, विष्णू गिरी व अर्चना मालू हे कलाकार देखील भारदस्त भूमिकेत पडद्यावर दिसणार आहेत.

या चित्रपटाची कथा ख्यातनाम कथाकार प्रा. भास्कर बडे यानी लिहिली आहे. अतिशय प्रभावी तसेच गावाकडची सूंदर अशी काळजाचा ठोका चुकवणारी गोष्ट लवकरच प्रेक्षकांच्या भेटीला येणार आहे. डफी म्हणजे नेमके काय ? या प्रश्नाचे उत्तर रसिक प्रेक्षकांना लवकरच पाहायला मिळणार असल्याचा विश्र्वास विशाल गिरी यांनी व्यक्त केला आहे. दिवाळीपूर्वी हा चित्रपट

रिलीज करून प्रेक्षकांच्या भेटीला येईल आणि तो निश्र्चितच मराठी चित्रपट रसिकांचे मन जिंकून घेईल,असे गिरी यांनी बोलून दाखवले. संवाद आणि दिग्दर्शन विशाल गिरी यांनी केले आहे. त्यांना याकामी राहुल पाटील आणि अजय शिंदे यांनी सहाय्य केले आहे. वेशभूषा विभागाची जबाबदारी काजल भोसले व प्रणिता क्षीरसागर यांनी पार पाडली आहे. चित्रपटाचे चित्रीकरण पूर्ण करण्याकामी नगरसेवक दादासाहेब हरिदास व दादासाहेब बर्डे यांचेही छान सहकार्य मिळाल्याचे विशाल गिरी यांनी नमूद केर्ले.ल चित्रपट महामंडळाचे अध्यक्ष मेघराजराजे भोसले यांचे तसेच दीपक नागरगोजे काका यांचेही मोलाचे सहकार्य मिळाल्याची भावना गिरी यांनी व्यक्त केली. चित्रपटाचे उत्कृष्ट छायांकन कॅमेरामॅन रामा यादव यांनी केले आहे. त्यांना दिनेश भुर्के, ओम माने यांनी सहकार्य केले आहे.

## लातूर तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदी सौ.ज्योतीताई शिंदे यांची निवड



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** काँग्रेस पक्षाच्या वतीने लातूर तालुका महिला काँग्रेसच्या अध्यक्षपदावर सौ.ज्योती शिंदे यांची नियुक्ती करण्यात आली आहे. लातूर जिल्हा महिला काँग्रेस कमिटीच्या अध्यक्षा शिलाताई पाटील यांनी सदरील निवड जाहीर केली आहे.

सदर नियुक्ती लातूर ग्रामीणचे माजी आमदार तथा लातूर जिल्हा मध्यवर्ती बँकेचे अध्यक्ष धिरज विलासराव देशमुख यांच्या हस्ते ज्योतीताई शिंदे यांना प्रदान करण्यात आले. या नियुक्तीमुळे तालुक्यातील महिला कार्यकर्त्यांमध्ये नवचैतन्य निर्माण होईल, तसेच पक्ष संघटनात्मकदृष्ट्या अधिक बळकट होण्यास मदत होणार आहे.

सौ. ज्योतीताई शिंदे या यापूर्वीही विविध सामाजिक व संघटनात्मक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेत असून, त्यांच्या अनुभवाचा लाभ पक्षाला निश्चितच होईल, असा विश्वास पक्षाच्या वतीने व्यक्त करण्यात आला आहे. आगामी काळात महिला सक्षमीकरण, पक्षाची धोरणे व विचार सामान्य नागरिकांपर्यंत पोहोचविणे, तसेच स्थानिक पातळीवर संघटन वाढविणे या बाबींवर त्या विशेष लक्ष केंद्रित करणार आहेत.

काँग्रेस पक्षाने दिलेल्या जबाबदारीचे प्रामाणिकपणे पालन करून महिला कार्यकर्त्यांना एकत्रित आणणे, पक्षाचे संघटन मजबूत करणे व काँग्रेस पक्षाचे विचार घराघरात पोहोचविण्यासाठी सातत्याने कार्यरत राहणार असल्याची ग्वाही नवनियुक्त लातूर तालुका महिला काँग्रेस अध्यक्ष सौ. ज्योतीताई शिंदे यांनी दिली आहे.

## ॲड. चिमाजी धोंडिबा बाबर यांची म. रा. परिवहन कंत्राटी, जनरल कामगार सेनेच्या राज्य विधी सल्लागारपदी नियुक्ती



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** महाराष्ट्र राज्य परिवहन कंत्राटी, जनरल कामगार सेनेच्या महाराष्ट्र राज्य विधी सल्लागारपदी नियुक्ती करण्यात आली आहे. ही नियुक्ती हिंदुऱ्हदय सम्राट शिवसेना प्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या आर्शीवादाने, उपमुख्यमंत्री एकनाथराव शिंदे, आमदार ज्ञानराज चौघुले अध्यक्ष तथा शिवसेना उपनेते यांच्या आदेशानुसार ॲड. चिमाजी धोंडिबा बाबर लातूर यांची नियुक्ती करण्यात आल्याचे पत्र देण्यात आले आहे. हिदुऱ्हदय बाळासाहेब ठाकरे व धर्मवीर आनंद दिघे यांची शिकवण सतत आठवण ठेवून काम करणार असल्याचे ॲड. चिमाजी बाबर यांनी आश्वासित केले आहे. नियुक्तीचे पत्र सन्मानपुर्वक २२मार्च रोजी देण्यात आले आहे. त्यांच्या नियुक्तीबद्दल मित्रपरिवार, नातेवाईक, सामाजिक कार्यकर्ते, शिवसैनिक असंख्यांनी त्यांचे अभिनंदन केले आहे.

## राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी आर. आर. पाटलांच्या कन्येला संधी द्या

### ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांची मागणी



**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** राज्याचे उपमुख्यमंत्री, गृहमंत्री आणि ग्रामविकास मंत्री यांसह विविध पदांवर काम करताना सर्वसामान्य जनतेचे हित, महिलांची सुरक्षा व त्यांच्या सक्षमीकरणासाठी काम करणारे दिवंगत लोकनेते आर. आर. पाटील अर्थात सर्वांचे लाडक्या आबांची कन्या स्मिता पाटील-थोरात यांना राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी काम करण्याची संधी द्यावी, अशी मागणी ग्रामीण भागातील कार्यकर्त्यांमधून होत आहे.

स्मिता पाटील यांनी राष्ट्रवादी युवती काँग्रेसच्या प्रदेशाध्यक्ष म्हणून यशस्वी काम केले आहे. आर. आर. पाटील यांच्या निधनानंतर राज्यभर तंबाखू विरोधी मोहीम राबवून नव्या पिढ्यांना व्यसनमुक्त करण्याचे मोठे कार्य सुरू केले. रूपाली पाटील चाकणकर यांच्या राजीनामामुळे रिक्त झालेल्या राज्य महिला आयोगाच्या अध्यक्षपदी स्मिता पाटील यांना संधी देऊन खऱ्या अर्थाने दिवंगत आबांना आदरांजली वाहण्याची संधी राष्ट्रवादी काँग्रेसला प्राप्त झाली आहे. राजकीय, सामाजिक क्षेत्रात योगदान असलेल्या स्मिता पाटील उच्च विद्याविभूषित असून समाजसेवेचा आबांचा राजकीय व सामाजिक चालवणाऱ्या स्मिता पाटील खऱ्या अर्थाने राज्यातील महिलांना न्याय देतील व सर्वसामान्य जनतेच्या हितासाठी आबांनी पाहिलेले स्वप्न पूर्ण करतील, असा विश्र्वास ग्रामीण भागातील राष्ट्रवादी काँग्रेसच्या कार्यकर्त्यांना वाटतोय.

# आंतरजिल्हा मोटार सायकलचोराला अटक, १.७० लाखांचा मुद्देमाल जप्त

### लातूर स्थानिक गुन्हे शाखेची मोठी धडाकेबाज कारवाई

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :**

लातूर जिल्हा पोलीस दलाने मालमत्तेविषयक गुन्ह्यांविरुद्ध राबविलेल्या विशेष मोहिमेंतर्गत स्थानिक गुन्हे शाखेकडून अत्यंत कौशल्यपूर्ण व नियोजनबद्ध कारवाई करत आंतरजिल्हा स्तरावर मोटार सायकल चोरी करणाऱ्या एका सराईत आरोपीस अटक करण्यात आली आहे. सदर कारवाईदरम्यान आरोपीकडून एकूण ०६ मोटार सायकली (अंदाजे किंमत १,७०,०००/- रुपये) जप्त करण्यात आल्या असून, लातूर तसेच पुणे शहरातील विविध पोलीस ठाण्यांमध्ये दाखल गुन्ह्यांचा उलगडा करण्यात आला आहे.

ही उल्लेखनीय कामगिरी पोलीस अधीक्षक श्री. अमोल तांबे तसेच मा. अप्पर पोलीस अधीक्षक, मंगेश चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली, स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. सुधाकर बावकर यांच्या नेतृत्वाखालील विशेष पथकाने पार पाडली

लातूर शहरात मागील काही दिवसांपासून मोटार सायकल चोरीच्या घटनांमध्ये वाढ झाल्याने त्यांचा छडा लावण्यासाठी स्थानिक गुन्हे शाखेकडून विशेष मोहीम राबविण्यात येत होती. त्याच अनुषंगाने दिनांक २२/०३/२०२६ रोजी पोलीस पथक तपास करत असताना गोपनीय बातमीदारामार्फत माहिती प्राप्त झाली की, नवीन रेणापूर ते रेल्वे स्टेशन मार्गावरील लातूर बायपास रोडवर एक इसम चोरीची मोटार सायकल विक्री करण्याच्या उद्देशाने थांबलेला आहे. सदर माहितीची शहानिशा करून पथकाने तात्काळ नियोजनबद्ध सापळा रचून १६.३० वाजताच्या सुमारास नमूद ठिकाणी छापा टाकून संशयित इसमास ताब्यात घेतले. ताब्यात घेतलेल्या इसमाने आपले नाव - महादेव शिवाजी गरड (वय २६ वर्षे, रा. अंबुलगा, ता. चाकूर, जि. लातूर) असे सांगितले. त्याच्याकडे असलेली होंडा कंपनीची काळ्या रंगाची युनिकॉर्न मोटार सायकल (MH-35-W-3408) ही चोरीची असल्याचे प्राथमिक तपासात निष्पन्न झाले. आरोपीस विश्वासात घेऊन अधिक चौकशी केली असता त्याने लातूर शहरातील विविध भागांमधून तसेच पुणे शहरातील सिंहगड रोड, धायरी परिसरातून मोटार सायकली चोरी केल्याची कबुली दिली. त्याच्या सांगण्यावरून पोलीस पथकाने अजिंक्य सिटी, लातूर परिसरात छापा टाकून आणखी ०५ मोटार सायकली जप्त केल्या. यामध्ये प्रामुख्याने होंडा कंपनीच्या युनिकॉर्न व शाईन या प्रकारातील मोटार सायकलींचा समावेश आहे. अशा प्रकारे आरोपीकडून एकूण ०६ मोटार सायकली हस्तगत करण्यात आल्या. जप्त मोटार सायकलींची पडताळणी केली असता त्या खालील गुन्ह्यांशी संबंधित असल्याचे निष्पन्न झाले -

१) पो.स्टे. शिवाजीनगर, लातूर - गु.र.नं. १०८/२०२६, २) पो. स्टे. शिवाजीनगर, लातूर - गु.र.नं. ११२/२०२६ ३)पो.स्टे. गांधी चौक, लातूर - गु.र.नं. १४०/२०२६, ४) पो.स्टे. गांधी चौक, लातूर - गु.र.नं१४७/२०२६ ५)पो.स्टे. एमआयडीसी, लातूर- गु.र.नं. ९८/२०२६ ६)पो.स्टे. सिंहगड, पुणे



शहर - गु.र.नं. ५३७/२०२५ तसेच आरोपीने पुणे शहरातील धायरी व सिंहगड रोड परिसरातून आणखी ०५ मोटार सायकली चोरी करून विक्री केल्याची कबुली दिली असून त्या संदर्भात पुढील तपास सुरू आहे.

सदर कारवाई खालील अधिकारी व अंमलदार यांच्या पथकाने वरिष्ठांचे मार्गदर्शनात अत्यंत कौशल्य व तत्परतेने पार पाडली असून पोलीस निरीक्षक श्री. बावकर यांच्या नेतृत्वातील पथकामधील पोउपनि राजेश घाडगे, पोलीस अंमलदार युवराज गिरी, प्रदीप स्वामी, मोहन सुरवसे,राजेश कंचे, सिध्देश्वर मदने,जमीर शेख, राहुल कांबळे, शैलेश सुडे यांनी केली असून आरोपीस ताब्यात घेऊन त्याच्याकडील सर्व मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. तसेच पोलीस स्टेशन शिवाजीनगर, लातूर येथे पुढील कायदेशीर कारवाईसाठी हजर करण्यात आले आहे. लातूर जिल्हा पोलीस दलाकडून नागरिकांना आवाहन करण्यात येते की - आपल्या वाहनांची सुरक्षितता सुनिश्चित करावी, योग्य लॉकिंग प्रणालीचा वापर करावा. सार्वजनिक ठिकाणी पार्किंग करताना दक्षता बाळगावी,संशयास्पद हालचाली आढळल्यास त्वरित पोलीसांना कळवावे.

CMYK

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, येथून प्रकाशित केले. विभागीय आवृत्ती : धाराशिव, लातूर, सातारा, छत्रपती संभाजीनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



# किनगाव पोलिसांचा दणदणीत विजय! अहमदपूर संघ पराभूत - थरारक सामन्यात २ चेंडू शिल्लक ठेवत बाजी

**तभा वृत्तसेवा**

**किनगाव , दि. २३ मार्च :** किनगाव येथे पोलीस विभागातील मैत्रीपूर्ण क्रिकेट सामन्याने प्रेक्षकांना अक्षरशः खिळवून ठेवले. उपविभागीय पोलीस अधिकारी श्री. अरविंद रायबोले यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस स्टेशन किनगाव व पोलीस स्टेशन अहमदपूर यांच्यात २२ मार्च रोजी सकाळी ८.३० वाजता मर्यादित षटकांचा सामना मोठ्या उत्साहात पार पडला.

या रंगतदार सामन्यात किनगाव पोलीस क्रिकेट संघाने जबरदस्त खेळी करत अहमदपूर संघावर मात केली. केवळ ८ षटकांच्या सामन्यात किनगाव संघाने ५६ धावा करत २ गडी गमावून अवघ्या २ चेंडू शिल्लक ठेवत थरारक विजय मिळविला. किनगाव संघाचा क्रिकेटपटू



शिवाजी गोरे याने उत्कृष्ट खेळ करत सामनावीर पुरस्कार पटकावला. त्याला ५०१ रुपयांचे पारितोषिक देण्यात आले.

उत्कृष्ट कामगिरी करणाऱ्या खेळाडूंना माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर बापू मुंडे व उद्योजक भागवत गुट्टे यांच्या हस्ते प्रत्येकी १००१ रुपयांचे बक्षीस देण्यात आले.

अहमदपूर संघाकडून पोलीस निरीक्षक विनोद मेत्रेवार, झडख अंगद श्रीमंगले, बुरकुले, तानाजी आरदवड, सुकेस केंद्रे, मारोती शिंदे, सुग्रीव मुंढे, साबळे पाकलवाड, विशाल, हरी कामलवाड यांनी चांगली लढत दिली.

किनगाव संघाकडून सपोनि माणिक डोके, PSI सत्यजित तोंडारे, स्वप्नील कांबळे, सुनील श्रीरामे, संदीप मुसळे, देवानंद दहीफळे, प्रताप गायकवाड, बाळू कोंडमगीरे, सुरज कोतवाड, विष्णू मामडगे, गोपाळ कावळे, सुदाकर पोले यांनी उत्कृष्ट खेळ सादर केला.

दुसऱ्या ५ षटकांच्या सामन्यात मात्र अहमदपूर संघाने विजय मिळवला असून PSI अंगद श्रीमंगले सामनावीर ठरले. या सामन्याचे पंच म्हणून बाळू किनकर यांनी चोख कामगिरी बजावली.

विजेत्या संघाला उपविभागीय पोलीस अधिकारी अरविंद रायबोले यांच्या हस्ते सन्मानित करण्यात आले. तसेच माजी जिल्हा परिषद सदस्य किशोर बापू मुंडे, उद्योजक भागवत गुट्टे व पत्रकार गणेश किनकर यांच्या हस्ते रोख पारितोषिके प्रदान करण्यात आली.

या सामन्यावेळी मोठ्या संख्येने नागरिक व क्रिकेटप्रेमींनी उपस्थित राहून उत्स्फूर्त प्रतिसाद दिला.

## संक्षिप्त...

### शेतकरी कर्जमाफी निर्णयाचे स्वागत; रमेश पाटील यांची मुख्यमंत्री फडणवीस यांना भेट



**चाकूर:**महाराष्ट्रातील शेतकऱ्यांसाठी घेतलेल्या कर्जमाफीच्या ऐतिहासिक निर्णयाबद्दल भारतीय जनता पक्ष युवा मोर्चाचे जिल्हा उपाध्यक्ष रमेश पाटील यांनी प्रत्यक्ष भेट घेऊन मनःपूर्वक अभिनंदन केले. या प्रसंगी झालेल्या बैठकीत चाकूर तालुक्यातील शेतकऱ्यांना भेडसावणाऱ्या विविध समस्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. तसेच तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी आवश्यक असलेल्या विविध कामांची मागणी करण्यात आली. रमेश पाटील यांनी सांगितले की, मुख्यमंत्री महोदयांनी शेतकऱ्यांच्या हितासाठी घेतलेला हा निर्णय अत्यंत दिलासादायक असून राज्यातील लाखो शेतकऱ्यांना याचा मोठा फायदा होणार आहे.

### रेणापूर तालुक्यात कार्यकर्त्यांचा शिवसेना शिंदे गटात जाहीर प्रवेश



**रेणापूर :** महाराष्ट्र राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यासह खासदार श्रीकांत शिंदे,महसूल राज्यमंत्री योगेश कदम तसेच पक्षाचे सचिव संजय मोरे आणि जिल्हा प्रमुख सचिन दाने यांच्या सूचनेनुसार आज रेणापूर येथील शासकीय विश्रामगृह येथे महत्त्वपूर्ण बैठक पार पडली. या बैठकीत रेणापूर तालुक्यातील राजकीय घडामोडींना वेग देत रेणापूर तालुकाप्रमुख कोंडीराम काळे यांच्या नेतृत्वाखाली कार्यकर्त्यांनी शिवसेना पक्षात जाहीर प्रवेश केला.या प्रवेशामुळे तालुक्यात पक्ष संघटना अधिक बळकट होणार असल्याचे चित्र स्पष्ट झाले आहे. यावेळी रेणापूर तालुकाप्रमुख कोंडीराम काळे, उपजिल्हाप्रमुख सदाशिव गव्हाणे,माजी युवा तालुकाप्रमुख राधेश्याम राजे,सौरभजी साबदे, महेश आप्पा कलशेट्टी,शिवाजी किसन वाघमोडे,खंडू कडाजी देवकर,बशीर शेख, शिवराज श्रीमंत सलगर,सुरज रमाकांत कुराडे, किशोर व्यवहारे,महेश ज्योतीराम शिंदे,अझर करमोदिन शेख,दिलीप पंढरी गंडले,प्रवीण कांबळे,संदीप शिंदे,किशोर कसबे,महादेव वाघमोडे यांच्यासह अनेक कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. या कार्यत्याच्या पक्ष प्रवेशामुळे रेणापूर तालुक्यात पक्षाची ताकद वाढणार आहे.

### स्वातंत्र्य योद्धे हे युवकांचे आदर्श असावेत- डॉ. विनोद माने



**अहमदपूर :** ब्रिटिशांच्या जोखडातून भारतमातेला मुक्त करण्यासाठी ज्यांनी आपल्या जीवाचे बलिदान दिले असे शहीद भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव या क्रांतिकारकांचा आदर्श युवकांनी घ्यावा असे प्रतिपादन शहीद दिनानिमित्त बोलताना डॉ विनोद माने यांनी केले.

येथील महात्मा गांधी महाविद्यालयात प्राचार्य डॉ. व्ही. पी. पवार यांच्या अध्यक्षतेखाली आज २३ मार्च हा क्रांतिकारक भगतसिंग, राजगुरू आणि सुखदेव यांचा शहीद दिवस साजरा करण्यात आला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून बोलताना डॉ विनोद माने यांनी भारतीय स्वातंत्र्य लढ्यातील क्रांतिकारकांचे योगदान सांगून आजच्या युवकांनी आपल्या जीवनात क्रांतिकारकांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवावा असे म्हणाले. आय.आय.टी. जाम मॅथेमॅटिक्स -२०२६ साठी पात्र ठरलेल्या कु. मानसी कांबळे या विद्यार्थिनीच्या हस्ते शहिदांच्या प्रतिमांना पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले. याप्रसंगी स्टाफ सेक्रेटरी डॉ. अनिल कांबळे, डॉ यादव सूर्यवंशी, डॉ. के. एन. शिवलकर, डॉ. सी. टी. लोंढे, राष्ट्रीय सेवा योजना कार्यक्रमाधिकारी डॉ. बालाजी माकणे-पाटील, प्रा. बी. यु. मंगरूळकर, श्री मंगेश कदम, सुधाकर कदम, सुनील राठोड, राजीव धुळगुंडे व महाविद्यालयातील इतर शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी व एन. एस. एस.चे विद्यार्थी उपस्थित होते याप्रसंगी कुमारी मानसी कांबळे यांचा सत्कार करण्यात आला.

### महादेव आप्पा बसवन्न आप्पा सदानंदे यांचे निधन



**शिरूर अनंतपाळ :** कै.महादेव आप्पा बसवन्न आप्पा सदानंदे यांचे २२ मार्च रोजी सायंकाळी पाच वाजता हृदयविकाराच्या तीव्र झटक्याने निधन झाले आहे अंत्यविधी सकाळी ११ वाजता थेरगाव येथे त्यांच्या स्वतःच्या शेतात पार पडले. त्यांच्या पश्चात पत्नी, दोन मुले, तीन मुली, नातवंडे असा परिवार आहे

# येरोळ येथील ग्रामदैवत कालिकामाता मंदिराचा कलश रोहन व यात्रेनिमित्त कुस्त्याचे आयोजन

**तभा वृत्तसेवा**

**शिरूर अनंतपाळ, दि. २३ मार्च :** शिरूर अनंतपाळ तालुक्यातील येरोळ येथील ग्रामदेवता कालिका देवी माता मंदिराचा शिखर कलशारोहण तसेच यात्रे निमित्त जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले असून वार बुधवार दि .२५ सप्तमी रोजी यात्रा पार पडणार आहे.



प्रतिवर्षाप्रमाणे येथील कालिका माता मंदिर यात्रा गुढीपाडव्या पासून सातव्या दिवशी म्हणजे सप्तमीला यात्रा भरते यंदा यात्रेनिमित्त मंदिर शिखर व कलशारोहणाची स्थापना करण्यात येणार आहे गावातील मुख्य बस्थांनक दत्त मंदिरापासून सकाळी दहा वाजता कलशाची मिरवणूक काढण्यात येणार आहे.

येथील कालिका देवी जागृत देवस्थान असून देवीला मानणारा भक्त गण मोठा आहे .यात्रेनिमित्त कर्नाटक राज्य, आंध्रप्रदेश, सोलापूर व गावातील बाहेर गावी पुणे, मुंबई, हैद्राबाद येथुन भावीक दर्शनासाठी येतात देवीचे मंदिर गावाच्या नदीकाठी हिरव्या गर्द झाडीत वसले असून अनेक शहरांतील कुटूंब परिवारासह थंड गार झाडीच्या छायेत वनभोजनाचा आस्वाद घेतात,

यात्रेनिमित्त जंगी कुस्त्यांचे आयोजन करण्यात आले असून ग्रामस्थांच्या वतीने पाण्याची व महाप्रसादाची व्यवस्था करण्यात आली आहे. तरी या यात्रेत लातूर जिल्हा सह परिसरातील मल्लानी,भावीकानी मोठ्या संख्येने सहभागी नोंदवावा असे आवाहन यात्रा कमिटी व ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले आहे.

## घोणसी परिसरात बहरली उन्हाळी ज्वारी

**तभा वृत्तसेवा**

**जळकोट, दि. २३ मार्च :** जळकोट तालुक्यातील घोणसी परिसरात यंदा उन्हाळी ज्वारीचे पीक जोमात बहरले असून शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर समाधान दिसून येत आहे. तिरू नदीकाठच्या बोरगाव, एकुर्का, तिरुका, सुल्लाळी आणि अतनूर या शिवारात ज्वारीची हिरवीगार शेते डोलताना दिसत आहेत.मागील खरिप हंगामात अतिवृष्टीमुळे मोठ्या प्रमाणात पिकांचे नुकसान झाले होते. त्यामुळे अनेक शेतकऱ्यांच्या हातात काहीच उत्पादन आले नव्हते. या पार्श्वभूमीवर नदीकाठच्या शेतकऱ्यांनी रब्बी हंगामात प्रामुख्याने ज्वारीची पेरणी केली. यंदा रब्बी हंगामात वातावरण ज्वारीसाठी अनुकूल ठरल्याने पीक चांगले वाढले आहे. सध्या ज्वारी कापणीच्या अवस्थेत असून उत्पादनही समाधानकारक मिळेल, अशी अपेक्षा शेतकरी व्यक्त करत आहेत. अतिवृष्टीच्या फटक्यानंतर उन्हाळी ज्वारीने शेतकऱ्यांना दिलासा दिला असून, या पिकामुळे वर्षभराच्या उदरनिर्वाहाला हातभार लागणार असल्याचे चित्र दिसत आहे.

# पाच दिवसांपासून नेटवर्क ठप्प

**तभा वृत्तसेवा**

**औसा, दि. २३ मार्च :** औसा तालुक्यातील आलमला परिसरात गेल्या पाच दिवसांपासून जिओ नेटवर्क पूर्णपणे गायब झाल्याने हजारो ग्राहकांना मोठ्या मनःस्तापाला सामोरे जावे लागत आहे. अचानक नेटवर्क बंद पडल्यामुळे मोबाईल सेवा पूर्णतः ठप्प झाली असून नागरिकांच्या दैनंदिन कामांवर याचा गंभीर परिणाम झाला असून मोबाईल ही फक्त शोभेची वस्तू बनून राहिल्याने ग्राहकांतून संताप व्यक्त केला जात आहे.





आलमला व परिसरातील मोठ्या संख्येने ग्राहक जिओ सेवा वापरत आहेत. मात्र मागील पाच दिवसांपासून मोबाईलमध्ये नेटवर्कच दिसत नसल्याने कॉल, इंटरनेट सेवा पूर्णपणे बंद झाली आहे. परिणामी विद्यार्थ्यांचे ऑनलाइन शिक्षण, व्यापाऱ्यांचे व्यवहार तसेच शासकीय कामकाजही विस्कळीत झाले आहे.

विशेष म्हणजे, अनेक ग्राहकांनी वर्षभराचे रिचार्ज केल्यामुळे ते इतर नेटवर्कमध्ये पोर्टही करू शकत नाहीत. त्यामुळे ग्राहक अक्षरशः अडचणीत सापडले असून मोबाईल 'शोभेची वस्तू' बनल्याची भावना व्यक्त होत आहे.

जिओ नेटवर्क मिळत नसल्याने त्रस्त अनेक ग्राहकांनी ग्राहक सेवा केंद्राशी संपर्क साधला असता, समाधानकारक उत्तर मिळत नसल्याची तक्रार नागरिकांकडून व्यक्त केली जात आहे. उडवाउडवीची उत्तरे देत वेळकाढूपणा केला जात असल्याने ग्राहकात नाराजी व्यक्त केली जात आहे. दरम्यान, संबंधित कंपनीने तात्काळ या समस्येकडे लक्ष देऊन नेटवर्क सेवा पूर्ववत करावी, अशी जोरदार मागणी परिसरातील नागरिकांकडून होत आहे. अन्यथा आंदोलनाचा इशारा देण्यात आला आहे.

## डॉ. आंबेडकर जयंती समिती अध्यक्षपदी विलास सूर्यवंशी

**तभा वृत्तसेवा**

**निलंगा, दि. २३ मार्च :** भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर सार्वजनिक जयंती उत्सव समिती अशोकनगरच्या अध्यक्षपदी विलास सूर्यवंशी, उपाध्यक्षपदी नगरसेवक सचिन गायकवाड व विष्णू ढेरे यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

उर्वरित कार्यकारणीत कोषाध्यक्ष रोहन सूरवसे, सहकोषाध्यक्ष मनोज सूरवसे, विनोद भोसले, सचिव अर्जुन काळे, अमोल सूर्यवंशी, सहसचिव अभिजीत सूरवसे, प्रमोद सूरवसे, पवन सूरवसे, सजावट प्रमुख गिरीश पात्रे स्वप्निल काळे, प्रितम कांबळे, सचिन कांबळे, संतोष गायकवाड, शिवाजी कांबळे, जितेंद्र कांबळे, सल्लागार ॲड जे.बी. सूर्यवंशी, अरविंद कांबळे, धोंडीराम सूर्यवंशी, विजयकुमार सूर्यवंशी, उमाकांत भोसले, इंद्रजित कांबळे, मोहन वाघमारे, व्यंकट पात्रे आदींची निवड करण्यात आली.

## ओलंपियाड संत ज्ञानेश्वर विद्यालयाचे घवघवीत यश

**तभा वृत्तसेवा**

**अहमदपूर, दि. २३ मार्च :** येथील संत ज्ञानेश्र्वर प्राथमिक विद्यालयाच्या १२ विद्यार्थ्यांनी इंटरनॅशनल मॅथेमॅटिक्स ओलंपियाड परीक्षेत गोल्ड मेडल प्राप्त केले आहे. आंतरराष्ट्रीय स्पर्धा परीक्षेत ही शाळेच्या विद्यार्थ्यांनी आपला नावलौकिक मिळवला आहे. त्यामध्ये प्रांजल बनसुडे, अवनी सोनवणे, यदवी लखनगीरे, अभय ससाने, शोण देशमुख, स्वरा काट्टापल्ले, स्वरांजली वाघमारे, अल्कमा मिर्झा, प्रज्ञेश बेल्लाळे, यशोदीप जवणे, अभिजीत चाटे, अमर कोरे या विद्यार्थ्यांचा प्राचार्य डॉ.भाऊसाहेब आंधळे,डॉ. राहुल वाघमारे, डॉ. मुकुंद माने, डॉ. हिरामण कूचदेकर यांच्या हस्ते गोल्ड मेडल देऊन सन्मानित करण्यात आले.

सदरील विद्यार्थ्यांना शबाना शेख, सविता करंडे,त्रिगुणा मोरगे, शारदा तिरूके, मीना होनराव,अश्र्विनी घोगरे, प्राजक्ता भोसले यांचे विशेष मार्गदर्शन लाभले. यशस्वी विद्यार्थ्यांचे व मार्गदर्शक शिक्षकांचे संस्थाध्यक्ष मा.गणेश दादा हाके पाटील, सचिव प्राचार्या रेखाताई हाके-तरडे, उपाध्यक्ष एडवोकेट मानसी हाके, मुख्याध्यापक आशा रोडगे, मुख्याध्यापक मीना तोवर सह सर्व शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी विशेष अभिनंदन केले.

## कासार शिरसी येथे श्री करिबसवेश्वर चषकाचे आयोजन; तालुका वाईज क्रिकेटचा भव्य रणसंग्राम

**तभा वृत्तसेवा**

**कासार शिरसी, दि. २३ मार्च :** निलंगा तालुक्यातील कासार शिरसी येथील युवा उद्योजक तथा श्री करीबसवेश्वर शिक्षण संस्थेचे कार्याध्यक्ष श्री निखिल राजेंद्र चिंचनसुरे यांच्यावतीने कासार शिरसी येथे श्री करी बसवेश्र्वर चषक २०२६ चे भव्य तालुका वाईज क्रिकेट स्पर्धेचे आयोजन करण्यात आले आहे.

या स्पर्धेत १६ संघानाच प्रवेश मिळणार आहे. या स्पर्धेत पहिले पारितोषक स्वतंत्र सैनिक कै. बाबुराव सिद्रामप्पा चिंचनसुरे यांच्या स्मरणार्थ श्री निखिल राजेंद्र चिंचनसुरे यांच्या वतीने १ लाख रुपये रोख व ट्रॉफी देण्यात येणार आहे. द्वितीय बक्षीस कै.डॉ. राजेंद्र बाबुराव चिंचनसुरे यांच्या स्मरणार्थ कृषिधन अर्बन लिमिटेड चे व्यवस्थापकीय संचालक श्री ऋषिकेश राजेंद्र चिंचनसुरे यांच्या वतीने ५१ हजार रुपये रोख व ट्रॉफी देण्यात येणार आहे.

तृतीय बक्षीस श्री गिरीश प्रकाश चिंचनसुरे यांच्या वतीने २१ हजार रुपये रोख व ट्रॉफी देण्यात येणार आहे तर चतुर्थ बक्षीस म्हणून श्री जगन झकास जगदाळे यांच्या वतीने २१ हजार रुपये रोख व ट्रॉफी असे बक्षीस दिले जाणार आहे. तसेच उत्कृष्ट फलंदाज, गोलंदाज, क्षेत्ररक्षण, सामनावीर असे अनेक उत्तेजनार्थ बक्षीसे अनेक मान्यवरांच्या सौजन्याने या स्पर्धेत ठेवण्यात आली आहेत.

या स्पर्धेतील सर्व सामने सोशल मीडियाच्या यूट्यूब चॅनेलवर थेट प्रक्षेपण करण्यात येणार आहे. या स्पर्धेमुळे अनेक तालुक्यातील तरुण खेळाडूंना क्रिकेटमधील आपले कौशल्य दाखविण्याची संधी मिळणार आहे. कासार शिरसी शहरात प्रथमच इतकी मोठी स्पर्धा ठेवण्यात आल्याने क्रिकेट प्रेमी व खेळाडूंना या स्पर्धेची उत्सुकता लागली आहे.

## शिवमहापुराण कथेसाठी पाच हजार क्षमतेचा भव्य मंडप सज्ज : पानगावात भक्तीचा जागर

**तभा वृत्तसेवा**

**रेणापूर, दि. २३ मार्च :** रेणापूर तालुक्यातील 'प्रति पंढरपूर' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या पानगाव येथे श्री विठ्ठल-रुक्मिणी मंदिर आणि पंचक्रोशीतील भाविकांच्या वतीने अखंड हरिनाम सप्ताह व शिवमहापुराण कथेचे भव्य आयोजन करण्यात आले आहे. २४ ते ३१ मार्च दरम्यान चालणाऱ्या या सोहळ्यासाठी पानगावच्या बाजार मैदानावर जय्यत तयारी सुरू असून, सुमारे ५ हजार भाविक बसू शकतील असा अवाढव्य मंडप उभारला जात आहे.



या सप्ताहात बीड येथील साध्वी सोनाली दीदी चकलांबा यांच्या मधुर वाणीतून शिवमहापुराण कथा रंगणार आहे.

कार्यक्रमाची पूर्वतयारी म्हणून गुढीपाडव्याच्या शुभमुहूर्तावर शिवाजी कस्पटे व अनन्या कस्पटे या दाम्पत्याच्या हस्ते विधिवत ध्वजारोहण करण्यात आले. या महोत्सवात दररोज पहाटे महापूजा, ज्ञानेश्वरी पारायण, गाथा भजन, दुपारी शिवमहापुराण कथा आणि रात्री नामवंत कीर्तनकारांची कीर्तने रंगणार आहेत. भाविकांसाठी दररोज दुपारी आणि रात्री भोजनाची चोख व्यवस्था करण्यात आली असून, परिसरातील नागरिकांनी या भक्तीरसाचा लाभ घ्यावा, असे आवाहन सार्वजनिक सप्ताह समितीने केले आहे.

# दयानंद विज्ञानमध्ये बी.एस्सी.तृतीय व बायोटेक तृतीय वर्षाच्या विद्यार्थ्यांना निरोप

**तभा वृत्तसेवा**

**लातूर, दि. २३ मार्च :** दयानंद विज्ञान महाविद्यालय व दयानंद शिक्षण संस्था ही विद्यार्थी केंद्रबिंदू मानून विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी विविध उपक्रम सातत्याने राबविते.म्हणूनच दयानंद परिवारात शिक्षण घेतलेला प्रत्येक विद्यार्थी विविधांगी क्षेत्रात चमकतो. विद्यार्थ्यांच्या कलागुणांना येथे भरपूर वाव दिला जातो.महाविद्यालयातील अद्ययावत सुविधांचा फायदा विद्यार्थ्यांच्या करिअरसाठी निश्र्चित होतो.कॉलेज जीवनातील तीन वर्षांच्या आठवणी सर्वोच्च आनंद देणाऱ्या असतात.परंतु निरोप समारंभ कार्यक्रम हा नववधूला निरोप देण्यासारखा भावनिक, वेदनादायी असतो.असे असले तरी येणाऱ्या भावी काळात प्रत्येक विद्यार्थ्यांनी प्रामाणिकपणे उत्कृष्ट





काम करीत आई-वडील, महाविद्यालय व संस्थेचे नावलौकिक करावे. दयानंद परिवार व महाविद्यालयाशी कायमस्वरूपी नाळ जपत आपल्या ज्ञानाचा फायदा समाजोपयोगी कामासाठी केला पाहिजे.भावी काळात विद्यार्थ्यांना करिअरच्या अनेक संधी आहेत आणि त्या संधीचे सोने केले पाहिजे,असे प्रतिपादन महाविद्यालयाचे प्र.प्राचार्य डॉ. सिद्धेश्र्वर बेल्लाळे यांनी केले.

येथील दयानंद विज्ञान महाविद्यालयात बी.एस्सी.तृतीय वर्ष आणि बी.टी.तृतीय वर्ष वर्षांतील विद्यार्थ्यांच्या निरोप समारंभ कार्यक्रमाचे आयोजन दि.२२ मार्च २०२६ रोजी आयोजन करण्यात आलेले होते.यावेळी ते अध्यक्षीय समारोप करताना बोलत होते.याप्रसंगी कार्यक्रम समन्वयक डॉ. गजानन बने, डॉ.महेश करळे,प्रा.श्र्वेता मदने, आयक्यूएसी समन्वयक डॉ.जमन अंगुलवार, डॉ.युवराज सारणीकर, डॉ. रवी सोळुंके, डॉ.चंद्रशेखर स्वामी, डॉ.महेश बेंबडे , डॉ.रोहिणी शिंदे,प्रा.मेघा पंडित, डॉ.राहुल मोरे, डॉ.विश्र्वनाथ मोटे, डॉ.रामशेट्टी शेटकार, डॉ.फिरदोस बिराजदार,प्रा.स्वरूप गावकरे ,प्रा.अनुराधा शिंदे-पाटील, पर्णवी ढवारे,उगिले ऋतुजा यांची प्रमुख उपस्थिती होती.

यावेळी डॉ.जमन अंगुलवार यांनी विद्यार्थ्यांनी चांगले अनुभव, मिळालेले ज्ञान व कौशल्य विकासाच्या जोरावर दयानंद विज्ञान महाविद्यालयाचे नावलौकिक करावे असे आवाहन त्यांनी केले.कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. गजानन बने यांनी केले तर आभार पर्णवी ढवारे यांनी मानले.सूत्रसंचालन अजित गुजर व अब्दुल शेख यांनी संयुक्तरित्या केले.यावेळी बी.एस्सी. आणि बायोटेक तृतीय वर्षातील राजलक्ष्मी वाघमारे, दिग्विजय पाटील, बुशरा फातेमा,आर्यन गिरवलकर, प्रतिक्षा जाधव, सरीना शेख यांनी महाविद्यालयातील शिक्षणादरम्यानचे आलेले अनुभव व आठवणी सांगितल्या.कार्यक्रमाची शोभा वाढवण्यासाठी विद्यार्थ्यांमधील सुप्त कलागुणांना वाव मिळावा यासाठी विविध स्पर्धा व मनोरंजनात्मक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आलेले होते.याप्रसंगी महाविद्यालयातील प्राध्यापक, शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थी बहुसंख्येने उपस्थित होते.

धाराशिव
# जिल्हा
सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.

## एनएच-५२ वर अपघातात वृद्धाचा मृत्यु

**तभा वृत्तसेवा**
**येरमाळा, दि.२३ मार्च -**
येरमाळा पोलीस ठाणे हद्दीत राष्ट्रीय महामार्ग ५२ वर झालेल्या अपघातात एका वृद्धाचा मृत्यू झाला आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, भाऊराव सगाजी ओव्हाळ (वय ७७, रा. पानगाव ता. कळंब जि. धाराशिव) हे दि.२ मार्च रोजी सकाळी १० ते १०.३० वाजण्याच्या सुमारास रत्नापूर येथे एनएच-५२ वर पायी जात असताना अज्ञात वाहन चालकाने निष्काळजीपणे वाहन चालवून त्यांना जोरदार धडक दिली. या अपघातात ते गंभीर जखमी होऊन मृत्यूमुखी पडले.



याप्रकरणी त्यांचे पुत्र अनिल भाऊराव ओव्हाळ (वय ४३) यांनी दिलेल्या फिर्यादीवरून दि. २२ मार्च रोजी येरमाळा पोलीस ठाण्यात अज्ञात वाहन चालकाविरुद्ध गुन्हा नोंदवण्यात आला आहे.

याप्रकरणी पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.



# तुळजापुरात अद्यावत वातानुकूलित नाट्यगृह उभारणार : आ. राणादादा

## 'पंचरंग करंडक' एकांकिका लेखन स्पर्धेचा पारितोषिक वितरण सोहळा...



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**
कुलस्वामिनी तुळजाभवानी मातेच्या तुळजापूर शहराला लाभलेला ऐतिहासिक आणि सांस्कृतिक वारसा अधिक समृद्ध करण्यासाठी, तसेच स्थानिक कलाकारांना हक्काचे व्यासपीठ मिळवून देण्यासाठी तीर्थक्षेत्र तुळजापूर येथे लवकरच सर्व सोयींनी युक्त असे पूर्णतः वातानुकूलित भव्य आणि अद्यावत नाट्यगृह उभारणार असल्याची अशी ग्वाही आमदार राणाजगजितसिंह पाटील यांनी दिली आहे.

'पंचरंग प्रतिष्ठान' आयोजित 'श्री क्षेत्र तुळजापूर राज्यस्तरीय पंचरंग करंडक एकांकिका लेखन स्पर्धा २०२५-२६' चा पारितोषिक वितरण आणि निवडक एकांकिकांच्या अंकुर या संग्रहाचा प्रकाशन सोहळा हॉटेल स्कायलँड येथे अत्यंत उत्साहात पार पडला. यावेळी बोलताना आमदार राणाजगजितसिंह पाटील म्हणाले, आई तुळजाभवानीच्या पावन भूमीत साहित्याचा जागर होणे ही अभिमानास्पद बाब आहे. या स्पर्धेच्या निमित्ताने निवडक एकांकिका संहितांचा 'अंकुर' हा संग्रह पुस्तक स्वरूपात प्रकाशित करण्यात आला. नवोदित लेखकांना संधी उपलब्ध करून देऊन दर्जेदार नाट्य साहित्य रंगभूमीपर्यंत पोहोचवणे, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे. तुळजापूरची ही साहित्यिक आणि सांस्कृतिक पताका अशीच उंच फडकत राहणार असल्याचे सांगत आमदार पाटील यांनी आयोजक, पंचरंग प्रतिष्ठानच्या कामाचे यावेळी कौतुकही केले.

**सोलापूर तरुण भारत**
**बातमीची आमदारांकडून दाखल...**

कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठातील मराठी विभाग प्रमुख, ख्यातकीर्त सिने गीतकार तथा प्रसिद्ध कवी व नाट्य लेखक प्रा. डॉ. दासू वैद्य उपस्थित होते. त्यांच्या उपस्थितीने सोहळ्याची उंची अधिकच वाढली. व्यासपीठावर तुळजापूरचे नगराध्यक्ष विनोद गंगणे, उपनगराध्यक्ष रामचंद्र रोचकरी, प्रसिद्ध अभिनेते उमेश जगताप, शंतनू गंगणे यांची प्रमुख उपस्थिती होती.

यांप्रसंगी पंचरंग प्रतिष्ठानचे अध्यक्ष श्रीकांत नाडापुडे, सचिव प्रा. संभाजीराव भोसले, उपाध्यक्ष सचिन घोडके, स्पर्धा संयोजक महेश धुमाळ आणि दिग्विजय भोसले यांच्यासह नाट्य व साहित्य क्षेत्रातील रसिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. सर्व विजेत्या लेखकांचे आणि 'अंकुर' संग्रहात स्थान मिळवलेल्या साहित्याचे यावेळी अभिनंदन करण्यात आले.



११ | शुक्रवार, १२ डिसेंबर २०२५ | धाराशिव परिसर | तरुण भारत https://epaper.dainiktarunbharat.com/

तुळजाईनगरीला अद्ययावत नाट्यगृहाची गरज!

लोकप्रतिनिधी आणि प्रशासनाची उदासीनता ... स्थानिक कलावंताना हक्काचं व्यासपीठ कधी मिळणार?...

तुळजापूरात मोठ्या प्रमाणात रसिक वर्ग उपलब्ध

श्री क्षेत्र तुळजापूरची ओळख अधिक व्यापक...

तुळजापूरचे सांस्कृतिक आकर्षण वाढेल...

दर्जेदार व्यावसायिक नाट्यकलेचे सादरीकरण...

संक्षिप्त प्रतिक्रिया...

तुळजापूर येथील नाट्यसंस्कृतीला न्याय द्यावा...

प्रसिद्ध कलाकार देवीच्या क्षेत्री कला सादरीकरणास उत्सुक...

नाट्यगृह झाल्यास सर्वसामान्य रसिक प्रेक्षकांना आनंद मिळेल...

## श्रीराम नवमी निमित्त देवी गोंधळ उत्सव संपन्न

### कालीचरण महाराजांच्या शिवतांडव पठणाने भाविक मंत्रमुग्ध



**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**
शहरात प्रथमच कालिपुत्र कालीचरण महाराज यांच्या प्रमुख उपस्थितीत श्रीराम नवमी व चैत्र नवरात्री निमित्त भव्य देवी गोंधळ उत्सव व शिव तांडव स्तोत्र पठणाचा कार्यक्रम रविवारी सायंकाळी लेडीज क्लब मैदानावर अत्यंत उत्साहात व भक्तिमय वातावरणात संपन्न झाला.

कार्यक्रमाची सुरुवात रॅलीच्या माध्यमातून छत्रपती शिवाजी महाराज, डॉ. बाबासाहेब आंबेडकर, छत्रपती संभाजी महाराज तसेच संत गाडगे महाराज यांच्या पुतळ्यांना पुष्पहार अर्पण करून कार्यस्थळी आगमन करण्यात आले. त्यानंतर कालीचरण महाराज यांच्या ओजस्वी शिव तांडव स्तोत्र पठणाने उपस्थित भाविक मंत्रमुग्ध झाले.

हा धार्मिक सोहळा रुपामाता फाउंडेशनच्या वतीने आयोजित करण्यात आला होता. लोकशाहीर देवानंद माळी व पृथ्वीराज माळी यांच्या टीमने विधिवत पूजा साकारत देवीचा गोंधळ उत्सव पारंपरिक पद्धतीने भक्तिभावाने साजरा केला.

कार्यक्रमास रुपामाता परिवाराचे संस्थापक अध्यक्ष ॲड. व्यंकट गुंड-पाटील, सुधाकर गुंड, ॲड. अजित गुंड-पाटील, संजय महाराज पुजारी, वसंतराव नागदे, हभप. ॲड. पांडुरंग महाराज लोमटे, हभप. अडसूळ महाराज इटकूरकर, रामदास कोळगे यांच्यासह आराधी मंडळ, गणेश मंडळाचे पदाधिकारी, महिला व नागरिक उपस्थित होते.

**विशेष उल्लेख...**
रुपामाता परिवाराचे कार्य गौरवताना कालीचरण महाराज म्हणाले की, बजरंग दल व विश्व हिंदू परिषदेत व्यंकट गुंड यांचे योगदान महत्त्वपूर्ण आहे. पाच पिढ्यांपासून या कुटुंबात हिंदुत्वाची परंपरा जपली गेली असून, रुपाबाई यांच्या मार्गदर्शनाखाली हे संस्कार रुजले. कारसेवेतही गुंड परिवाराचा मोठा सहभाग होता.

## मैलारपूरच्या आखाड्यातील विजयानंतर हर्षवर्धन सदगीर ठरले 'डबल महाराष्ट्र केसरी'

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ मार्च -**
'डबल महाराष्ट्र केसरी'चा मान पटकावणारे हर्षवर्धन सदगीर यांना नळदुर्गचा खंडोबा पावल्याचे पुन्हा एकदा अधोरेखित झाले आहे.



दि.४ जानेवारी २०२६ रोजी श्रीक्षेत्र मैलारपूर येथे श्री खंडोबा यात्रेनिमित्त आयोजित भव्य कुस्ती स्पर्धेत हर्षवर्धन सदगीर यांनी प्रथम क्रमांक पटकावत १ लाख ५१ हजार रुपयांचे बक्षीस व मानाचा चांदीचा गदा जिंकला होता. या अंतिम लढतीत त्यांनी हरियाणातील भारत केसरी विजेता सोनू गेरवाल याला चित्तथरारक कुस्तीत पराभूत केले होते.

मैलारपूर येथील आखाड्यात खेळणाऱ्या पैलवानाला श्री खंडोबा देवाचा आशीर्वाद मिळतो आणि तो पुढे महाराष्ट्र केसरी बनतो, असा समृद्ध इतिहास आहे. हर्षवर्धन सदगीर यांच्या बाबतीतही हेच पुन्हा सिद्ध झाले आहे.

नुकत्याच पार पडलेल्या महाराष्ट्र केसरी स्पर्धा स्पर्धेत विजय मिळवत त्यांनी दुसऱ्यांदा महाराष्ट्र केसरी होण्याचा मान पटकावला आहे. त्यामुळे नळदुर्ग परिसरात आनंदाचे वातावरण असून या यशाचे श्रेय खंडोबा देवाच्या कृपेला दिले जात आहे.

## 'पंच परिवर्तन' समजून घेतल्यास अनेक समस्यांचे निवारण होईल : विजय पुराणिक

### तुळजापुरात इंद्रायणी हिंदू संमेलन संपन्न...

**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ मार्च -**
राष्ट्रीय स्वयंसेवक संघाने मागील शंभर वर्षांत हिंदू समाजाच्या संघटनासाठी सातत्याने कार्य केले असून, सर्वसामान्य नागरिकांनी 'पंच परिवर्तन' अंगीकारल्यास आपले प्रश्न आपणच सोडवू शकतो, असे प्रतिपादन सेवा भारतीचे अखिल भारतीय सह संघटन मंत्री विजय पुराणिक यांनी केले.

येथील श्रीनाथ मंगल कार्यालयात आयोजित इंद्रायणी हिंदू संमेलनात उपस्थितांना मार्गदर्शन करताना ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी पुजारी नगर फाउंडेशनचे अध्यक्ष गणेश पुजारी होते, तर प्रमुख अतिथी म्हणून हभप. पांडुरंग रेड्डी महाराज उपस्थित होते. प्रारंभी संस्कार भारती देवगिरी प्रांताचे सह महामंत्री डॉ. सतीश महामुनी यांनी प्रास्ताविक केले. मान्यवरांचे स्वागत गणेश पुजारी यांनी केले. संमेलनाला नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

आपल्या भाषणात विजय पुराणिक यांनी सांगितले की, प्रत्येक व्यक्तीने आपल्या लहान-लहान कर्तव्यांचे प्रामाणिकपणे पालन केले पाहिजे. 'पंच परिवर्तन' समजून घेऊन त्याचा अंगीकार केल्यास समाजातील अनेक समस्या सहज सोडवता येतील, असा



विश्वास त्यांनी व्यक्त केला. हिंदू संस्कृती अत्यंत प्राचीन असून जगातील ५५ देशांमध्ये तिचे दर्शन घडते, असे नमूद करत पुढील पिढ्यांपर्यंत या संस्कृतीचा वारसा पोहोचवण्यासाठी सर्वांनी पुढाकार घ्यावा, असे आवाहन त्यांनी केले.

यावेळी हभप. पांडुरंग रेड्डी महाराज यांनीही उपस्थितांना मार्गदर्शन करून आशीर्वाद दिले.

कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी अध्यक्ष गणेश पुजारी, उपाध्यक्ष महेश कांबळे, कोषाध्यक्ष औदुंबर वाघे, संरक्षक बालाजी नरवाडे, सचिव रितेश कवडे आदींनी परिश्रम घेतले. सूत्रसंचालन संस्कार भारतीचे जिल्हा पदाधिकारी लक्ष्मीकांत सुलाखे यांनी केले, तर आभार प्रदर्शन संघाचे पदाधिकारी श्रीकांत कावरे यांनी केले.

## अवैध गावठी दारू जप्त

**वाशी, दि.२३ मार्च -** मुरुम पोलीस ठाणे हद्दीत अवैध गावठी दारू विक्रीविरोधात कारवाई करत पोलिसांनी दोन ठिकाणी दारू जप्त करून संबंधितांविरुद्ध गुन्हे नोंदवले आहेत.

दि.२२ मार्च रोजी कंटेकुर येथे दयानंद लक्ष्मण घोटाळे (वय ६५) यांच्याकडून सुमारे १,५०० रुपये किमतीची १५ लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली. तसेच दाळींब येथे शकील मोहद्दीन शेख (वय ४२) यांच्याकडून सुमारे ५,००० रुपये किमतीची ५० लिटर गावठी दारू जप्त करण्यात आली.

## तेरखेडा येथे संत बाळूमामा पालखीचा मुक्काम संपन्न; येरमाळ्याकडे प्रस्थान

**तभा वृत्तसेवा**
**वाशी, दि.२३ मार्च -**
वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे संत बाळूमामा यांच्या पालखीचा अकरा दिवसांचा मुक्काम भक्तिमय वातावरणात पार पडला. दि. २३ मार्च रोजी सकाळी पालखीचे येरमाळा (ता. कळंब) गावाकडे प्रस्थान झाले.



या निमित्ताने तेरखेडा गावात पालखीची वाजत-गाजत भव्य मिरवणूक काढण्यात आली. बाळू मामाच्या नावानं चांगभलं या जयघोषाने परिसर दुमदुमून गेला. पिवळा भंडारा उधळत संपूर्ण गाव भक्तीमय वातावरणात न्हाऊन निघाले. महिलांनी घरोघरी आकर्षक रांगोळ्या काढून पालखीचे स्वागत केले, तर ग्रामस्थांनी श्रद्धा आणि उत्साहात पालखीला निरोप दिला.

या अकरा दिवसांच्या मुक्काम दरम्यान दररोज महाप्रसादाचे आयोजन करण्यात आले होते. धाराशिव जिल्हा, सोलापूर जिल्हा तसेच बीड जिल्हा येथून हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला.

## रिक्षा आडवी लावून मारहाण; गुन्हा दाखल

**तभा वृत्तसेवा**
**परंडा, दि.२३ मार्च -**
परंडा पोलीस ठाणे हद्दीत किरकोळ वादातून एका व्यक्तीवर मारहाण केल्याची घटना घडली आहे.

मिळालेल्या माहितीनुसार, आरोपी मजबील खॉजा शेख (रा. बावची ता. परंडा) याने दि. २२ मार्च रोजी सायंकाळी ४.३० वाजण्याच्या सुमारास डॉ. बाबासाहेब आंबेडकर चौक परिसरात फिर्यादी लक्ष्मण सुदाम भांगे (वय ३९, रा. खासगाव ता. परंडा) यांना गाडी समोर का थांबवली या कारणावरून अडवले.

दारूच्या नशेत आरोपीने रिक्षा आडवी लावून शिवीगाळ करत लाथाबुक्यांनी व काठीने मारहाण केली. तसेच फिर्यादीच्या गाडीची समोरील काच फोडून नुकसान केले व जीवे मारण्याची धमकी दिली.

या प्रकरणी फिर्यादी लक्ष्मण भांगे यांनी दिलेल्या तक्रारीवरून परंडा पोलीस ठाण्यात विविध कलमांन्वये आरोपीविरुद्ध गुन्हा नोंद करण्यात आला आहे.

# तुळजापूरची लाल माती पैलवानांपासून वंचित!

## २५ वर्षांपासून कुस्ती परंपरेला खंड ; आखाडा असूनही दुर्लक्षित... स्थानिक राजकीय आणि प्रशासकीय अनास्थेमुळे मानाची तुळजापूर केसरी स्पर्धा बंद...

**अनिल आगलावे**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**
तीर्थक्षेत्र म्हणून संपूर्ण महाराष्ट्रात ओळख असलेल्या तुळजापूर शहराची ओळख केवळ धार्मिकच नाही, तर पारंपरिक मातीतील कुस्तीच्या वारशामुळेही होती. मात्र, गेल्या २५ वर्षांपासून कुस्ती स्पर्धा व प्रशिक्षण बंद असल्याने ही परंपरा लयाला जात असल्याचे चित्र सध्या पाहायला मिळत आहे. आखाडा अस्तित्वात असूनही, प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे स्थानिक पैलवानांना सरावासाठी आवश्यक सुविधा मिळत नसल्याची खंत व्यक्त केली जात आहे.



तुळजापूर येथील तालुका क्रीडा संकुलामध्ये पारंपरिक मातीतील आखाडा उपलब्ध आहे. हा आखाडा तांत्रिकदृष्ट्या सक्षम असला तरी देखभाल, व्यवस्थापन आणि नियोजनाच्या अभावामुळे तो वापरण्यायोग्य राहिलेला नाही. परिणामी, गावातील इच्छुक तरुणांना कुस्तीचे प्रशिक्षण घेण्यासाठी अन्य ठिकाणी जावे लागते किंवा अनेक जण हा खेळ सोडून देतात. एकेकाळी तुळजापूरची लाल माती ही राज्यस्तरीय आणि प्रादेशिक कुस्ती स्पर्धांचे केंद्र होती. अनेक नामांकित पैलवान या आखाड्यातून घडले. गावात नियमित स्पर्धा होत असल्याने तरुणांमध्ये मोठ्या प्रमाणात उत्साह निर्माण होत असे. मात्र, गेल्या दोन दशकांपासून स्पर्धा बंद झाल्याने कुस्तीतील सातत्य खंडित झाले. तुळजापूरचा आखाडा हा कोल्हापूरच्या प्रसिद्ध खासबाग कुस्ती मैदानाच्या धर्तीवर विकसित होण्याची पूर्ण क्षमता ठेवतो. मात्र, सध्या हा आखाडा राजकीय आणि प्रशासकीय अनास्थेमुळे दुर्लक्षित राहिला आहे. योग्य नियोजन केल्यास येथेही मोठ्या प्रमाणात स्पर्धा आयोजित होऊ शकतात आणि राज्यभरातील पैलवानांना व्यासपीठ उपलब्ध होऊ शकते.

तुळजापूरच्या मातीतील आखाड्यात अनेक नामांकित पैलवान घडले आहेत आणि याची महती केवळ स्थानिकच नाही तर संपूर्ण धाराशिव जिल्ह्याकरिता गौरवास्पद आहे. क्रीडा संकुलातील कुस्ती स्पर्धा आणि प्रशिक्षण बंद असल्यामुळे गावातील तरुणांमध्ये क्रीडाविषयीची ओढ कमी होत असल्याचे दिसून येते. पूर्वी स्पर्धा हेच प्रेरणास्थान होते. त्यातूनच अनेक पैलवान घडले. मात्र आता त्या संधींचा अभाव जाणवत आहे. तुळजापूर हे केवळ धार्मिक श्रद्धेचे केंद्र नसून, कुस्ती परंपरेचेही ऐतिहासिक स्थान आहे.

मातीतील कुस्ती ही महाराष्ट्राच्या शौर्य, परंपरा आणि संस्कृतीचे प्रतीक मानली जाते. त्यामुळे ही परंपरा जपण्यासाठी प्रशासनासह स्थानिकांनी पुढाकार घेण्याची गरज व्यक्त होत आहे.

तुळजापूरची लाल माती ही केवळ माती नाही, तर अनेक पैलवानांच्या घामाने आणि परिश्रमाने समृद्ध झालेला वारसा आहे.

योग्य नियोजन, प्रशासनाचे सहकार्य आणि स्थानिकांचा सहभाग मिळाल्यास तुळजापूर पुन्हा एकदा कुस्तीचा गड म्हणून नावारूपाला येऊ शकतो, अशी आशा कुस्ती प्रेमींकडून व्यक्त केली जात आहे.

**कुस्ती प्रेमींच्या मागण्या...**
स्थानिक कुस्तीप्रेमी, प्रशिक्षक आणि क्रीडा संघटनांनी प्रशासन आणि स्थानिक नेते मंडळीकडे काही मागण्या करत आहेत, त्यामध्ये आखाड्याची तात्काळ दुरुस्ती व नियमित देखभाल, कुस्ती प्रशिक्षणासाठी प्रशिक्षक व सुविधा उपलब्ध करून देणे, दरवर्षी मानाच्या कुस्ती स्पर्धांचे आयोजन,आर्थिक सहाय्य आणि प्रोत्साहन योजना,ग्रामीण क्रीडा विकासात कुस्तीला प्राधान्य, सांस्कृतिक ओळख जपण्याची गरज असल्याचे बोलले जात आहे.

# धाराशिव दिनांक

सोलापूर तरुण भारत, सोलापूर, (महाराष्ट्र) येथून प्रकाशित केले.
आवृत्ती सातारा, संभाजीनगर, धाराशिव, लातूर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड (महाराष्ट्र), तसेच विजयपूर, कलबुर्गी, बीदर (कर्नाटक) येथून प्रकाशित केले.



## तेरणा महाविद्यालयाच्या ४५ विद्यार्थ्यांची नामांकित कंपनीत निवड

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**

तेरणा अभियांत्रिकी महाविद्यालय येथील फार्मसी विभागातील तब्बल ४५ विद्यार्थ्यांची पुणे येथील एजिओ या नामांकित औषधनिर्माण कंपनीत निवड झाली आहे.



महाविद्यालयाकडून उद्योगाभिमुख कौशल्यांवर दिला जाणारा भर आणि सातत्यपूर्ण प्रशिक्षण यामुळे विद्यार्थ्यांना रोजगाराच्या उत्तम संधी उपलब्ध होत असल्याचे प्राचार्य डॉ. विक्रमसिंह माने यांनी सांगितले.

या भरती प्रक्रियेत तांत्रिक ज्ञान, संवादकौशल्य व आत्मविश्वासावर विशेष भर देण्यात आला होता. निवड झालेल्या विद्यार्थ्यांमध्ये आनंदाचे वातावरण असून त्यांच्या कुटुंबीयांनीही समाधान व्यक्त केले आहे.

हा प्लेसमेंट उपक्रम यशस्वी करण्यासाठी संभव फाउंडेशन, बंगलोर यांचे सहकार्य लाभले. तसेच ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी अशोक जगताप व संबंधित प्राध्यापकांनी विशेष परिश्रम घेतले.

## संक्षिप्त वृत्त...



### नांदगाव येथील जिल्हा परिषद शाळेची कार्यकारणी जाहीर

**वाशी, दि.२३ मार्च -**

वाशी तालुक्यातील नांदगाव येथील जिल्हा परिषद शाळेची कार्यकारणी (दि.२३) रोजी जाहीर करण्यात आली. या कार्यकारणीच्या अध्यक्षपदी शिवाजी सारूक यांची निवड करण्यात आली असून उपाध्यक्षपदी सोनाजी शिंदे यांची निवड झाली आहे. ही निवड प्रक्रिया शाळेत गावातील पालक व नागरिकांच्या उपस्थितीत पार पडली. यावेळी ग्रामपंचायत सदस्य संदिप घुले यांच्यासह अमोल घुले, राजेंद्र फासे, अहमद शेख, गोरख घुले, महेश घुले आदी उपस्थित होते. तसेच मुख्याध्यापक रणजित पाटील शिक्षक सुहास बारकुल, सुरज उमरदंड, मनीषा फड व शोभा होगले यांनी कार्यक्रमास उपस्थिती दर्शवली.

### वृत्तपत्रांना दरवाढ व धोरणात्मक सवलतींची मागणी

**लोहारा, दि.२३ मार्च -**


राज्यातील वृत्तपत्रांना दरवाढ देण्यात यावी तसेच जाहिरात व प्रशासकीय धोरणांबाबत विविध मागण्यांना मान्यता द्यावी, अशी मागणी व्हॉईस ऑफ मीडिया संघटनेच्या वतीने करण्यात आली आहे. सोमवारी (दि.२३) लोहारा तालुक्याच्या वतीने ब्रिजेश सिंह (प्रधान सचिव व महासंचालक, माहिती व जनसंपर्क महासंचालनालय) यांना तहसीलदारामार्फत निवेदन सादर करण्यात आले. निवेदनात वृत्तपत्र उद्योगावर वाढत्या आर्थिक ताणाचा उल्लेख करत, शासनाच्या योजना व धोरणे जनतेपर्यंत पोहोचवण्यात माध्यमांची महत्त्वाची भूमिका अधोरेखित करण्यात आली आहे. यापूर्वीही अनेकवेळा निवेदने व आंदोलने करूनही मागण्यांकडे दुर्लक्ष झाल्याचे सांगत, यावेळी सकारात्मक निर्णयाची अपेक्षा व्यक्त करण्यात आली आहे. या निवेदनावर तालुकाध्यक्ष गिरीश भगत, सुमित झिंगाडे यांच्यासह पदाधिकाऱ्यांच्या सह्या आहेत.



### संस्कार गुरुकुलात बालकलाकारांची बासरी संगीत सभा संपन्न

**धाराशिव, दि.२३ मार्च -**

शहरातील गुरू-शिष्य परंपरेनुसार बासरीवादन प्रशिक्षणासाठी प्रसिद्ध असलेल्या महर्षि दधिची फाऊंडेशन, धाराशिव संचलित गुरुकुल संगीत संस्कार विद्यालय बासरी संगीत सभा उत्साहात संपन्न झाली. या संगीत सभेत बालकलाकारांनी वैयक्तिक व समूह स्वरूपात शास्त्रीय तसेच सुगम संगीताचे सादरीकरण केले. बासरीच्या मधुर सुरांनी उपस्थित श्रोत्यांची मने जिंकली. जगदीश सुतार यांनी संगीताचे महत्त्व अधोरेखित करत, लेकरांच्या हातात मोबाईल न देता बासरी द्या, असे आवाहन केले व उपस्थितांचे आभार मानले. या कार्यक्रमास प्रशांत कुडाळ, प्रा. प्रसाद माशाळकर, शुभम बनकर तसेच दानवे, टेकाळे, सुरवसे, राऊत, होळकर, शहा परिवार आणि इतर श्रोते उपस्थित होते.



### तेरखेडा येथे संत बाळूमामा पालखी सोहळ्याचा ११ वा दिवस उत्साहात

**वाशी, दि.२३ मार्च -**

वाशी तालुक्यातील तेरखेडा येथे संत बाळूमामा यांच्या पालखी सोहळ्याचा आज ११ वा दिवस उत्साहात पार पडत आहे. पालखी मागील अकरा दिवसांपासून तेरखेडा येथे मुक्कामी असून या काळात हजारो भाविकांनी दर्शनाचा लाभ घेतला आहे. तेरखेडा गावातून पालखीची भव्य मिरवणूक काढण्यात येणार असून संपूर्ण गाव भक्तिमय वातावरणात न्हाऊन निघाले आहे. संत बाळूमामा चांगभलं या जयघोषाने परिसर दुमदुमत आहे. धाराशिव जिल्ह्यासह सोलापूर जिल्हा व बीड जिल्हा येथून मोठ्या संख्येने भाविक उपस्थित आहेत. मिरवणुकीनंतर पालखी पुढील प्रवासासाठी येरमाळा (ता. कळंब) गावाकडे प्रस्थान करणार आहे.

### पत्रकार शिवशंकर तिरगुळे यांचे निधन

**अणदूर, दि.२३ मार्च -**

जयमल्हार पत्रकार संघाचे सदस्य, पत्रकार शिवशंकर तिरगुळे (वय ४६) यांचे रविवारी अल्पशा आजाराने सोलापूर येथे निधन झाले.



शोषित, पीडित व वंचित घटकांच्या प्रश्नांसाठी त्यांनी आपल्या लेखणीतून आवाज उठवला. प्रामाणिक व सामाजिक भान असलेला पत्रकार म्हणून त्यांची ओळख होती. तसेच वृक्षमित्र म्हणूनही ते परिचित होते. त्यांचा अंत्यसंस्कार सोमवारी दुपारी १ वा. हळावरील स्मशानभूमीत करण्यात आले.

## गॅस आहे पण, मिळत नाही!; धाराशिव शहरात एजन्सींचा अनागोंदी कारभार

**जिल्हा प्रशासनाचा दावा ठरतोय फोल...** **एजन्सी बाहेर ग्राहकांच्या रांगा...**





**विपीन वीर**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**

धाराशिव शहरात घरगुती गॅस सिलिंडर मिळवण्यासाठी नागरिकांना अक्षरशः त्रास सहन करावा लागत असून, गॅस एजन्सी चालकांच्या अनागोंदी कारभारामुळे नागरिक हैराण झाले आहेत. भर उन्हातही गॅससाठी लांबच लांब रांगा लागत असून, केंद्रावरील गर्दी काही केल्या कमी होत नाही.

शहरातील विविध गॅस वितरण केंद्रांवर सकाळपासूनच नागरिकांची मोठी गर्दी होत आहे. अनेकांना तासन्तास उन्हात उभे राहूनही गॅस मिळत नसल्याने संताप व्यक्त केला जात आहे. महिलांसह ज्येष्ठ नागरिकांनाही या त्रासाचा मोठा फटका बसत आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून जिल्ह्यात कुठेही गॅसची टंचाई नसल्याचा दावा करण्यात येत आहे.




पुरेसा गॅस साठा उपलब्ध असल्याचे सांगितले जात असले तरी प्रत्यक्षात मात्र नागरिकांना वेळेवर सिलिंडर मिळत नाही. त्यामुळे एजन्सी स्तरावरच कृत्रिम टंचाई निर्माण केली जात असल्याचा आरोप नागरिकांकडून केला जात आहे.

काही ठिकाणी होम डिलिव्हरी वेळेत होत नसल्याच्या तक्रारीही समोर येत आहेत. ऑनलाईन बुकिंग करूनही सिलिंडर वेळेवर मिळत नसल्याने ग्राहकांना स्वतः केंद्रावर जाऊन गॅस घ्यावा लागत आहे. यामुळे गर्दीत आणखी भर पडत आहे.

### कारवाईची मागणी जोर धरतेय...

या सर्व पार्श्वभूमीवर गॅस पुरवठा करणाऱ्या एजन्सींवर तात्काळ कारवाई करावी, अशी मागणी नागरिकांकडून जोर धरत आहे. संबंधित अधिकाऱ्यांनी प्रत्यक्ष पाहणी करून दोषी एजन्सींवर कठोर कारवाई करावी, तसेच वितरण व्यवस्थेत सुधारणा करून नागरिकांना दिलासा द्यावा, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे. सध्या तरी गॅस आहे पण मिळत नाही अशी स्थिती निर्माण झाल्याने धाराशिवकरांच्या संतापाचा भडका उडाला आहे. प्रशासनाने तातडीने याकडे लक्ष देणे गरजेचे ठरत आहे.

## देवीच्या दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या कारला आग



सातही जण सुखरूप बचावले

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ मार्च -**

उमरगाहून तुळजाभवानी मंदिर येथे दर्शनासाठी निघालेल्या भाविकांच्या इर्टीका कारला सोलापूर-हैदराबाद राष्ट्रीय महामार्गावर दि. २३ मार्च रोजी दुपारी पावणे पाच वाजण्याच्या सुमारास नळदुर्गजवळ मुर्टापाटीच्या पुढे अचानक आग लागली. या आगीत कार पूर्णपणे जळून खाक झाली असून सुदैवाने गाडीत असलेले सर्व सातही भाविक सुखरूप बचावले.

मिळालेल्या माहितीनुसार, उमरगा येथील आकाश दिनकर अंधारे हे इर्टीका (क्र. एमएच २५ बीएफ १६०४) कारने आपल्या कुटुंबासह तुळजापूर येथे दर्शनासाठी निघाले होते. नळदुर्ग बायपास रोडवरील मुर्टापाटीजवळ पोहोचताच गाडीतून धूर येऊ लागल्याचे चालक पुरुषोत्तम रघुनाथ सूर्यवंशी यांच्या लक्षात आले. त्यांनी प्रसंगावधान राखत तात्काळ गाडी रस्त्याच्या कडेला उभी करून सर्वांना खाली उतरवले.

क्षणातच गाडीने पेट घेतल्याने इर्टीका कार पूर्णपणे जळून खाक झाली. मात्र चालकाच्या सतर्कतेमुळे मोठी दुर्घटना टळली. गाडीत तीन महिला, दोन पुरुष आणि दोन लहान मुले असे एकूण सात जण प्रवास करत होते. घटनेची माहिती मिळताच नळदुर्ग नगरपालिकेचे अग्निशमन दल, महामार्ग पोलीस तसेच नळदुर्ग पोलीस ठाण्याचे कर्मचारी घटनास्थळी दाखल झाले. त्यांनी आग विझविण्याचा प्रयत्न केला, मात्र तोपर्यंत कार पूर्णतः जळून खाक झाली होती.

या घटनेमुळे काही काळ राष्ट्रीय महामार्गावर खळबळ उडाली होती.

## खेडच्या स्मिता शिंदेचे एमपीएससीत यश

### मंडल कृषी अधिकारी पदाला गवसणी...

**तभा वृत्तसेवा**
**धाराशिव, दि.२३ मार्च -**

महाराष्ट्र राज्य लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) वतीने घेण्यात आलेल्या स्पर्धा परीक्षेत धाराशिव तालुक्यातील खेड येथील स्मिता जयंत शिंदे हिने उल्लेखनीय यश संपादन करत मंडल कृषी अधिकारी (वर्ग-२) पदाला गवसणी घातली आहे. तिने ४५० पैकी २९३ गुण मिळवत ओबीसी महिला प्रवर्गातून राज्यात १७ वा क्रमांक मिळवला आहे.

स्मिता शिंदे हिने यापूर्वीही एमपीएससी परीक्षेत मुलाखतीपर्यंत मजल मारली होती. सातत्यपूर्ण प्रयत्न, नियमित अभ्यास आणि जिद्दीच्या जोरावर अखेर तिने यश मिळवत आपल्या कुटुंबाचे व गावाचे नाव उज्ज्वल केले आहे.



प्राथमिक व माध्यमिक शिक्षण धाराशिव येथे झाले. पुढे तिने कोल्हापूर येथून बीएससी (ॲग्री) आणि पुणे येथून एमएस्सी (ॲग्री) पदवी पूर्ण केली. सध्या ती राहुरी येथील कृषी विद्यापीठात पीएचडीसाठी संशोधन करत आहे.

स्मिता हिचे वडील जयंत शिंदे हे प्रगतिशील शेतकरी असून आई गृहिणी आहे. तिच्या या यशाबद्दल परिसरातून तिच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

## ऊस बिलासाठी शेतकऱ्यांचा आत्मदहनाचा इशारा

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ मार्च -**

गोकुळ शुगर इंडस्ट्रिज या कारखान्याकडून ऊसाचे थकीत बिल तात्काळ द्यावे, अन्यथा २५ मार्च २०२६ रोजी सोलापूर येथील जिल्हाधिकारी कार्यालयासमोर आत्मदहन करण्याचा इशारा नळदुर्ग येथील चार शेतकऱ्यांनी दिला आहे. याबाबतचे निवेदन त्यांनी जिल्हाधिकारी सोलापूर यांना सादर केले आहे.

निवेदनानुसार, तुळजापूर तालुक्यातील शेकडो शेतकऱ्यांनी धोत्री येथील गोकुळ शुगर इंडस्ट्रिजला ऊस गाळपासाठी दिला आहे. नळदुर्ग येथील सोमनाथ कसेकर, सुनिल चौधरी, स्वप्नील तानाजी काळे व आबेदतुल्ला इनामदार यांनीही २०२४, २०२५ व २०२६ या वर्षांत ऊस दिला, मात्र अद्याप बिल मिळाले नाही. २० फेब्रुवारी रोजी थकीत बिल देण्याचे आश्वासन कारखान्याकडून देण्यात आले होते. तरीही वारंवार पाठपुरावा करूनही बिल न मिळाल्याने शेतकरी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. वैद्यकीय खर्च, लग्नकार्ये आदी कारणांमुळे त्यांची परिस्थिती गंभीर झाली आहे. जिल्हाधिकाऱ्यांनी तातडीने हस्तक्षेप करून कारखान्यावर कारवाई करावी व थकीत बिल मिळवून द्यावे, अन्यथा २५ मार्च रोजी आत्मदहन करण्यात येईल, असा इशारा निवेदनात देण्यात आला आहे.

या निवेदनाच्या प्रती साखर आयुक्त कार्यालय सोलापूर, जिल्हा पोलिस अधीक्षक तसेच राणाजगजितसिंह पाटील यांनाही देण्यात आल्या आहेत.

## मारुती बनसोडे यांचा समाज कल्याण कार्यालयाकडून सत्कार

**तभा वृत्तसेवा**
**नळदुर्ग, दि.२३ मार्च -**

नळदुर्ग येथील परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव मारुती बनसोडे यांना सामाजिक न्याय व विशेष सहाय्य विभाग महाराष्ट्र शासन यांच्या वतीने दिला जाणारा 'राष्ट्रपिता महात्मा गांधी राज्यस्तरीय व्यसनमुक्ती सेवा पुरस्कार (२०२३-२४)' जाहीर झाल्याबद्दल त्यांचा सत्कार करण्यात आला.



नशा बंदी मंडळ महाराष्ट्र चे धाराशिव जिल्हा संघटक तसेच परिवर्तन सामाजिक संस्थेचे संस्थापक सचिव असलेल्या मारुती बनसोडे यांचा सत्कार जिल्हा परिषद धाराशिवचे जिल्हा समाज कल्याण अधिकारी सचिन कवले यांच्या हस्ते दि. २३ मार्च रोजी करण्यात आला.

यावेळी समाज कल्याण निरीक्षक अमोल कातंगळे उपस्थित होते.

## सावळसूर येथे शेत पाणंद रस्त्याचे भूमिपूजन संपन्न

### शरण पाटील यांच्या आश्वासनाची पूर्तता...

**तभा वृत्तसेवा**
**उमरगा, दि.२३ मार्च -**

निवडणुकीच्या काळात दिलेले आश्वासन पूर्ण करत विधानसभा समितीचे सह-अध्यक्ष शरण बसवराज पाटील यांच्या हस्ते उमरगा तालुक्यातील सावळसूर येथे शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून शेत पाणंद रस्त्याचे भव्य भूमिपूजन संपन्न झाले.

जिल्हा परिषद व पंचायत समिती निवडणुकीच्या प्रचारादरम्यान सावळसूर येथील पाणंद रस्त्याचा प्रलंबित प्रश्न मार्गी लावण्याचे आश्वासन शरण पाटील यांनी ग्रामस्थांना दिले होते.

आज या कामाचा प्रत्यक्ष शुभारंभ झाल्याने सावळसूर परिसरातील शेतकऱ्यांमध्ये समाधानाचे वातावरण आहे. यावेळी बोलताना शरण पाटील म्हणाले की, शरण पाटील फाउंडेशनच्या माध्यमातून उमरगा आणि लोहारा तालुक्यात आम्ही पाणंद रस्त्यांचे जाळे विणले असून हे काम भविष्यातही अविरत सुरू राहील.



देवेंद्र फडणवीस आणि चंद्रशेखर बावनकुळे यांच्या मार्गदर्शनाखाली या रस्त्यांसाठी आवश्यक निधी उपलब्ध करून देऊन हा रस्ता अधिक सक्षम करण्याचा आमचा प्रयत्न आहे.

उमरगा-लोहारा तालुक्यात राबविलेल्या बळीराजा शेत पाणंद रस्ते योजनेचा आदर्श 'पॅटर्न' संपूर्ण महाराष्ट्रासाठी उभा करू, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

सावळसूर ते चिरेवाडी आणि आकाश इंगळे यांच्या शेतापासून ते दगडू येमगर यांच्या शेतापर्यंतचा सुमारे २ किलोमीटर लांबीचा हा रस्ता केवळ शेतकऱ्यांसाठीच नव्हे, तर सावळसूर, चिरेवाडी आणि परिसरातील गावांसाठी दळणवळणाची महत्त्वाची वाहिनी ठरणार आहे. या रस्त्यामुळे वाहतुकीचा दीर्घकालीन प्रश्न सुटणार असून शेतीमालाच्या वाहतुकीला गती मिळणार आहे.

या कार्यक्रमास भाजपाचे दिलीप भालेराव, रफिक तांबोळी, श्याम चिंचोळे, योगेश राठोड, सचिन पाटील, आकाश इंगळे, प्रेमनाथ सूर्यवंशी, कमलाकर पाटील, ज्ञानेश्वर पाटील, बाबुराव सूर्यवंशी, भास्कर बोधे, शाहूराज सूर्यवंशी यांच्यासह सावळसूर व परिसरातील नागरिक व शेतकरी उपस्थित होते.

## आरळी-काळेगाव मार्ग २५ वर्षांपासून खड्डेमय; नागरिकांचा संताप वाढला


**तभा वृत्तसेवा**
**तुळजापूर, दि.२३ मार्च -**

तालुक्यातील आरळी (खुर्द) - आरळी (बु.) - काळेगाव हा अत्यंत महत्त्वाचा प्रमुख जिल्हा मार्ग गेल्या तब्बल २५ वर्षांपासून दुरवस्थेत असून नागरिकांचे हाल दिवसेंदिवस वाढत आहेत. रस्त्यावर मोठमोठे खड्डे पडले असून अनेक ठिकाणी रस्ता पूर्णतः उखडून गेला आहे. त्यामुळे वाहनचालकांना अक्षरशः तारेवरची कसरत करत प्रवास करावा लागत आहे.

खराब रस्त्यामुळे वारंवार अपघात होत असून परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. प्रशासनाकडून दीर्घकाळ कोणतीही ठोस दखल घेतली गेली नसल्याचा आरोप ग्रामस्थांनी केला आहे.

काही वर्षांपूर्वी हा रस्ता जिल्हा नकाशावरूनही गायब असल्याने निधी मिळण्यात अडथळे आले होते. परिस्थिती असह्य झाल्यानंतर ग्रामस्थांनी वर्गणी गोळा करून स्वखर्चातून रस्त्याची डागडुजी केली. मात्र ही उपाययोजना तात्पुरती ठरली आणि काही काळातच रस्ता पुन्हा खराब झाला. सध्या रस्ता नकाशावर समाविष्ट असूनही संबंधित विभागाकडून दुरुस्तीबाबत कोणतीही हालचाल होत नसल्याने ग्रामस्थांमध्ये तीव्र नाराजी आहे.

लोकसभा, विधानसभा आणि जिल्हा परिषद निवडणुकांदरम्यान हा प्रश्न वारंवार मांडण्यात आला. प्रत्येकवेळी लोकप्रतिनिधींनी दुरुस्तीची आश्वासने दिली; मात्र निवडणुका संपल्यानंतर दुर्लक्ष झाल्याचा आरोप नागरिकांनी केला आहे. सतत पाठपुरावा करूनही प्रश्न मार्गी लागत नसल्याने स्थानिक लोकप्रतिनिधीही हतबल झाल्याचे चित्र आहे. आरळी (खुर्द) - आरळी (बु.) - काळेगाव हा मार्ग शिक्षण, आरोग्य, व्यापार आणि सामाजिक जीवनाचा कणा मानला जातो. त्यामुळे या रस्त्याची तातडीने दुरुस्ती करणे अत्यावश्यक असल्याची मागणी जोर धरत आहे.





### बस सेवा बंद; विद्यार्थ्यांचे मोठे नुकसान

रस्त्याची अत्यंत खराब अवस्था लक्षात घेऊन एसटी महामंडळाने या मार्गावरील बस सेवा काही काळ बंद केली होती. त्यामुळे विद्यार्थ्यांना तुळजापूरला शिक्षणासाठी जाणे कठीण झाले. अनेकांना शिक्षण सोडण्याची वेळ आली, तर काहींना खासगी वाहनांचा आधार घ्यावा लागल्याने खर्च वाढला.

### आमदारांकडे ठोस कारवाईची मागणी

स्थानिक नागरिकांनी राणाजगजितसिंह पाटील यांच्याकडे तातडीने लक्ष घालण्याची मागणी केली आहे. रस्ता तात्काळ दुरुस्त करून नागरिकांची गैरसोय दूर करावी, अन्यथा तीव्र आंदोलन छेडले जाईल, असा इशारा ग्रामस्थांनी दिला आहे.